# ज्ञान प्रबोधिनी

## वार्षिक वृत्त २०१९-२०
























१. युवती संघटन सचिव मेधाविनी वाटवे विद्यावाचस्पती पदवी स्वीकारताना.

२. प्रशासकीय सेवेतील अतिविशिष्ट रेकॉर्ड साठी श्री. राहुल नांगरे यांचा मा. डॉ. विजय केळकर यांच्या हस्ते सत्कार

३. प्रशांत दिवेकर सपत्नीक पुरस्कार स्वीकारताना

४. संस्कृति संवर्धन मंडळातर्फे ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडीला आदर्श शाळा पुरस्कार

५. अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशनचे पारितोषिक स्वीकारताना ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे प्रा. सत्याश्रय हसबनीस

६. जिनेव्हा येथील आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत सहभागी डावीकडून अनिता गुर्जर, प्रा. सुवर्णा गोखले, वाच. अनघा लवळेकर, अंजली राईलकर

७. पर्यावरण पुरस्कार स्वीकारताना ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे येथील सौ.मनीषाताई वहिले

# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

# वार्षिक वृत्त

(सौर शके १९४१-४२)
दि.१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२०


| | | |
|---|---|---|
| पत्ता | : | ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० |
| दूरभाष क्र. | : | (०२०) २४२०७००० |
| | | (९१)(२०)२४४९१८०६ |
| संकेत स्थळ | : | www.jnanaprabodhini.org |
| ई-मेल | : | contact@jnanaprabodhini.org |

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

| **※ सन्माननीय सदस्य ※** | | |
|---|---|---|
| **डॉ. रघुनाथ माशेलकर** | - | माजी महासंचालक, CSIR, नवी दिल्ली |
| **श्री. अण्णा हजारे** | - | सामाजिक कार्यकर्ते |
| **श्रीमती अनु आगा** | - | उद्योजिका |
| **डॉ. जयंत नारळीकर** | - | माजी संचालक, आयुका, पुणे |

| **※ पदाधिकारी २०१८-२०२१ ※** | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | - | डॉ. रघुनाथ माशेलकर |
| **उपाध्यक्ष** | - | श्री. अण्णा हजारे<br>वा. विजय केळकर |
| **कार्याध्यक्ष** | - | श्री. श. बा तथा रवी पंडित |
| **संचालक** | - | वा. गिरीश श्री. बापट |
| **कार्यवाह** | - | श्री. वि. शं./सुभाष देशपांडे |
| **सहकार्यवाह** | - | श्री. वि. ध. गुर्जर |

## ज्ञान प्रबोधिनी कार्यकारी मंडळ

### ※ निर्वाचित सदस्य ※

१. श्री. श. बा./रवी पंडित (कार्याध्यक्ष)
२. वा. गिरीश श्री. बापट (संचालक)
३. श्री. वि. शं./सुभाष देशपांडे (कार्यवाह)
४. श्री. विश्वनाथ ध. गुर्जर (सहकार्यवाह)
५. प्रा. वा. ना. अभ्यंकर
६. श्री. रामकुमार राठी
७. श्री. मोहन चि. गुजराथी
८. वा. विवेक बा. कुलकर्णी
९. वा. सुधाताई कोठारी
१०. श्री. महेश आठवले
११. प्रा. महेन्द्र सेठिया
१२. प्रा. मनोज देवळेकर
१३. वा. अनघाताई लवळेकर

### ※ संचालक नियुक्त सदस्य ※

१४. प्रा. सुवर्णाताई गोखले
१५. श्री. प्रशांत दिवेकर
१६. प्रा. सविताताई कुलकर्णी
१७. वा. मिलिंद नाईक
१८. श्री. आशुतोष बारमुख

**(निगडी केंद्र या न्यासाच्या अंतर्गत आहे.)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **※ मुख्य केंद्रे** | : | पुणे, निगडी, सोलापूर, हराळी (उस्मानाबाद) | | |
| **※ उपकेंद्रे** | : | पुणे केंद्र | : | शिवापूर, वेल्हे, |
| | | निगडी केंद्र | : | साळुंब्रे |
| | | पुणे केंद्र | : | शिरवळ (जिल्हा सातारा) |
| **※ विस्तार केंद्रे** | : | डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई (जिल्हा बीड) | | |

### ※ संस्थात्मक सदस्य ※

१) ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था
२) ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश
३) ज्ञान प्रबोधिनी सोलापूर
४) ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था
५) ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात. त्यातील काही सारांश या वृत्तात दिले आहेत.

# हितगुज

ज्ञान प्रबोधिनीचे सौर शके १९४०-४१ म्हणजेच सन २०१९-२० या वर्षाचे संकलित वार्षिक वृत्त आपल्या हाती देताना आनंद होत आहे. वृत्तान्त वर्ष हे अनेक घडामोडींचे व मानबिंदू निश्चित करणारे ठरले. प्रबोधिनीची ओळख बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी चाललेल्या विशेष शाळेमुळे दूरवर पसरली आहे. या ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचा २०१९-२० या वर्षात सुवर्ण महोत्सव होता. गेल्या ५० वर्षांचा शिक्षण क्षेत्रातील कामगिरीचा आढावा व त्याचबरोबर आजी-माजी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मेळावे यामुळे हे वर्ष भरगच्च घटनांचे गेले. त्यातच प्रशालेच्या १९७६च्या तुकडीचे विद्यार्थी ले. जनरल मनोज नरवणे यांस जनरलपदी बढती मिळून त्यांची भारताचे लष्कर प्रमुख म्हणून नियुक्ती झाली, हा प्रबोधिनीच्या वाटचालीतील एक अतिशय महत्त्वाचा आनंदाचा क्षण तर प्रकटलाच पण या पुढच्या विद्यार्थ्यांना आपणही अशी विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग कामगिरी करावी अशी प्रेरणा या कार्यक्रमांमधून निर्माण झाली.

अगदी सुरुवातीच्या तुकड्यांपासूनचे अनेक माजी विद्यार्थीही या निमित्ताने एकत्र आले. प्रशालेय शिक्षणामध्ये आपल्या स्वतःच्या उत्कर्षाबरोबरच देशापुढील एखादा प्रश्न हाती घेऊन त्यावर आपला व्यासंग कारणी लावावा असे अनेकांना वाटत असते. या भावनेला नेमकी रचना प्राप्त व्हावी म्हणून विविध विषयांचे 'विशेष उद्दिष्ट गट' (Special Purpose Groups : SPGs) तयार करण्यात आले. त्यात तंत्रज्ञानाबरोबरच रोजगार व उद्योजकता; कला, पर्यावरण या बरोबरच राष्ट्रीय सुरक्षा व एकात्मता अशासारख्या विषयांचा समावेश आहे. आपापल्या व्यवसायानुसार बांधकाम विषयक, आर्थिक आणि आरोग्य क्षेत्रातील तसेच उच्च शिक्षणातील व्यवसाय गट (Professional Groups : ProGs) तयार झाले आहेत. या सर्व गटांचे काही अभ्यास व प्रकल्प सुरू झाले आहेत. प्रबोधिनीच्या विविध विभागांना यातील तज्ज्ञ कार्यशक्तीची मोठीच मदत आगामी काळात लाभणार आहे.

प्रशालेच्या सुवर्ण महोत्सवाचे वातावरण जसे पुण्यात तयार झाले तसे ते देश-विदेशात विखुरलेल्या माजी विद्यार्थ्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर तयार झाले. ऑगस्ट २०१९ मध्ये उत्तर अमेरिकेतील प्रबोधिनीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी ''ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन'' या संस्थेची अमेरिकेत रीतसर नोंदणी केली. शिक्षण, ग्रामीण विकसन व स्त्री शक्ती प्रबोधन या तीन विषयांसाठी त्यांनी काम करायचे व निधी उभारण्याचे ठरविले आहे. युरोपातील काही देशांत तसेच मध्यपूर्व व पूर्वेकडील देशांत काही अनौपचारिक गट नियमित जमू लागले आहेत. शाळेत ग्रहण केलेले विचार दैनंदिन आयुष्यामध्ये समाजोपयोगी कसे करता येतील या दृष्टीने त्यांनी विविध क्षेत्रातील उपक्रम आखले आहेत. सर्वार्थाने वृत्तान्त वर्ष हे प्रबोधिनीला आपल्या कार्यामध्ये दोन पाऊले पुढे नेणारे खचितच ठरले आहे.

प्रबोधिनीच्या विविध विभागांची जी कामगिरी गेल्या वर्षभरात झाली त्याचाही आढावा या वृत्तात पुढे घेतला आहे. भौगोलिकदृष्ट्या व कामकाजाच्या दृष्टीने प्रबोधिनीचे कार्य हे विविध न्यास, विविध केंद्रे, उपकेंद्रे, विस्तार केंद्रे व संपर्क केंद्रे या द्वारे चालते. काही ठिकाणी इमारती व आस्थापनांसह तर काही ठिकाणी ती नसूनही तेथे नियमितणे जाऊन महत्त्वपूर्ण प्रकल्प करण्याच्या स्वरूपात काम चालू आहे. या वृत्तामध्ये 'ज्ञान प्रबोधिनी, पुणे' या न्यासाच्या अंतर्गत ज्या केंद्रांचे व विभागांचे काम चालते त्यांचा विस्ताराने उल्लेख केला आहे. उर्वरित न्यास व विभाग यांच्या कार्याचे संक्षिप्त निवेदन येथे केले आहे. त्यांचे स्वतंत्र वार्षिक वृत्त प्रकाशित होतच असते.

प्रबोधिनीच्या शैक्षणिक कार्याचे ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे हे जसे एक अधिष्ठान आहे तसेच नवनगर विद्यालय, निगडी हे दुसरे अधिष्ठान आहे. दोन्ही ठिकाणी शिक्षणामधील नवनवीन प्रयोग नित्य चालू असतात. त्यातील काहींना संशोधनाचे स्वरूप देऊन त्याच्या निष्कर्षांवर पुस्तिका प्रकाशित केल्या जातात. अशा पुस्तिका व छात्र प्रबोधन हे मासिक वितरित करून प्रबोधिनीचा शैक्षणिक विचार महाराष्ट्र राज्यभर पोहोचावा, या दृष्टीने गेल्या वर्षात अनेक उपक्रम झाले. आपल्या राज्या बरोबरच भारताच्या अन्य राज्यांमध्येही प्रबोधिनीचा शैक्षणिक विचार प्रसृत व्हावा या दृष्टीने शैक्षणिक उपक्रम संशोधिकेची रचना केलेली आहे. तिच्याद्वारे अरुणाचल प्रदेश व जम्मू-काश्मीर या सारखे सीमावर्ती प्रांत तसेच छत्तीसगड, ओरिसा या सारखे वनवासी बहुल प्रांत येथे असलेल्या विविध शैक्षणिक संस्थांशी प्रबोधिनीने नियमित संपर्क प्रस्थापित केला असून तेथे शिक्षक व निवडक विद्यार्थी यांच्यासाठी प्रशिक्षणाचे उपक्रम वृत्तान्त वर्षात घेण्यात आले. त्यासाठी काही कंपन्यांकडून CSR अंतर्गत अनुदाने मिळाली तर काही उपक्रम प्रबोधकांनी स्वखर्चाने स्वयंसेवी वृत्तीने पार पाडले. महाराष्ट्रातही अविकसित प्रदेशांत अनेक ठिकाणी प्रबोधिनीचे शैक्षणिक उपक्रम घेण्यात आले. राज्य व केंद्र शासनाने या प्रयत्नांची चांगली दखल घेतली असून संगणकाद्वारे शिक्षणासाठी जी शैक्षणिक साधने (E-Resources) तयार करण्यात आली ती केंद्र शासनाच्या ''दीक्षा'' या प्लॅटफॉर्मवर प्रकाशित करण्यात आली आहेत. हजारो शिक्षक व विद्यार्थी त्यांचा वापर करीत आहेत.

अशा सर्व उपक्रमांना, प्रबोधिनीच्या शैक्षणिक वातावरणाचा स्पर्श झालेले व येथील भूमिका पत्करलेले स्पर्धा परीक्षा केन्द्रातील अनेक अधिकारी जे देशभर विखुरलेले आहेत, त्यांचा अतिशय मोठा हातभार लागत असतो. यातील काही अधिकारी गेल्या वर्षभरात

जेव्हा पुण्यात आले, तेव्हा त्यांनी आपल्या स्पर्धा परीक्षा केंद्राला पुन्हा आवर्जून भेट दिली व नव्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्याचे तपशील त्या विभागाच्या वृत्तात दिले आहेत. प्रबोधिनीचे विचार घेऊन पुढे शासनामध्ये अधिकारी म्हणून होऊ इच्छिणाऱ्या सध्याच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी पूर्वतयारी वर्ग म्हणून नेतृत्व संवर्धन केंद्रामध्ये व्यवस्था केली आहे. या केंद्रात उद्योग-व्यवसाय व सामाजिक कार्य यामध्ये लागणाऱ्या नेतृत्वाची पायाभरणी करण्यासाठीचे वर्गसुद्धा चालविले जातात. अशा सर्व रचनेमुळे शालेय वयोगटापासून पदव्युत्तर व व्यावसायिक वयोगटापर्यंत औपचारिक व अनौपचारिक अशा शिक्षणाची व्यवस्था प्रबोधिनीने केली आहे व ती सतत विकसित होत आहे. शासन दरबारी जरी तिची नोंद 'मुक्त विद्यापीठ' अशी अद्याप झालेली नसली तरी तिचे स्वरूप, हाताळावयाचे विषय व विस्तार पाहता सध्याच प्रबोधिनीने मुक्त विद्या केंद्राचे स्वरूप घेतलेले आहे.

कुठल्याही संकल्पनांच्या विस्तारासाठी त्यांना संशोधनाचा भरभक्कम आधार लागतो. शैक्षणिक विषयांबाबत प्रबोधिनीच्या मानसशास्त्र संशोधिकेने हे काम सुरुवातीपासून केले आहे. बुद्धिमंतांच्या शिक्षणापासून सुरू झालेले काम आता प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेचा विकास या पायरीपर्यंत विकसित झाले आहे. विविध प्रकारच्या क्षमतांचा शोध घेऊन प्रत्येक व्यक्तीला आपापले कार्यक्षेत्र निवडता यावे यासाठीचे चाचणी व मार्गदर्शन केन्द्र आता पुष्कळच व्यापक झाले आहे. इ. १०वी-१२वी नंतर योग्य तो अभ्यासक्रम निवडण्यासाठी चाचणी व मार्गदर्शनाचे काम गेल्या वर्षात जवळ-जवळ ५६६० मुलांपर्यंत पोचले. या संबंधीचे प्रशिक्षक तयार करून त्यांच्याद्वारे संगणकावरून काही चाचण्या उपलब्ध केल्या असून त्यांचा लाभ गतवर्षात १,८७० जणांनी घेतला. मानसशास्त्र विभागाने पौगंडावस्थेतील मुला-मुलींच्या वर्तन शिक्षणासाठी अनेक कार्यशाळा विकसित केल्या आहेत. प्रबोधिनीच्या 'संवादिनी' या गटामार्फत महाराष्ट्रभर आता या कार्यशाळा घेतल्या जाऊ लागल्या आहेत. संशोधन विभागामध्ये संस्कृत आणि संस्कृती यावर जे काम होत आहे, त्यात 'विकिमीडिया' या जागतिक आंतरजालावरील उपक्रमाची भर पडली आहे. सार्थ पौरोहित्याची वाढ सातत्याने होते आहे. त्यामध्ये संगणकावर दूरस्थ पद्धतीने संस्कारविधी करणे शक्य झाले आहे. विविध सामाजिक शास्त्रांचा एकत्रित विचार केला पाहिजे असे अनेक प्रश्नांच्या सोडवणुकीच्या निमित्ताने लक्षात येते. त्या दृष्टीने, समाजशास्त्रांचा आंतरविद्याशाखीय अभ्यासगट वृत्तान्त वर्षात उभा राहिला. त्यासाठी एका संशोधक व्यक्तीची नेमणूक झाली आणि वर्षभरात अनेक चर्चासत्रेही झाली.

ग्रामीण आघाडीवर स्त्री-शक्ती प्रबोधनाचे काम वेल्हे तालुक्यात आता सह्याद्रीच्या कडेकपारीत पोहोचले आहे. बचत गटांची नुसती संख्या न वाढवता त्या २५० गटांद्वारे आरोग्य, स्थानिक नेतृत्व विकसन व आर्थिक उत्पन्नाची साधने निर्माण करण्यावर भर दिला गेला. गेल्या अनेक वर्षांच्या प्रयत्नांमुळे आता सुमारे ८० स्थानिक महिला या प्रबोधिनीच्या प्रतिनिधी म्हणून विविध गावांमध्ये काम करू लागल्या आहेत. त्यातल्या अनेकींनी प्रबोधिनीची द्वितीय व तृतीय प्रतिज्ञासुद्धा घेतली आहे, हे विशेष! डोंगराळ भागातील मुलींसाठी वेल्हे येथे चालू असलेले वसतीगृह हे एक चांगले 'विकासकेंद्र' झाले आहे. महाविद्यालयीन युवतींच्या वसतीगृहासाठी जागेची जुळवा-जुळव वृत्तान्त वर्षात झाली. या सर्व उपक्रमांना समाजातील विविध व्यक्ती आणि संस्था यांचा वाढता पाठिंबा लाभत आहे. या कामाचे गेली दहा वर्षे प्रमुख आधारस्तंभ असलेले उद्योगपती श्री. अनंत सेटलवाड यांचे दुःखद निधन या वर्षात झाले. ही मोठीच दुःखद घटना आहे. वेल्हे, भोर व मुळशी तालुक्यातील गावांमधील ज्या वाड्या-वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण आहे अशांचे सर्वेक्षण करून आपण तेथे विहीर खोदाईचे काम गेली काही वर्षे करीत आहोत. गेल्या वर्षी अशा चार विहिरींची भर पडली आहे. नैसर्गिक संसाधनांमध्ये सौर ऊर्जेचा वापर खेडोपाडी व्हावा या दृष्टीने सौर फलक तयार करण्याचे प्रशिक्षण शिवापूर, साळुंब्रे व हराळी येथील ग्रामीण युवकांना देण्यात आले. ऊर्जा हे स्वावलंबनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होय. ग्रामीण कार्यात १९८३ पासून कार्यरत असलेले श्री. माधवराव देशपांडे यांचे गत वर्षात दुःखद निधन झाले. गावोगावी त्यांचा दांडगा लोकसंपर्क असे.

प्रबोधिनीचे उपक्रम आपल्याही गावी सुरू झाले पाहिजेत अशा आग्रहातून स्थानिक कार्यकर्त्यांनी बीड जिल्ह्यात अंबाजोगाई येथे तर मुंबई उपनगरांमध्ये डोंबिवली व बोरीवली येथे प्रबोधिनीची विस्तार केंद्रे चालविली आहेत. या विस्तार केंद्रांनी आपापल्या परिसरातील आणखी काही गावांमध्ये असे उपक्रम घेण्यास सुरुवात केली आहे, त्याचेही तपशील या वृत्तात दिले आहेत. भौगोलिक विस्तार ही कार्यदिशा आता चांगला आकार घेत आहे. जेथे प्रबोधिनीच्या आस्थापना आहेत अशा निगडी, साळुंब्रे, सोलापूर व हराळी या केंद्र-उपकेंद्रांचे अहवाल स्वतंत्रपणे प्रकाशित होत असतात त्यांचा सारांश या वृत्तात दिला आहे. आयुर्विज्ञान संस्थेचे शिरवळ येथे चालू असलेले नेत्र रुग्णालय त्या परिसरात उपयुक्त कामगिरी बजावत आहे. त्याचेही वृत्त समाविष्ट केले आहे.

सन २०१९-२० या वर्षाचे कामकाज मार्च २०च्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत नेहमीप्रमाणे जोरात चालू होते. शेवटच्या आठवड्यात उद्भवलेल्या कोरोनाच्या साथीमुळे कामामध्ये एकदम खंड पडला. त्याचा प्रतिकूल परिणाम पुढील वर्षीच्या कामावर दिसून येईल. हे वार्षिक वृत्त आपल्या हाती देण्यासही त्यामुळे खूपच उशीर झाला. परंतु, संकटाचे संधीत रूपांतर करणे हा प्रबोधिनीचा स्वभाव असल्यामुळे सर्वच विभाग व उपक्रम त्यातून पुढील वर्षात नव्या वाटा शोधतील, असा आत्मविश्वास वाटतो.

| | |
|---|---|
| गिरीश श्री. बापट | वि. शं./सुभाष देशपांडे |
| संचालक | कार्यवाह |

# अंतरंग

पान क्र.


❖ **मध्यवर्ती कार्यक्रम** **०६**

❖ **ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र**

१) ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ११

२) शैक्षणिक उपक्रम संशोधिका १४

३) छात्र प्रबोधन १८

४) नेतृत्व संवर्धन केंद्र २०

५) स्पर्धा परीक्षा केंद्र २२

६) प्रज्ञा मानस संशोधिका २५

७) संस्कृत संस्कृति संशोधिका २९

८) सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र ३०

९) ग्रामविकसन विभाग ३१

१०) कृषी तांत्रिक विद्यालय ३२

❖ **कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ** **३३**

११) स्त्री शक्ती प्रबोधन - ग्रामीण ३४

१२) स्त्री शक्ती प्रबोधन - शहरी ३७

१३) नागरी वस्ती अभ्यासगट ३९

१४) जिजामाता दल ४१

१५) युवक विभाग ४२

१६) युवती विभाग ४७

१७) उद्योजकता विकास केंद्र ४९

❖ **ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र** **५०**

❖ **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर** **५३**

❖ **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर : हराळी केंद्र** **५६**

❖ **ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे** **५९**

**विस्तार केंद्रे**

**१) डोंबिवली** **६०**

**२) बोरीवली** **६१**

**३) अंबाजोगाई** **६२**

❖ **विस्तार कार्य** **६३**

❖ **सन्माननीय देणगीदार** **६७**


**मुखपृष्ठाविषयी : १) ज्ञान प्रबोधिनी प्रशाला सुवर्ण महोत्सवी माजी विद्यार्थी मेळाव्यात ज्ञान प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांचा आ. यशवंतराव लेले यांच्या हस्ते सत्कार २) माजी विद्यार्थी मेळाव्यात अभिव्यक्ती सादरीकरण ३) ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर - शिशु शाळेची तिचाकी सायकल फेरी ४) ग्रामीण भागात सौर दिवे जुळणीचे प्रशिक्षण ५) डच वर आणि भारतीय वधू अशा विवाहाचे पौरोहित्य**



## अभिनंदन

- ज्ञान प्रबोधिनी पुणे प्रशालेच्या १९७६च्या तुकडीचे विद्यार्थी **लेफ्टनंट जनरल मनोज मुकुंद नरवणे** यांना जनरल पदावर बढती मिळून **भारताच्या लष्करप्रमुखपदी** निवड झाली. प्रशालेच्या इतिहासातील हा सर्वोच्च आनंदाचा क्षण आहे. दि. २२ डिसेंबर २०१९च्या माजी विद्यार्थी मेळाव्यात जनरल नरवणे यांनी प्रशालेतील शिक्षणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.
- ज्ञान प्रबोधिनी पुणे प्रशालेतील अध्यापक **श्री. सत्याश्रय हसबनीस** यांना अगस्त्य इंटरनॅशनल फाऊंडेशनतर्फे (बंगळुरू) आयोजित 'गणितीय प्रतिकृती' बनवण्याच्या **शैक्षणिक साधन निर्मिती स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पारितोषिक** मिळाले.
- **युवती संघटन सचिव मेधाविनी वाटवे** यांना गोखले अर्थशास्त्र संस्थेतून **अर्थशास्त्र** विषयातील **विद्यावाचस्पती** ही पदवी मिळाली. **'भारतातील ऊर्जाक्षेत्रातील बदलांचे पर्यावरणावर व अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम'** हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. त्याला प्रा. राजस परचुरे आणि वाच. प्रदीप आपटे यांनी मार्गदर्शन केले.
- वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख **प्रा. प्रशांत दिवेकर** यांना या वर्षीचा **'स्वामी विवेकानंद युवा पुरस्कार' जनकल्याण समितीतर्फे (महाराष्ट्र प्रांत)** प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप ४१ हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे होते. गणेश कला क्रीडा केंद्रात पार पडलेल्या 'सेवा संगम' कार्यक्रमात समितीचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- **क्रीडाक्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल** शहर क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघातर्फे, ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राचे केंद्र उपप्रमुख **मा. श्री. मनोजराव देवळेकर** यांना २८ ऑगस्ट २०१९ रोजी पुणे जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी मा. श्री. गणपत मोरे यांच्या हस्ते **जीवन गौरव** पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- गांधी फोरमतर्फे **'उपक्रमशील शाळा'** हा राज्यस्तरीय पुरस्कार **ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर** प्रशालेस देण्यात आला.
- दि. १६ फेब्रु. २०१९ रोजी पुणे जिल्हा माध्यमिक संघ व पुणे जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय **गुणवंत शिक्षक पुरस्कार** वितरण सोहळा आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन, सासवड येथे झाला. ग्राम प्रबोधिनी विद्यालय साळुंब्रेचे अध्यापक **श्री. लक्ष्मीकांत मुंढे** यांना पुरस्कार प्राप्त झाला.

## आंतरराष्ट्रीय पदवीधर महिला परिषद

'ग्रॅज्युएट वीमेन इंटरनॅशनल' या आंतरराष्ट्रीय नेटवर्कची शताब्दी पूर्तीची ३३वी त्रैवार्षिक परिषद, जिनेव्हा, स्वित्झरलँड येथे झाली. परिषदेत **प्रा. सुवर्णा गोखले** यांनी 'Schooling Intervention : Keep girls from dropping out and help the women reenter' हा निबंध वाचला. वेल्हे सहनिवासातील मुलींच्या व महिलांच्या मुक्त विद्यापीठाच्या पदवी प्रवेशाचे अनुभव व माहितीवर आधारित हा निबंध होता. **वा. अनघा लवळेकर** यांनी युवा प्रकल्पाच्या अनुभवावर आधारित कामावरचे निबंध वाचन केले. या शिवाय, लैंगिकता प्रशिक्षण या विषयावर संवादिनी सदस्या **श्रीमती अनिता गुर्जर** व **श्रीमती अंजली राईलकर** यांच्या मदतीने तेथे कार्यशाळाही घेतली.

## NAGC २०१९ मधील सहभाग

National Association for Gifted Children, USA ची ६६वी वार्षिक परिषद दि. ७ ते १० नोव्हें. २०१९ दरम्यान Albuquerque, New Mexico, USA इथे झाली. ज्ञान प्रबोधिनीचे प्रबोधक आणि सध्या पर्ड्यू विद्यापीठात शिकणारे **श्री. आकाश चौकसे** यांनी या परिषदेत प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी सादर केलेल्या 'भारतातील ग्रामीण आणि आदिवासी प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अनुभव' या शोधनिबंधाला प्रथम पारितोषिक मिळाले. Developing Heart Powers :- Triadic Approach to Stimulating Affective Development या सत्रामधून त्यांनी प्रज्ञा प्रबोधन वर्गाच्या मनो-सामाजिक विकसनाच्या दिशेची मांडणी केली. या सत्राला अमेरिकेतील विविध राज्यांमधील २५ शिक्षक उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात Developing Talents for Social Change : Translating Purpose into Practice या विषयावर मांडणी केली. ज्ञान प्रबोधिनीची समाज बदलासाठी प्रज्ञा विकासाची संकल्पना स्पष्ट करताना प्रबोधन वर्गाची निर्मिती आणि विकासाचे टप्पे उद्धृत केले. एक तासाच्या या सत्राला जागतिक दर्जाचे संशोधक, प्राध्यापक आणि शिक्षक मिळून पंधरा जण उपस्थित होते. दोन्ही सत्रांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला. या परिषदेद्वारे प्रबोधिनीचे तत्त्वज्ञान आणि प्रबोधन वर्गाचा शैक्षणिक प्रयोग अमेरिकेतील संशोधक आणि शिक्षकांसमोर मांडण्याची चांगली संधी मिळाली.

## ० रूप पालटू व्याख्यानमाला

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पा पेंडसे यांच्या स्मृती दिनानिमित्त ‘रूप पालटू’ ही व्याख्यानमाला गेली पाच वर्षे ज्ञान प्रबोधिनी मध्ये होते आहे. प्रबोधिनीतील शिक्षणाची शिदोरी घेऊन देशप्रश्नांवर उत्तर देणाऱ्या कार्यकर्त्यांचे निवेदन किंवा मुलाखत असे त्याचे स्वरूप असते. या वर्षी प्रबोधिनीच्या १९८०च्या तुकडीतील श्री. गिरीन्द्र कसमळकर यांची ‘उद्योजकतेच्या नव्या वाटा’ या विषयावर श्री. हृषीकेश मेहेंदळे यांनी मुलाखत घेतली.

गेली २५ वर्षे एक यशस्वी उद्योजक म्हणून नाव मिळवल्यानंतर Ideas to Impacts Innovations Pvt. Ltd. या उद्योगाची त्यांनी स्थापना केली. यामध्ये मुख्यत: भविष्यातील संधीचे समसमान वाटप : Distributing The Future Evenly या तत्त्वावर काम सुरू आहे. ग्रामीण युवकांना मार्गदर्शन करणे व स्थानिक पातळीवर माहिती तंत्रज्ञान या आधुनिक क्षेत्रात नोकरीची संधी उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट ठेवून ही संस्था काम करते आहे.

## ० सेतुबंधन मेळावा २०२०

दि. १ फेब्रु. २०२० रोजी स. १०.०० ते सायं. ५.३० या वेळामध्ये प्रबोधिनीच्या सर्व केंद्रांचा एकत्रित सेतुबंधन मेळावा प्रबोधिनी भवन, पुणे येथे झाला. सर्व केंद्रांवरील उत्तरदायी सूचीतील केंद्रीय विस्तारित समितीमधील सदस्य व ज्ञान प्रबोधिनीमध्ये गेल्या दोन वर्षात आलेले नवीन सदस्य या मेळाव्याला अपेक्षित होते. नाव नोंदणी झाल्यावर सुरुवातीला सदस्य मंडळ सभा झाली. संस्थेच्या औपचारिक कामाची सर्व सदस्यांना माहिती व्हावी या हेतूने सदस्य मंडळ सभा त्याच दिवशी आयोजित केली होती. यामध्ये श्री. राहुल नांगरे यांना प्रशासकीय सेवेतील अतिविशिष्ट रेकॉर्डसाठी व युवती कार्यकर्ती कु. मेधाविनी वाटवे हिला अर्थशास्त्रातील विद्यावाचस्पती पदवी मिळाल्याबद्दल प्रबोधिनीचे अध्यक्ष मा. डॉ. रघुनाथराव माशेलकर यांच्या हस्ते दोघांचाही सत्कार करण्यात आला.

भोजनानंतरच्या पहिल्या सत्रात सर्व सदस्यांचे पंधरा गट केले. यामध्ये प्रत्येक सदस्यांने स्वतःची व आपण करत असलेल्या कामाची ओळख करून द्यायची होती. तसेच प्रबोधिनीच्या कामाची ओळख सर्वांना व्हावी हाही हेतू होता.

चहापानानंतरच्या सत्रामध्ये तीन गटांमध्ये प्रबोधिनी साहित्य परिचय व वेबसाइट परिचय सर्व सदस्यांना करून देण्यात आला. इंटरनेटची सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली होती. सर्व सदस्यांनी स्वतः प्रबोधिनीच्या वेबसाइटस् व विविध ॲपस् पाहिले. याच सत्रातील दुसऱ्या भागामध्ये डोंबिवली-बोरीवली, अंबाजोगाई व चिपळूण येथे ज्ञान प्रबोधिनीचे जे काम चालू आहे त्याची माहिती देण्यात आली. यानंतर सर्व गट समारोपासाठी एकत्र जमले. ‘विश्वास हा मनीचा’ या पद्याने सत्राची सुरुवात झाली. मा. संचालकांनी सर्वांना मार्गदर्शन केले. प्रार्थना होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## ० ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनची स्थापना

- उत्तर अमेरिकेतील ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन या फौंडेशनची स्थापना केली.
- ९ ऑगस्ट २०१९ रोजी संस्थात्मक नोंदणी पूर्ण झाली.
- अमेरिकेत नवीन कामाची सुरुवात तसेच भारतातील शिक्षण, ग्रामीण विकास व स्त्री शक्ती प्रबोधन या कामांस साहाय्य करण्याच्या हेतूने सदर संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.
- अमेरिकेत व युरोपमध्येही सध्या कार्यकर्त्यांच्या संघटनात्मक बांधणीचे काम सुरू झाले आहे.
- प्रबोधिनीच्या कार्यप्रणालीचा प्रसार करण्यासाठी संस्थात्मक आणि संघटनात्मक रचना उभ्या करणे, हे पुढील वर्षाचे उद्दिष्ट आहे.

## ० सांगली-कोल्हापूर परिसरात पूर काळातील मदत कार्य

- **ज्ञान प्रबोधिनी, निगडी –** पश्चिम महाराष्ट्रातील सांगली-कोल्हापूर जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्राच्या वतीने केंद्र स्तरावर पहिल्या टप्प्यातील मदतकार्य म्हणून विविध गावांमध्ये श्रमदान, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, शाळा स्वच्छता, शालेय साहित्याचे वाटप असे काम दि. १३ ते २५ ऑगस्ट २०१९ या कालावधीत बारा गटांनी केले. यात प्रामुख्याने पालक, शिक्षक, युवक व प्रबोधिनीच्या संपर्कात असलेले इतरही नागरिक सहभागी झाले होते. शिरोळ तालुक्यातील एकूण ४० गावांना कमी-अधिक प्रमाणात पुराचा फटका बसला. त्यातील २२ गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन प्रामुख्याने तेथील शाळांचे मुख्याध्यापक, सरपंच, गावातील तरुण मंडळी यांच्यासोबत झालेल्या भेटींमध्ये अकरा गावांमध्ये स्वच्छता व साहित्य वाटपाचे काम केले. प्रबोधिनीचा स्थानिक संपर्क म्हणून काम करत असलेला विनायकदादा माळी याच्या संपर्कातून तेथील भागांमध्ये निगडीतील सदस्यांनी प्रामुख्याने घर स्वच्छतेच्या, शाळा व मंदिराच्या स्वच्छतेच्या कामात तसेच साहित्य वाटपासाठी साहित्याचे वर्गीकरण करणे, तेथील लोकांना दिलासा देणे, तेथील प्रश्न समजून घेणे, चौकशी करणे अशा प्रकारच्या कामात स्थानिकांना मदत केली.

दि. १७ व १८ नोव्हें. रोजी निगडी केंद्रांचे उपप्रमुख मनोजराव देवळेकर आणि कार्यकर्ते समाधान सुसर हे सांगली-वाडी-कुरुन्दवाड-तेरवाड-हेरवाड इ. पूरग्रस्त गावांत मदत कार्यासाठी सहा पालकांबरोबर जाऊन आले. शाळा, सार्वजनिक सरकारी संस्था आणि गरीब घरांत, वस्त्यांमध्ये भेटी झाल्या. त्यातून मदतीची नेमकी गरज लक्षात आली. या दौऱ्यात श्रीराम इनामदार आणि पालक सतीश जोशी यांच्या संपर्कातून ३० गरजू छोट्या व्यावसायिकांची यादी मिळाली होती. त्यातील प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे सतरा जणांना थेट अर्थ साहाय्याची मदत केली. बांगडी व्यवसाय, शिवणकाम व अन्य विविध व्यवसायांस लागणाऱ्या साहित्यासाठी प्रत्येकी २ ते ५ हजार रुपये अशी रोख रक्कम दिली गेली.

- **युवती विभाग, पुणे –** सांगलीतील कार्यकर्ती प्राचीताई परांजपे हिच्या आवाहनाला प्रतिसाद देत पुणे केंद्रामार्फत युवती विभाग व ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतून इ. ९वीच्या विद्यार्थिनी व महाविद्यालयीन युवतींचा गट सांगलीला नगर वाचनालयात मदतीसाठी जाऊन आला. असे एकूण तीन गट दोन-दोन दिवसांसाठी तिथे जाऊन आले. तेथील एकूण सुमारे एक लाख चौतीस हजार पुस्तकांपैकी सुमारे पन्नास हजार पुस्तके या पुरामुळे खराब झाली होती. पुस्तकांवरील बुरशी वाढायच्या आधी त्यांच्या नोंदी करण्याची गरज होती संगणकावरील माहिती पुनर्स्थापित व्हायच्या आधी त्यांच्या याद्या झाल्या तर शासनाकडे पाठवायला आणि देणगीदारांना देणगीसाठी आवाहन करायला उपयोग होणार होता. पुण्याहून गेलेल्या तीन गटांचे चार दिवसांत मिळून ४०० तासांच्या वर काम झाले. नोंदी झालेल्या पुस्तकांची संख्या सुमारे १०,५०० होती. पुण्याहून आलेल्या या गटाच्या कामाचा परिणाम म्हणून तेथील स्थानिक युवागट काही प्रमाणात कामात सक्रीय झाला.
- **स्पर्धा परीक्षा केंद्र –** म्हैसाळ, औदुंबर, रावडेवाडी, पलूस, अंकलखोप, शिरोली या आपत्तीग्रस्त गावांमध्ये UPSC च्या ४० विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांच्या पुनर्बांधणीचे काम केले. निधी संकलन, पूरग्रस्तांना आवश्यक वस्तूंची खरेदी व वाटप, गावातील गरजू कुटुंबांचे सर्वेक्षण, मदत साहित्य आपत्तीग्रस्तांपर्यंत पोहोचवणे, गावांमधील गाळ काढणे, स्वच्छता करणे अशी श्रमदानाची कामे विद्यार्थ्यांनी केली. पूरग्रस्तांशी संवाद साधून त्यांना मानसिक आधार देण्याचे काम केले. विद्यार्थ्यांनी कामाचे अनुभव व त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेल्या बदलाविषयी चर्चा केली.
- **युवक विभाग मदतकार्य –** सांगली-कोल्हापूरमध्ये आलेल्या पुरादरम्यान मुख्यत: सांगली, औदुंबर, भुवनेश्वरवाडी, सूर्यगाव, म्हैसाळ, अंकली या गावांमध्ये मदतकार्य करण्यात आले. कामाचे स्वरूप सार्वजनिक स्वच्छता, मनपा शाळा स्वच्छता, नगर वाचनालयात भिजलेल्या हजारो पुस्तकांच्या नोंदी करणे, औषधांची मदत, चारावाटप, वैद्यकीय शिबिर आणि सर्वेक्षण असे प्रामुख्याने होते. औदुंबर गावातील स्वामी नारायण मठातील गाळ काढण्याचे काम मठातील सेवेकऱ्यांच्या मदतीने दिवसभर केले. तीन युवकांच्या गटाने सूर्यगाव या गावात जाऊन दहा ब्लँकेटची मदत दिली. चार कार्यकर्त्यांचा एक गट धनगाव या गावात काम करण्यासाठी गेला होता. अंगणवाडी, सार्वजनिक पाण्याची टाकी, ग्रामपंचायत कार्यालय अशा सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता केली. धनगाव गावातील गरजू कुटुंबांची यादी तयार करण्याचे कामसुद्धा युवकांनी केले. तीन युवकांच्या दुसऱ्या गटाने सुखवाडी, चोपडेवाडी, भिलवडी या गावात जाऊन परिस्थितीचा अंदाज घेऊन गरजू कुटुंबांची यादी तयार करण्याचा प्रयत्न केला आणि श्रमदानासाठी कामाची इतर ठिकाणे शोधली. भिलवडी आणि साखरवाडी गावातील आठ सार्वजनिक ठिकाणे गाळ काढून स्वच्छ करण्यात आली.

  माणेकशॉ दल : बिबवेवाडीमध्ये चालणाऱ्या माणेकशॉ दलावरील विद्यार्थी आणि मार्गदर्शकांनी मिळून १७००० रु, एवढी मदत गोळा केली. ही मदत त्यांनी स्वत:हून ठरवून घरोघरी फिरून गोळा केली, हे विशेष! त्या व्यतिरिक्त एकूण सुमारे १३ लक्ष रुपयांचे निधी संकलन झाले.

  सांगली येथील भुवनेश्वरवाडी-भिलवडी या भागात पूरग्रस्तांना ७० सौर दिव्यांचे वाटप करण्यात आले. हे सौर दिवे आणि सौर घट प्रबोधिनीच्या विभागात बनवलेले आहेत. कोल्हापूर- सांगली येथील कार्यकर्ते श्री. विजय निकम, श्री. अमर परांजपे, श्री. दातार यांनी या सौर दिव्यांचे वाटप केले.
- **ज्ञान प्रबोधिनी, हराळी –** हराळी केंद्रात कार्यकर्त्यांची तातडीची बैठक घेऊन तिकडच्या परिस्थितीचा अंदाज घेऊन स्वच्छतेची साधने, गुरांसाठी औषधे इ. घेऊन १६ ऑगस्ट रोजी बारा कार्यकर्त्यांचा पहिला गट सांगलीकडे रवाना झाला. अंकली, डिग्रज, गणेशवाडी, बामणी आणि औदुंबरवाडी या पाच गावांमध्ये शाळा व अंगणवाडी स्वच्छता, वडार वस्तीमध्ये जीवनावश्यक साहित्याचे वाटप तसेच पशु वैद्यकीय सेवा असे काम या गटाने केले. दि. १९ ते २१ ऑगस्ट रोजी इ. १०वीतील २३ विद्यार्थी कोल्हापूरला मदतकार्यासाठी गेले होते. कोल्हापूरमधील नरसोबाची वाडी, खिद्रापूर, बस्तवाड या गावांमधल्या शाळांमधील स्वच्छता त्यांनी केली. तसेच या मुलांनी घरोघरी जाऊन लोकांच्या अडचणी समजावून घेऊन त्यांना काही मदतही केली.

## ० पूरग्रस्त मदतकार्य

➤ **नागरी वस्ती मदत कार्य –** दि. २४ सप्टेंबर रोजी कात्रज येथे मोठा पाऊस पडून भिंत पडल्यामुळे पुण्यातील अनेक भागात पाणी शिरून खूप नुकसान झाले. गजानन महाराज मंदिराजवळील आंबेडकर वस्ती, अरण्येश्वर – तावरे कॉलनी, टांगेवाला कॉलनी, अण्णाभाऊ साठे नगर व जय मल्हार या वस्त्यांमध्ये पाणी शिरले. सर्व वस्त्यांमधून शिक्षण घेत असलेल्या मुला-मुलींची माहिती गोळा करण्यात आली. सर्वेक्षण होऊन माहिती गोळा केल्यावर ज्या मुलांना वस्तू देणार असे ठरवले गेले, त्या निवडक मुलांना वस्तू वाटपाच्या वेळेस बोलावले. त्यामुळे गोंधळ न होता सर्व वस्तू वाटप नीट पार पडले. शक्यतो एका घरात एक तरी वाटप होईल असे पहिले गेले. काही ठिकाणी अतिशय गरजू मुला-मुलींची माहिती तेथील कार्यकर्त्यांनी दिली. त्यावेळी वरील नियम बदलून सर्व मुलांना वाटप केले. ३री व ४थीच्या मुलांना छोट्या सॅक आणि पाच वह्या तर ५वी ते १२वीच्या मुलांना मोठ्या सॅक व सहा फुलस्केप वह्या दिल्या. मदतकार्य व सर्वेक्षण यामध्ये नागरी वस्ती अभ्यास गटाचे दहा कार्यकर्ते, वरील वस्तीतील पाच नवीन कार्यकर्ते व युवक-युवती विभागातील पंधरा सदस्य यांचा समावेश होता.

**मदत कार्य :** एकूण ८ वस्त्यांमध्ये १०७७ कुटुंबांचे सर्वेक्षण त्यापैकी ४७१ गरजू विद्यार्थ्यांना वाटप

| क्र. | वस्तीचे नाव | सर्वेक्षण | वाटप संख्या | क्र. | वस्तीचे नाव | सर्वेक्षण | वाटप संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आंबेडकर नगर | २३५ | १०० | ५. | अरण्येश्वर | ४५ | ११ |
| २. | दांडेकर पूल | ४९ | २६ | ६. | जय मल्हार | २० | ११ |
| ३. | आंबिल ओढा | ३३२ | १७५ | ७. | अण्णाभाऊ साठे | २८२ | ८६ |
| ४. | टांगेवाला कॉलनी | १४ | १४ | ८. | सर्व वस्त्यातील उरलेले (ताडीवाला रोड) | १०० | ४८ |

➤ **युवक विभाग –** दि. २४ सप्टें. २०१९ रोजी कात्रज तलावाच्या परिसरात ढगफुटी सदृश जोरदार पाऊस झाला. आंबील ओढ्याचे पाणी सहकारनगर भागामध्ये शिरले. बंगले, मोठ्या सोसायट्या, वस्त्या, इ. मध्ये पाणी शिरले. रात्री पाणी वाढू लागले तेव्हा त्या भागातील महाविद्यालयीन युवकांसाठी चालणाऱ्या टिळक दलातील काही युवकांनी सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी परिसरातील नागरिकांना पुष्कळ मदत केली. त्या भागातल्या युवकांनी पाहणी करून चार वस्त्या (आंबेडकर वसाहत, टांगेवाला कॉलनी इ.) आणि एक रुग्णालय अशा ठिकाणी मदत केली. एकूण ६० युवकांनी तीन दिवस काम केले. चिखल व अन्य प्रकारच्या घाणीची स्वच्छता करणे अशा प्रकारचे मुख्य काम होते.

## अभिमानास्पद कार्यासाठी पुरस्कार

१) डॉ. अय्याज तांबोळी (IAS, जिल्हाधिकारी, बिजापूर, छत्तीसगड) यांना The Indian express तर्फे दिला जाणारा 'Excellence in Governance' हा २०१९ चा पुरस्कार बिजापूर मधील आरोग्यविषयक कामासाठी मिळाला.

२) राहुल नांगरे (प्रथम सचिव, भारतीय उच्चायोग, लंडन) यांना राष्ट्रपतींच्या हस्ते प्रशासकीय सेवेतील अतिविशिष्ट रेकॉर्डसाठी २०२०चे सुवर्णपदक देण्यात आले. ज्ञान प्रबोधिनीच्या सदस्य मंडळ सभेमध्ये त्यांचा सत्कार करण्यात आला.

३) सायली धुरत (IPS, SP, अरारिया, बिहार) यांना निवडणूक काळामध्ये तात्काळ सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या निर्मितीसाठी राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला.

यश – UPSC ची परीक्षा देत असताना विद्यार्थी इतरही परीक्षा देत असतात. CAPF या परीक्षेत केंद्रातील सात विद्यार्थ्यांना यश मिळाले.

## श्रद्धांजली

पुण्यातील केएस्बी पंप्स् या कंपनीचे माजी कार्याध्यक्ष (चेअरमन) व मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती **श्री. अनंत सेटलवाड** यांचे दि. ३ ऑगस्ट २०१९ रोजी दुःखद निधन झाले. गेली सुमारे बारा वर्षे ते प्रबोधिनीच्या ग्रामीण स्त्री शक्ती प्रबोधन या कार्यासाठी दरवर्षी भरीव आर्थिक योगदान करीत होते. 'शब्द ते शक्ती' या प्रकल्पातून त्यांचा या प्रश्नाविषयीचा जिव्हाळा सर्वांना जाणवत असे. वेल्हे भागात अडचणीच्या गावी स्वतः जाऊन व राहून या मोठ्या उद्योगपतीने जी निरलस भावना इतकी वर्षे दाखविली तिला तोड नाही. वेल्ह्याच्या मुलींच्या 'जास्वंद गिरिकन्या सहनिवास' या वसतिगृहाच्या रूपाने त्यांची आठवण कायम स्मरणात राहील.

ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या ग्रामविकसन विभागातील निवृत्त ज्येष्ठ कार्यकर्ते **श्री. माधवराव देशपांडे** यांचे अल्पशा आजाराने दि. २ जानेवारी २०२० रोजी निधन झाले. महाराष्ट्रातील कोल्हापूर, धुळे, नंदुरबार व पुणे जिल्ह्यांमध्ये गोबर गॅस संयंत्रांची उभारणी करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. भोर आणि वेल्हे तालुक्यातील गावांमध्ये पाणलोट क्षेत्र विकासाचे कामही त्यांनी सुमारे तीस वर्षे केले. संस्थापकांचा लहान मुलांना परिचय व्हावा म्हणून त्यांनी ''गोष्टीरूप आप्पा'' हे चरित्रपर पुस्तक लिहिले होते.

# शालान्त निर्णय

### ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

प्रशालेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

१. गौतम राजहंस – ९८.६%

२. तन्वी जोशी – ९७.८%

२. मोहना बर्वे – ९७.८%

➤ राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा – शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी

१. अथर्व सूर्यवंशी २. प्रियांका दाते ३. प्रतीक चित्रे

४. ओम चव्हाण ५. अथर्व चौरे ६. गौरी ठोंबरे

### ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी

विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

परीक्षा दिलेले विद्यार्थी २२६.

### ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, सोलापूर

एकूण विद्यार्थी ८१ निकाल १००%

९०% पेक्षा अधिक – १९

७५ ते ९०% – ४९

संस्कृत १०० गुण प्राप्त – ५

शाळेत प्रथम – ९८.८%

सरासरी गुण – ८१.७%

### ज्ञान प्रबोधिनी विद्यालय, हराळी

शंभर टक्के निकाल

विशेष श्रेणी ३०, प्रथम १३, द्वितीय श्रेणी १

### ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे

विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. तर पहिल्या तिघी चांदखेड केंद्रात पहिल्या तीन आहेत.

विशेष श्रेणी ३२, प्रथम श्रेणीत २२, द्वितीय श्रेणी १

१. वैष्णवी वाजे – ९३.८०%

२. हर्षदा कडुसकर – ९३.६०% (गणितात ९९ गुण)

३. स्नेहा चोरगे – ९२.६०%

४. पायल गुंजाळ – ९०.४०%

५. शीतल कुंभार – ८८.८०%

➤ १२वी वर्ग उच्चमाध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा २०२० महाविद्यालय निकाल १००%

१. प्रियांका गायकवाड – ७६.३०%

२. दिव्या विधाटे – ५९.०७%

३. कोमल गायकवाड – ५६.७६%

### वेल्हे सहनिवास

१) सुनिता हिरवे – ८३.४०%

२) दिपाली पारठे – ८१.४०%

३) प्रियंका कोंढाळकर– ६७.२०%

४) शिल्पा खुळे – ६६.२०%

५) आशा हिरवे – ६०.००%

### आश्रम शाळा, पडसरे

४८ विद्यार्थी परिक्षेस बसले व सर्व उत्तीर्ण झाले.

### UPSC – अंतिम निकाल २०१८

५ एप्रिल २०१९ रोजी UPSC परीक्षेचा निर्णय जाहीर झाला. केंद्रातील पंधरा विद्यार्थी विविध प्रशासकीय सेवेसाठी निवडले गेले आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे –

१) स्नेहल धायगुडे

२) अक्षय अग्रवाल

३) मनोज महाजन

४) नचिकेत शेळके

५) निखिल राखेचा

६) क्षितीज तवरेज

७) सागर काळे

८) ऋजुता बनकर

९) विक्रम वीरकर

१०) प्रतीक खामटकर

११) शुभम ठाकरे

१२) सचिन पवार

१३) अर्चना वानखडे

१४) जयेश आहेर

१५) चंद्रशेखर घोडके

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र

## १. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

- **बौद्धिक विकसन** : १) सहाध्याय दिन, २) विशेष अभिरुची गट, ३) प्रकल्पातून अध्ययन, ४) विशेष व्याख्याने, ५) विद्याव्रत संस्कार (इ. ८वी साठी), ६) आषाढी एकादशी- वारीतील सहभाग, ७) स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन, ८) साप्ताहिक उपासना व चिंतन
- **शारीरिक कौशल्य** : १) दैनंदिन क्रीडादले, २) शिबिरे
- **नेतृत्वगुण विकास** : १) अग्रणी प्रशिक्षण शिबिर व अग्रणी प्रतिज्ञाग्रहण, २) प्रार्थनेनंतरचे वक्तृत्व, ३) गुरुपौर्णिमा, ४) अग्रणी तासिका
- **अध्यापक प्रशिक्षण व बैठका** : १) अध्यापक प्रशिक्षणे, २) पालक बैठका, ३) पालक-शिक्षक संघ बैठका

### ■ बौद्धिक विकसन

#### ○ सहाध्याय दिन

सहाध्याय दिनाच्या निमित्ताने २०१९-२० यावर्षी विद्यार्थ्यांनी अनेक संस्थांना भेटी देऊन नवीन अनुभव घेतले.

| वर्ग | उपक्रम / स्थळ |
|---|---|
| इ. ५वी | बालगंधर्व कलादालन |
| इ. ६वी | रूईया मुकबधिर विद्यालय |
| इ. ७वी | गुरुद्वारा, |
| | ज्ञान प्रबोधिनी परिसरातील जैवविविधता पाहणे |
| इ. ९वी | विज्ञानाश्रम, पाबळ |
| | राजा केळकर संग्रहालय |
| इ १०वी | नेहरू विज्ञान केंद्र आणि टाटा मूलभूत संस्था |
| अध्यापक व कर्मचारी सदस्य | किल्ले लोहगड |

#### ○ विशेष अभिरूची गट

दहा विद्यार्थ्यांच्या गटाने एखादा विषय शिकवण्याची मागणी केल्यास असा वर्ग सुरू करण्यात येतो. या वर्षी प्रशालेत पुढील विशेष अभिरूची गट सुरू आहेत - चीनी भाषा (स्तर १ व २), जर्मन भाषा, फ्रेंच भाषा, जपानी भाषा, खगोलशास्त्र, धडपड प्रयोगशाळा, बुद्धिबळ, जिम्नॅस्टिक्स, चित्रकला.

याबरोबरच राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (इ. ९, १०वी), ५वी व ८वी शिष्यवृत्ती, होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा हे वर्ग घेण्यात आले.

#### ○ प्रकल्पातून अध्ययन

इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी वर्षभर केलेल्या प्रकल्पांचे प्रदर्शन दि. २९ फेब्रु. २०१९ रोजी संध्याकाळी ४ ते ७ या वेळात प्रशालेत आयोजित केले होते. या कार्यक्रमास प्रशालेचे माजी विद्यार्थी व ज्येष्ठ तंत्रज्ञ मा. शिरीष देशमुख (तुकडी १९७४) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मा. शिरीषरावांनी डॉ. अब्दुल कलामांबरोबर विविध क्षेपणास्त्र तयार करताना घेतलेल्या सहभागाबद्दल चित्रफीत व प्रात्यक्षिकाद्वारे अनुभवकथन केले. मा. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सर्वोत्तम प्रकल्पांना बक्षीसे देण्यात आली. इ. ९वी वर्गासाठी दुपारी २ ते ३ या वेळात मा. शिरीष देशमुख यांचे 'क्षेपणास्त्र' या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

#### ○ विशेष व्याख्याने

| गट | व्याख्यान व व्याख्याते |
|---|---|
| ९वी, १०वी मुली | अनुभवकथन : वीणाताई बेडेकर |
| ५वी ते ८वी मुले-मुली | गणितातील संधी : रोहिणी जोशी |
| ८वी मुले | अनुभवकथन : प्रताप जगताप |
| ७वी, ८वी मुले-मुली | राष्ट्रीय व्याघ्रदिन : वरद बनसोड |
| ८वी मुले-मुली | प्रतिभाशाली लेखन : नेहा लिमये |
| ९वी, १०वी मुले | सैनिकांच्या शौर्यगाथा : सौ. अश्विनी पळणीटकर, सौ. हेमा रेणके |
| १०वी मुले-मुली | डिझायनिंगमधील करिअर : श्री. नितीन कुलकर्णी |
| ८वी ते १०वी मुले-मुली | रस्ते वाहतूक सुरक्षा जबाबदारी आपली : श्री. संजीव सोनावणे |
| १०वी मुले | नौदलातील संधी : कमांडर विनायक आपटे |

#### ○ विद्याव्रत संस्कार (इ. ८वी साठी)

इ. ८वी तील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी केला जाणारा हा महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्कार. याच्या अंतर्गत इ. ८वीच्या मुला-मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकसनाच्या दिशा दाखविणारी एक व्याख्यानमाला एप्रिल २०१९ ते जानेवारी २०२० या कालावधीत आयोजित केली होती.

संस्कार विधी दि. ८ व दि. ९ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. इ. ८वी मुलींच्या विद्याव्रत संस्कारासाठी सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र तज्ज्ञ मा. डॉ. अपर्णाताई श्रोत्री व डॉ. निशिकांत श्रोत्री व मुलांच्या

विद्याव्रत संस्कारासाठी प्रशालेचे माजी विद्यार्थी व स्त्रीरोग आणि प्रसूतिशास्त्र तज्ज्ञ डॉ. गिरीश गोडबोले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**○ आषाढी एकादशी– वारीतील सहभाग**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने युवक-युवती विभागातर्फे वारीच्या उपक्रमाची योजना केली होती. या वर्षी इयत्ता ८वी व ९वीच्या मुलांनी दिनांक १-२ जुलैला वाल्हे ते नीरा असा टप्पा केला. वारकऱ्यांबरोबर दिंडीत राहणे, वारकऱ्यांशी गप्पा मारणे, त्यांचे जीवन समजून घेणे, हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते.

वारी पुण्यात निवासी असताना इ. ५वी ते ७वीतील प्रत्येक मुलगा पथकशः वेगवेगळ्या दिंडीमध्ये जाऊन वारकऱ्यांशी बोलला. वारकरी किती वर्षं वारी करतात आणि त्यांना इतक्या लांब चालत जाण्याची ताकद कुठून मिळते, हे गप्पांमधून मुलांना समजलं. पथकशः एक-एक अभंग ठरवून मुलांनी तो पाठ केला व त्याचा अर्थ पण समजावून घेतला. आषाढी एकादशीनिमित्त दि. २३ जुलै रोजी इ. ७वी ते १०वीचे विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्रबोधिनीतील सर्व विभागांमधील सदस्य यांनी एकत्रित भजन गायन केले.

**○ स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन**

**१५ ऑगस्ट** – स्वातंत्र्यदिनानिमित्त मा. संचालक गिरीशराव बापट यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. मोठ्या गटासाठी 'जम्मू - काश्मीर - लडाख (१९४७ ते २०१९)' या विषयावर झालेल्या व्याख्यानात प्रशालेचा माजी विद्यार्थी हृषिकेशदादा कुलकर्णी (तुकडी २०१३) याने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्याने काश्मीरचा प्राचीन काळापासूनचा इतिहास व सद्यस्थितीचा आढावा घेतला. यापुढे अन्य भारतीयांनी जबाबदारीने व पुढाकाराने काश्मीरच्या विकासाचा प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगितले.

**२६ जानेवारी –** प्रजासत्ताक दिनानिमित्त मा. कार्यवाह, सुभाषराव देशपांडे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी इ. ५वी ते ७वीच्या गटासमोर युवती कार्यकर्त्या वीणाताई बेडेकर यांनी मणिपूर येथील त्यांच्या कामाचे अनुभव विद्यार्थ्यांसमोर कथन केले. इ. ८वी ते १०वीच्या गटासमोर युवक कार्यकर्ता श्रीरंगदादा टोके याने 'नागरिकत्व सुधारणा कायदा व भारतीयत्व' या विषयावर विवेचन केले.

**○ साप्ताहिक उपासना व चिंतन**

साप्ताहिक उपासनेत दर शनिवारी लहान गटात शक्तिमंत्र व शिवमंत्राची उपासना झाली. मोठ्या गटात शक्तिमंत्र, विरजामंत्र व गायत्रीमंत्राची उपासना झाली. उपासनेनंतर चिंतनामध्ये प्रशालेच्या खालील माजी विद्यार्थ्यांनी प्रशालेतील आपले अनुभव सांगितले.

| | |
|---|---|
| श्री. किरण पळसुले | (प्रथम तुकडी १९७३) |
| श्री. यशवंत चव्हाण | (तुकडी १९८० ) |
| श्री. रवींद्र कुलकर्णी | (तुकडी १९८४) |
| स्वातीताई महाळंक | (तुकडी १९८५ ) |
| सौ. रोहिणीताई पाटसकर-टिळक | (तुकडी १९८८) |
| श्री. सारंग जोशी | (तुकडी १९९०) |
| डॉ. मंदार देशमुख | (तुकडी १९९०) |
| सौ. रोहिणीताई ढवळे | (तुकडी १९९३) |
| प्राचीताई मेढेकर | (तुकडी १९९८) |
| पिनाकिनदादा कर्वे | (तुकडी १९९९) |
| अस्मिताताई अत्रे | (तुकडी २०००) |
| सायलीताई गानू | (तुकडी २०००) |
| अक्षयदादा आळतेकर | (तुकडी २०००) |
| मेधाविनीताई वाटवे | (तुकडी २००४) |
| श्रीजीतदादा कुंजीर | (तुकडी २००५) |
| नचिकेतदादा नित्सुरे | (तुकडी २००५) |
| प्रतापदादा जगताप | (तुकडी २००६) |
| पूर्वाताई दीक्षित-धोकटे | (तुकडी २००७) |
| ओंकारदादा निलंगे | (तुकडी २००७) |
| मृण्मयीताई वैशंपायन | (तुकडी २००८) |
| स्वप्नीलदादा इंदापूरकर | (तुकडी २०१३) |

## ■ शारीरिक कौशल्य

**○ दैनंदिन क्रीडादले**

युवती गटाकडे सोमवार ते गुरुवार दररोज व्यायाम व वर्गशः खेळ व इ. ७वी ते १०वी साठी खो-खो, कबड्डी, रोप, ॲथलेटीक्स् व काही बॉल गेम्स हे नियमितपणे झाले. दर शुक्रवारी पथकशः दल झाले. गणेशोत्सवामधे इ. ८वी ते १०वीच्या मुली बर्ची नृत्यात सहभागी झाल्या व विविध गणेश मंडळांच्या समोर प्रात्यक्षिके सादर केली.

युवक दलांवर इ.५वी ते ७वीच्या मुलांसाठी दैनंदिन व्यायामाबरोबर लंगडी, डॉजबॉल, दशहस्तांतरण, विंचूयुद्ध, घोडेस्वार, नौकायुद्ध इ. खेळ तर इ. ८वी ते १०वीसाठी रग्बी, बेसबॉल, कबड्डी, हँडबॉल, व्हॉलीबॉल, फुटबॉल हे खेळ नियमितपणे झाले. गणेशोत्सवामध्ये इ. ८वी ते १०वी मुले बर्ची नृत्ये व प्रात्यक्षिकांमधे सहभागी झाली. तर इ. ५वी ते १०वी मेळे, विक्री उपक्रम, अथर्वशीर्ष पठण यामध्ये सहभागी झाली.

**○ शिबिरे**

समूहजीवनाचा आनंद घेत त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये व वृत्ती आत्मसात करण्याच्या हेतूने विविध शिबिरे डिसेंबर अखेर घेण्यात आली. यामध्ये क्रीडा शिबिर, सामाजिक अनुभव शिबिर, तंबू शिबिर, अभ्यास शिबिर यांचा समावेश होता.

## ■ नेतृत्वगुण विकास

**○ अग्रणी प्रशिक्षण शिबिर**

दि. ३ व ४ जाने.ला अग्रणी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले व दि. १३ व १६ जाने. २०२० रोजी अनुक्रमे इ. ९वी मुली व ९वी मुले यांचा 'अग्रणी प्रतिज्ञाग्रहण' समारंभ झाला.

### ⭘ प्रार्थनेनंतरचे वक्तृत्व

नेतृत्वगुण संवर्धनाच्या दृष्टीने वक्तृत्व कौशल्य हे अत्यंत महत्त्वाचे कौशल्य आहे. संपूर्ण वर्षभरात प्रत्येक विद्यार्थी किमान एकदा सभेसमोर बोलतो. त्याप्रमाणे यावर्षी विद्यार्थ्यांनी नियोजित विषयांमध्ये वक्तृत्व सादर केले होते.

**गुरुपौर्णिमा –** अग्रणी योजनेअंतर्गत इ. १०वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपापल्या वर्गासाठी गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुपूजनाच्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन केले होते.

**अग्रणी तासिका –** इ. ५वी ते १०वीच्या अग्रणींनी आपापल्या वर्गावर विविध कौशल्ये शिकविण्यासाठी व माहितीपर अशा साप्ताहिक तासिका घेतल्या. वर्गाध्यापकांनी या तासिकांचे परीक्षण केले.

## ■ अध्यापक प्रशिक्षण व बैठका

### ⭘ अध्यापक प्रशिक्षणे

सन २०१९-२० मध्ये साप्ताहिक अध्यापक बैठकी, वर्गाध्यापक बैठकी, अधिमित्र बैठकी, विषय समन्वयक बैठकी याबरोबरच महिनाअखेर अध्यापक प्रशिक्षणाची सुरुवात झाली. त्या अंतर्गत अध्यापकांना मार्गदर्शक अशी काही व्याख्याने व कौशल्य प्रशिक्षणे झाली व विविध विषयांवर वाचन व चर्चा घेण्यात आल्या.

### ⭘ पालक बैठका

एप्रिल ते जून या कालावधीत इ. ५वी ते १०वी या वर्गांच्या पालक बैठका झाल्या. यात वार्षिक नियोजन, वर्गश: उपक्रम, मूल्यमापन, दले याविषयी माहिती देण्यात आली. जुलैपासून महिना अखेरीस एकेका वर्गाच्या पालकांशी 'मुक्त संवाद दिन' या पद्धतीने बैठकी झाल्या. यामध्ये पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रगतीबद्दल शिक्षकांकडून व्यक्तिश: माहिती घेतली.

### ⭘ पालक-शिक्षक संघ बैठका

यावर्षी दर दोन महिन्यांनी एक याप्रमाणे चार बैठका झाल्या. या बैठकांमध्ये शुल्क वाढीसंदर्भात ठराव, प्रशाला सुवर्णमहोत्सव, सीबीएसईने आयोजित केलेल्या परिषदेत मा. प्राचार्यांचा सहभाग, अभ्यासक्रम बदल, अन्य समस्या, सूचना इ. विषयांवर विचारांची देवाण-घेवाण झाली.

### ⭘ प्रासंगिक

**इंग्लिश डे -** दि. ७ व ८ जाने. रोजी इ. ५वी ते ८वी मुले आणि मुली यांनी 'इंग्लिश डे' साजरा केला. या निमित्ताने इंग्रजी नाटुकल्यांचे सादरीकरण व प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

**मराठी भाषा गौरव दिन -**दि. २७ फेब्रु. रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त इ. ८वी मुलींनी इ. ५वी ते ८वीच्या गटासमोर मराठी साहित्यातील निवडक कथा, कविता, लेखांचे वाचन केले.

✦✦✦

## ज्ञान प्रबोधिनी प्रमुख संकल्पना

### ◈ ज्ञान प्रबोधिनीने आदर्श मानलेले चार पथदर्शक राष्ट्रसंत ◈

**१) समर्थ रामदास  २) महर्षी दयानंद  ३) स्वामी विवेकानंद  ४) योगी अरविंद**

### ◈ चार प्रतिज्ञा

प्रथम : स्वतः निवडलेले राष्ट्रसेवेचे काम  द्वितीय : प्रबोधिनीचा उत्तरदायी घटक

तृतीय : प्रबोधिनीच्या आदेशानुसार काम  चतुर्थ : संन्यासी

### ◈ तत्त्वसप्तक

१. धर्मसंस्थापना (म्हणजेच समाजसंस्थापना)
२. हिंदू जीवनदृष्टी
३. जनी जनार्दन भाव
४. संघटना
५. विकास
६. उत्तमता
७. विज्ञानाभिमुखता

### ◈ कार्यकर्त्याचे गुण (कार्यकर्ता कसा असावा)

१. प्रतिसादी  २. उत्तरदायी  ३. सहयोगी  ४. नवनिर्मितीक्षम  ५) प्रेरणासंक्रामक

### ◈ नवीन उपक्रमाच्या विस्ताराचे सात टप्पे

१. चिंतन गट  २. अभ्यास गट  ३. पथदर्शक प्रकल्प  ४. रचनाबद्ध विभाग
५. सैद्धांतीकरण  ६. भौगोलिक विस्तार  ७. लोक चळवळ / शासकीय धोरणात समावेश

# २ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका या विभागाचे तीन उपविभाग कार्यरत आहेत, ज्यांच्याद्वारे विद्यार्थी, शिक्षक आणि संबंधित घटकांपर्यंत शिक्षणासंबंधी साहित्य पुरवले जाते, त्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणाला पूरक असे विकासासंबंधी पूरक उपक्रम घेतले जातात आणि त्यासाठी शिक्षकांची प्रशिक्षणे घेतली जातात.

- **बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र** : १) विकासमित्र, २) प्रज्ञा विकास कार्यक्रम, ३) विवेक इन्स्पायर, ४) छोटे सायंटिस्टस्, ५) ज्ञानसेतू, ६) मैत्री पुस्तकांशी, ७) संशोधन
- **शिक्षक प्रशिक्षण केंद्र**
- **शैक्षणिक साधन केंद्र**

## ■ बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र

### ० छोटे सायंटिस्टस्

- या उपक्रमाचे हे दहावे वर्ष. महाराष्ट्रात केपीआयटी उद्योग समूहाच्या अर्थसाहाय्यातून दोन ठिकाणी, पुणे जिल्ह्यातील शाळांच्या अर्थसाहाय्यातून एक उपक्रम, जालना एज्युकेशन सोसायटीच्या अर्थसाहाय्यातून एक असे छोटे सायंटिस्टस्चे चार उपक्रम होतात.
- चिपळूण, जि. रत्नागिरी येथील महाविद्यालयातील युवक गटाने तीन माध्यमिक शाळांमध्ये इ. ८वी व ९वी साठी विज्ञान प्रयोग तासिका घेतल्या. ज्ञान प्रबोधिनी मार्फत छोटे सायंटिस्टस् उपक्रमातील साधनव्यक्तींनी चिपळूण येथील युवकांना प्रशिक्षण व प्रयोग साहित्य संच दिले होते.
- मावळ व मुळशी तालुक्यातील २० शाळांतील निवडक विद्यार्थ्यांची समस्या परिहार स्पर्धा झाली.
- AFCONS Infrastructure Limited च्या अर्थसाहाय्यातून पडसरे आश्रमशाळा, ता. सुधागड जि. रायगड येथे 'छोटे सायंटिस्टस्' उपक्रम सलग दुसऱ्या वर्षी राबविण्यात आला. इ. ९वी साठीदेखील या वर्षी उपक्रम राबविण्यात आला. या शाळेतील इयत्ता ८वी आणि ९वीच्या निवडक विद्यार्थ्यांचा विज्ञान मेळावा झाला.
- सगळ्या कार्यक्रमांत सामाजिक बांधिलकी अंतर्गत संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते वेळोवेळी सहभागी होते.

### ० प्रज्ञा विकास कार्यक्रम

(प्रज्ञा विकास कार्यक्रम व अनुभव शाळा (खेळघर), पुणे व प्रज्ञा विकास कार्यक्रम, रोहा)

- पुण्यातील तीन नागरी वस्ती भागांत इ. १ली ते ५वीसाठी 'अनुभव शाळा' (खेळघर) व इ. ७वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी भारत फोर्जच्या अर्थसाहाय्यातून प्रज्ञा विकास कार्यक्रम गेल्या सहा वर्षांपासून सुरू आहे.
- अभ्यासाशी पूरक कौशल्ये, विविध कला प्रशिक्षणे, कल्पकता, अभिव्यक्ती, शारीरिक विकसन आणि स्वच्छता अभियान, पथनाट्य इ. उपक्रम घेतले जातात.
- या ठिकाणी संगणक शिक्षण देण्याचा प्रारंभ झाला. तीनही केंद्रांवर संगणकांची उपलब्धता आहे.
- २०१९ मध्ये मे महिन्याच्या सुट्टीत 'कल्पक बनूया' शिबिरात ८० विद्यार्थी सहभागी झाले होते.
- अकरावीत गेलेल्या १५ विद्यार्थ्यांची एक दिवसीय लोहगड-विसापूरला सहल गेली होती.
- विद्यार्थ्यांना रोज देण्यात येणाऱ्या पूरक आहाराचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत.
- वर्षभरात काही क्षेत्रभेटी, तसेच राष्ट्रीय सण व उत्सव साजरे केले.
- रोहा तालुक्यातील काही शाळांतील इयत्ता ८वी व ९वी साठी शाळेतील निवडक शिक्षकांद्वारे साप्ताहिक तासिका घेतल्या.
- अभ्यासपूरक कौशल्ये, विज्ञान प्रयोग, अभिव्यक्ती इ. वर तासिकांमध्ये प्रमुख भर होता.
- दोन टप्प्यांत शाळेतील शिक्षकांचे प्रशिक्षण झाले.
- इयत्ता १०वी साठी अभ्यास मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले.
- एक्सेल टिंकरिंग लॅब- विर्जोली, सानेगाव व खांब या गावांत प्रायोगिक तत्त्वावर रचना- अभियांत्रिकी, त्रिमितीय वस्तू बनविणे इ. साठीच्या साहित्य-साधनांचा समावेश.
- रोहा येथे छोटे सायंटिस्टस् च्या दोन मराठी पुस्तिकांचे प्रकाशन व एक विज्ञान शिक्षक प्रशिक्षण वर्ग.

### ० ज्ञानसेतू

- भारतातल्या आठ राज्यांमध्ये ११८ कार्यकर्त्यांद्वारे १२७६६ विद्यार्थ्यांसाठी ७८ कार्यशाळा.
- प्रकल्प समन्वयक कार्यकर्त्यांचे विशेष संपर्क दौरे.
- मुख्यतः हर्मन इन्स्पायर्ड संस्थेचे अर्थसाहाय्य.
- बाबुरावजी घोलप महाविद्यालय(सांगवी) येथे ज्ञानसेतूचे एक दिवसीय प्रशिक्षण- ६० विद्यार्थ्यांद्वारे सहा शाळांमध्ये जाऊन कार्यशाळा.
- १५ ऑगस्ट मेळावा- १५० स्वयंसेवक व कार्यकर्त्यांचा

मेळावा- प्रमुख पाहुणे श्री. अतुलचंद्र कुलकर्णी (IPS, CID, Additional Director General Police).

- आसामच्या पार्वतीपूर येथील भास्कर संस्कार केंद्र येथील २७ विद्यार्थी आणि पाच शिक्षकांच्या गटाचा प्रबोधिनीत स्नेह-बंध मैत्री दौरा-पुणे, निगडी आणि परिसराला भेट-जाने. २०२०.

**○ विकासमित्र प्रकल्प**

- बजाजच्या अर्थसाहाय्यातून तीन वर्षांसाठी जून २०१९ पासून वेल्हे तालुक्यातील सहभागी शाळांमध्ये प्रकल्प सुरू
- दर पंधरा दिवसांनी विकासिका- जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व खाजगी संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा एकूण ४६ शाळांतील इ. पाचवी, आठवी व अकरावीतील १७०० विद्यार्थी
- प्रत्येक शाळेत सरासरी दहा विकासिका
- समूहगायन, बौद्धिक खेळ, अभ्यास कौशल्ये व जीवन कौशल्यांचे प्रशिक्षण
- सहभागात्मक अध्ययन पद्धती व त्याला कृतीची जोड
- अध्यापक व विद्यार्थ्यांना वाचनासाठी ग्रंथालय पूरक साहित्यांचे वाटप
- निवडक २१८ प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी 'प्रज्ञा विकास कार्यक्रम'- प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीवर भर
- प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी व प्रकल्प व्यवस्थापनासाठी वेल्हे तालुक्याचे चार विभाग.
- दर महिन्याला एक दिवसीय 'शिक्षणदूत प्रशिक्षण कार्यक्रम' (४ समन्वयक, ३५ शिक्षणदूत)
- वर्षभरात दोन शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा (उपस्थिती- ५९)

**○ मैत्री पुस्तकांशी**

- HCLच्या अर्थसाहाय्यातून बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांतील निवडक ३१ शाळांमधील ३६०० विद्यार्थ्यांसाठी जुलै २०१९ पासून एका वर्षाचा प्रकल्प.
- सोनदरा गुरुकुल, बीड, हराळी केंद्र व अंबाजोगाई विस्तार केंद्र ही मुख्य केंद्रे.
- उद्देश : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, त्यांच्या शब्दसंपत्तीत वाढ व्हावी व मातृभाषेचे वाचन सुधारल्यावर त्यांना इतर विषयांचा अभ्यास आनंददायी पद्धतीने करता यावा.
- ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षक प्रशिक्षण केंद्र (प्रशिक्षण वर्ग व कार्यशाळा घेणे), छात्र प्रबोधन (विद्यार्थ्यांसाठी सुबोध द्वैमासिक, कृतिपुस्तिका व ग्रंथालय पेटी तयार करणे), तसेच प्रज्ञा मानस संशोधिका (विद्यार्थ्यांच्या चाचण्या घेणे) यांचा सहभाग.
- तासिका घेण्यासाठी 'वाचकदूतांची' नेमणूक व प्रशिक्षण.
- पाक्षिक तासिकांमध्ये प्रबोधन गीते, शब्दकोडी, कथाकथन, वाचन-उच्चार, भाषिक खेळ, अभिव्यक्ती.
- त्याशिवाय विद्यार्थ्यांसाठी प्रकट वाचन, हस्तलिखित, वाचकवीर बनूया इ. स्पर्धा, वाचक मेळावे, लेखन कार्यशाळा यांचे आयोजन.
- प्रकल्पाची सांगता म्हणून अतिशय उत्साहात तिन्ही केंद्रांवर साहित्य संमेलने.

**○ स्पर्धा परीक्षांमध्ये झळाळी**

- राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद व इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड
- छोटे सायंटिस्टस् उपक्रमात सहभागी शाळेतील विद्यार्थी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद प्रकल्प स्पर्धेत सहभागी-एका शाळेची निवड
- छोटे सायंटिस्ट्स प्रकल्पातील शाळांतील ४० प्रकल्प इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड स्पर्धेच्या जिल्हा-स्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये सहभागी- सहा प्रकल्पांची राज्यस्तरीय प्रदर्शनामध्ये निवड

**○ शालेय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग**

- ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या विद्यार्थ्यांमार्फत शालेय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन - इ. आठवीसाठी NMMS परीक्षेसाठी मार्गदर्शन
- छोटे सायंटिस्टस् उपक्रमांतर्गत सहभागी असलेल्या डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यानिकेतन या शाळेतील २१ विद्यार्थी उत्तीर्ण- पाच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती
- प्रज्ञा विकास कार्यक्रमांतर्गत सहभागी अकरा विद्यार्थी उत्तीर्ण- दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**○ संशोधन**

- एका संशोधन साहाय्यकाची विभागांतर्गत नियुक्ती. उपक्रमांवरील संशोधन सुरू
- इ. ५वीसाठी योजण्यात येणाऱ्या 'विद्यारंभ उपासनेचा मागोवा' हा प्रकल्प पूर्ण, त्याशिवाय अन्य संशोधनांत साहाय्य

## ■ शिक्षक प्रशिक्षण केंद्र

यावर्षी वर्गातील विषय-शिक्षणासंबंधी प्रशिक्षणापलीकडे शाळासमृद्धीसाठी मार्गदर्शनावर भर देण्यात आला. वर्षभरातील विविध वैशिष्ट्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम पुढीलप्रमाणे-

**○ प्रकल्प-आधारित अध्ययन-अध्यापन प्रशिक्षण**

- परामिता ग्रुप ऑफ स्कूल्स, करीमनगर, तेलंगणा यांच्या सात शाळांमध्ये यावर्षी प्रकल्प पद्धतीसंबंधी रचना-निर्मिती व पाठपुरावा सत्रे यावर भर देण्यात आला व त्या अनुषंगाने प्रशिक्षणे योजण्यात आली.
- विवेकानंद केंद्र शिक्षक प्रसार विभाग, आसाम येथे आर्यभट्ट अनुसंधानात्मक विज्ञान प्रकल्पाचे तिसरे वर्ष होते व मार्गदर्शक प्रशिक्षणावर भर दिला आणि एकूण उपक्रमाचे परीक्षण करण्यात आले. तेथे प्रकल्प प्रशिक्षणही घेण्यात आले.

**○ शिक्षक-प्रेरणा जागृती कार्यक्रम**

- रूप पालटू शिक्षणाचे शिबिर मे २०१९ मध्ये झाले. २९ शिक्षक सहभागी झाले होते.

- चिपळूण येथे चतुरंग प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक प्रेरणा जागृती वर्गाचे वर्षभरात चार टप्पे योजण्यात आले. वैशिष्ट्यपूर्ण व नावीन्यपूर्ण प्रयोगांना प्रोत्साहन म्हणून सत्रांचे आयोजन
- सांगली-मिरज-कुपवाड मनपा शाळा, मराठी अध्यापक संघ, पनवेल येथील शासकीय शिक्षण महाविद्यालयात विविध विषयांच्या प्रशिक्षणाच्या कार्यशाळा १) स्वविकास आणि कला-रसास्वाद, २) अभ्यास-कौशल्ये - विद्यार्थी व शिक्षक, समुपदेशक, ३) वाचनकौशल्य विकास
- मुलांना शिकवण्यात साहाय्य करण्याच्या, टाटा समूहाचे अर्थसाहाय्य असणाऱ्या, एका कार्यक्रमातील शिक्षकांचे विषयज्ञान, अध्यापनवृत्ती व अध्यापनपद्धतीवर आधारित मूल्यमापन केले.
- 'प्रशिक्षक'ह्या मोबाईल वरील application चा प्रसार केला.

## ■ शैक्षणिक साधन केंद्र

नेहमीप्रमाणेच वाढत्या मागणीनुसार व विभागातील तज्ज्ञतेनुसार अनेक विषयांवर साधन-निर्मिती व त्यावरील प्रशिक्षणाचे प्रकल्प झाले. वर्षभरातील थोडक्यात प्रकल्प पुढीलप्रमाणे-

### o दीक्षा / बालभारती

- मराठी, हिंदी व इंग्रजी अशा विविध माध्यमांतील इ. ७वी-८वी साठी विज्ञान व गणिताचे एकूण ५१३ व्हिडीओ करायचे काम पूर्ण झाले व एप्रिल ते जुलै २०२० या कालावधीत पुढील १९५ व्हिडीओ तयार होणार आहेत.
- दिशादर्शन प्रकल्पांतर्गत SEAGATE प्रकल्पातील सहभागी शाळांना ज्ञानवर्धन पेटीमध्ये मराठी माध्यमातील करीयर मार्गदर्शन व्हिडिओ देण्यात आले.
- त्याशिवाय मावळ, मुळशी, वेल्हा, भोर, पुरंदर येथील १२० विज्ञान शिक्षकांना दीक्षा ज्ञानवर्धन पेटीचे प्रशिक्षण देण्यात आले. पुणे, निगडी, हराळी येथेही प्रशिक्षणे घेण्यात आली.
- **सामाजिक बांधिलकी उपक्रमातील कर्मचाऱ्यांचा सहभाग** - ज्ञानवाहिनी तास, सेंगाती खेळ संच वाटप, वृक्षारोपण, आरोग्य संच वाटप, पूरग्रस्त मदतकार्य, रक्तदान शिबिर आयोजन, प्रबोधिनीच्या कार्यक्रमांत व मेळाव्यांत सहभाग घेण्याचे आयोजन करण्यात आले.

### o ज्ञान वाहिनी

- NTS, GMAT व ८वी शिष्यवृत्ती अशा स्पर्धा परीक्षांची तयारी, चीनी भाषा अध्ययन व प्रेरणा सेतूच्या माध्यमातून (देशा-विदेशातील प्रबोधकांच्या साहाय्याने) व अन्य करीयर मार्गदर्शन असे विविध मुख्यतः दूरस्थ कार्यक्रम एकूण ४५ तास झाले. प्रबोधिनीच्या शाळा तसेच पुण्यातील व जम्मू-काश्मीरमधील शाळांतून सहभाग होता.

### o निर्मित साधनांचा वापर

- Compete Prabodhini Way, HappyTeacher app, Learn Prabodhini Way तसेच सेंगाती खेळ संच या साधनांचा विद्यार्थी व शिक्षकांकडून परिणामकारक वापर व्हावा, यासाठी वाढता प्रसार व अन्य प्रयत्न करण्यात आले.

### o अन्य साधननिर्मिती

- यावर्षी विविध प्रकल्पांच्या अंतर्गत १५० गणिताच्या व्हिडिओंचे परीक्षण व १२वी साठी GMAT चे १५० प्रश्न तयार करण्याचे काम केले.

✦✦✦

### o समाधानकारक प्रकल्पपूर्ती- विवेक इन्स्पायर

- ज्ञान प्रबोधिनी आणि विवेकानंद केंद्र, अरुणाचल प्रदेश ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने २०१५-२०२० असा पंचवार्षिक प्रकल्प.
- केंद्राच्या शाळांमधल्या निवडक मुलांच्या बुद्धिमत्ता संवर्धन आणि क्षमता विकासासाठी प्रकल्प.
- ३० मार्च २०२० रोजी प्रकल्पविषयक सामंजस्य कराराची सांगता.
- मुख्यतः हर्मन इन्स्पायर्ड संस्थेचे अर्थसाहाय्य.
- वर्षभरात विविध शैक्षणिक कार्यशाळा आणि प्रकल्प समन्वयकांचा दौरा.
- या दौऱ्यात सहा जिल्ह्यांतील १५ शाळांना भेटी - ८वी ते १०वी विद्यार्थी, शिक्षक-पालकांचे संपर्क आणि प्रकल्पविषयक प्रतिसाद, १०वी तील विद्यार्थ्यांच्या चाचण्या, छायाचित्रे, शाळांमधील इतर दस्तऐवज.
- वाच. अजितराव कानिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे दस्तऐवजीकरण व अभिलेखनाचे काम.
- पाच वर्षांतील प्रक्रिया आणि कामाचा आढावा घेणारे वृत्त शैक्षणिक उपक्रम संशोधिकेत पाहायला उपलब्ध.
- संस्थात्मक, संशोधनात्मक व शिबिरांतून घेतलेल्या विषयांशी निगडित साहित्य निर्मिती.
- प्रकल्पाच्या निमित्ताने प्रबोधिनीत दूरस्थ प्रज्ञा विकासाचा एक मोठा प्रयोग.
- भविष्यात आदिवासी गटासाठी प्रज्ञा विकास प्रकल्प राबविण्यासाठी अभ्यासात्मक शिदोरी.
- या प्रयोगातून लक्षात आलेले प्रज्ञा विकासाचे नवीन पैलू, दूरस्थ कार्यवाही विषयक मुद्दे, संशोधनात्मक बाबी आणि अरुणाचल प्रदेशात तयार झालेले नवीन संपर्क हे प्रबोधिनीचे संचित!

# शैक्षणिक उपक्रम संशोधिका

## संख्यात्मक व भौगोलिक विस्तार आढावा

| प्रकल्प | उद्दिष्ट/ वैशिष्ट्य | भौगोलिक क्षेत्र | विद्यार्थी | शिक्षक | शाळा/ संस्था | कार्यकर्ते/ समन्वयक | प्रशिक्षण/शिबिर/ दौऱ्याचे दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **छोटे सायंटिस्ट्स** | चार विविध मॉडेल्स मावळ-मुळशी, पडसरे, जालना, चिपळूण | पुणे जिल्हा, पिंपरी-चिंचवड म.न.पा. | ५५०६ | - | ८९ | १७४ | - |
| **विकासमित्र** | पाक्षिक विकासिका | वेल्हे तालुका | १७०० (२१८- प्रज्ञा विकास) | ५९ (शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा) | ४६ | ४ समन्वयक + ३५ शिक्षणदूत | - |
| **मैत्री पुस्तकांशी** | सोनदरा गुरुकुल, बीड, हराळी केंद्र, अंबाजोगाई विस्तार केंद्र | बीड, उस्मानाबाद जिल्हा | ३६०० | - | ३१ | | |
| **ज्ञानसेतू** | | ८ राज्ये | | १२७६६ | - | ७८ | ११८ |
| **विवेक इन्स्पायर** | | अरुणाचल प्रदेश ६ जिल्हे | ४५० | | १९ | २० | १९ +५० पूर्वतयारी |
| **प्रज्ञा विकास** | प्रज्ञा विकास, पुणे, अनुभव शाळा, पुणे, प्रज्ञा विकास, रोहा | पुणे शहर- केशवनगर - मुंढवा येथील मध्यवस्ती व गायरान वस्ती, तसेच हडपसर मधील महात्मा फुले वस्ती, रोहा | | | | १३ (रोहा) | |
| **शिक्षक प्रशिक्षण केंद्र** | प्रशिक्षणाचे मनुष्यदिवस ३९३० | महाराष्ट्र, आसाम, अरुणाचल प्रदेश, मध्य प्रदेश, नागालँड, तेलंगणा | - | १७६० | ३३३ | - | १०५ (५२० प्रशिक्षणाचे तास) |

✦✦✦

# ३ छात्र प्रबोधन

- अंकातील लेखांना QR कोडची जोड व उद्योजकता विशेषांक प्रकाशित
- नित्य, सुबोध, इंग्रजी मिळून ३८ हजार दिवाळी अंकांची नोंदणी व महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'उत्कृष्ट बाल कुमार मासिक दिवाळी अंक' पुरस्कार
- 'मैत्री पुस्तकांशी' व 'विकास मित्र' प्रकल्पांसाठी साहित्य निर्मिती
- 'ऐपावा' उपक्रमात १५ Whats app गटांमध्ये २२१० सदस्य

### मासिक

वर्षभर नियमितपणे छात्र प्रबोधनचे नित्य मासिक व ग्रामीण भागासाठी सुबोध कुमार द्वैमासिक अंक प्रकाशित झाले. अंकातील साहित्याला QR कोडची जोड देण्यात येत आहे. वर्षभरातील सर्व अंकांची छपाई दुरंगी आहे. यावर्षी **उद्योजकता विशेषांक** प्रकाशित करण्यात आला. या अंकात धडपडणाऱ्या मुलांच्या कहाण्या, मान्यवर उद्योजकांचे संदेश, 'नसत्या' उद्योगातून शिक्षण ही लेखमाला, उद्योग जगतातील दिग्गज असे श्री. रतन टाटा यांच्यावरील प्रेरणादायी लेख अशा अनेक पूरक साहित्याने हा अंक समृद्ध झाला. 'छात्र प्रबोधन' च्या सभासदांशिवाय अन्य सुमारे ४००० धडपडणाऱ्या, उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या मुलामुलींना हा अंक मोफत दिला गेला. हा अंक मोफत पोहोचवण्यासाठी १३ उद्योजकांनी भरीव अर्थसाहाय्य केले.

### दिवाळी अंक

| दिवाळी अंक नोंदणी संख्या | नोंदणी केलेली केंद्र संख्या |
|---|---|
| १००१ पेक्षा जास्त | ६ |
| ५०१ ते १००० | ६ |
| २०१ ते ५०० | १८ |
| १०० ते २०० | १४ |

नित्य, सुबोध व इंग्रजी या तीन अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी ३८ हजार होती. नित्य मराठी अंकात **'जागवू संवेदना'** हा विशेष विभाग, ग्रामीण अंकात **'जिद्द'** हा विशेष विभाग तर इंग्रजी अंकात **'Inspiring true stories of people who have overcome great obstacles in life'** हा विशेष विभाग होता. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा **'उत्कृष्ट बालकुमार मासिक' हा पुरस्कार** या वर्षीच्या नित्य दिवाळी अंकाला श्री. आनंद अंतरकर यांच्या हस्ते मिळाला. या वर्षी एकूण ८६ स्थानिक केंद्रांवर सर्व केंद्रप्रमुखांनी स्वयंसेवी वृत्तीने दिवाळी अंकांची नोंदणी व वितरण केले. नेतृत्व संवर्धन केंद्राच्या विद्यार्थ्यांच्या साहाय्याने सर्व केंद्रांवर दिवाळी अंकांचे वितरण पूर्ण झाले.

### साहित्य निर्मिती

शैक्षणिक उपक्रम संशोधिकेतर्फे **'विकास मित्र'** (द्वारा - बजाज ऑटो लि.) आणि **'मैत्री पुस्तकांशी'** (द्वारा - HCA) अशा दोन प्रकल्पांसाठी साहित्य निर्मिती छात्र प्रबोधन विभागातर्फे झाली. छात्र प्रबोधन मधील पूर्वप्रकाशित कथा, कविता, ललित लेख यांची निवड करून एक पानी लॅमिनेटेड पुस्तिकेचे ४० संच व आठ पानी पुस्तिकांचे ४० संच प्रकाशित झाले. असे १०० संच प्रकल्पातील सहभागी शाळांना दिले गेले. तसेच सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त शाळांमध्येही १०० संच वितरित केले गेले. ५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी सुबोध किशोर द्वैमासिक अंकाची निर्मिती केली गेली. या प्रत्येक अंकामध्ये वाचन कौशल्य व भाषा कौशल्य विकसनासाठी आठ पानी पुरवणी दिली गेली. याशिवाय दोन कृतिपुस्तिकाही प्रकाशित करण्यात आल्या. यामध्ये वाच. भाग्यश्री हर्षे, मा. शैलजा देशमुख व कार्यकारी संपादिका शिल्पा कुलकर्णी यांनी प्रामुख्याने साहित्य निर्मिती केली.

### प्रकाशने

'Be Creative', 'असे घटते सुंदर अक्षर' या पुस्तकांचे पुनर्मुद्रण, 'अभ्यासातील स्वावलंबन वेध यशाचा - भाग १' याची दुसरी आवृत्ती, 'वाचलेच पाहिजे भाग - ३' याची पहिली आवृत्ती प्रकाशित करण्यात आली.

### साहित्य मेळावे

छात्र प्रबोधनच्या अंकांवर आधारित वेगवेगळ्या शाळांमध्ये व वस्त्यांमध्ये जाऊन 'छात्र प्रबोधन' विभागातील सदस्य, नेतृत्व संवर्धन केंद्राचे ३२ विद्यार्थी व स्थानिक केंद्रांवरील कार्यकर्ते मिळून ३५ ठिकाणी मेळावे घेतले गेले. यंदाच्या वर्षी नऊ शाळा व तीन वस्त्यांमध्ये नव्याने मेळावे घेतले गेले. डोंबिवली, इचलकरंजी, भोर, चिपळूण, पुणे या गावांमधल्या शाळांमधील व वस्त्यांतील सहभागी मुलामुलींनी उत्स्फूर्तपणे मेळाव्यांना प्रतिसाद दिला.

### स्पर्धा

विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यासाठी व त्यांना गटात काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी छात्र प्रबोधन द्वारा राज्यस्तरीय **'अभिवाचन स्पर्धा'** व **'तुम्हीच संपादक व्हा! हस्तलिखित स्पर्धा'** अशा दोन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दोन्ही स्पर्धा विभागस्तर व राज्यस्तर या दोन स्तरावर घेण्यात आल्या. स्पर्धेची गुणवत्ता वाढण्यासाठी **स्पर्धेपूर्वी विद्यार्थ्यांसाठी दोन्ही विषयांच्या कार्यशाळेचे विभागश: आयोजन केले होते.** ऑगस्ट महिन्यात पुण्यात घेण्यात आलेल्या **'अभिवाचन**

**कार्यशाळे'ला** शंतनु पांडे, अंजली कुलकर्णी व आश्लेषा महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच जानेवारी महिन्यात झालेल्या **'लेखन–संपादन कार्यशाळे' ला** संगीता पुराणिक यांनी लेखन कसे करावे व छात्र प्रबोधनच्या कार्यकारी संपादिका शिल्पा कुलकर्णी यांनी संपादन कसे करावे याचे मार्गदर्शन केले. दोन्ही स्पर्धा मिळून एकूण रु. २७,०००/– ची बक्षीसे पुस्तकरूपाने दिली गेली.

- **अभिवाचन स्पर्धा –** 'छात्र प्रबोधन'च्या साहित्यावर आधारित राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धा सप्टेंबर २०१९ मध्ये आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण ५६ संघातून ४५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. ही स्पर्धा **पुणे, डोंबिवली, मालेगाव, अमरावती, अंबाजोगाई व नांदेड** या ठिकाणी झाली. या स्पर्धेत विभागस्तरीय दोन क्रमांक तर राज्यस्तरीय तीन क्रमांक व एक उत्तेजनार्थ अशी बक्षिसे पुस्तकरूपाने देण्यात आली. स्पर्धेचे हे चौथे वर्ष होते.
- **हस्तलिखित स्पर्धा – 'तुम्हीच संपादक व्हा!'** हस्तलिखित स्पर्धा जानेवारी २०२० मध्ये आयोजित केली होती. **स्पर्धेचे हे बाविसावे वर्ष होते.** निर्जीव वस्तूंमधील संवाद, गुप्त संदेश, कविता, लोकमान्य टिळकांच्या जन्मशताब्दी प्रीत्यर्थ त्यांच्या विषयीचे साहित्य, यंदाच्या पूर परिस्थिती विषयीचे अनुभव, मते, विचार असे विविध विषय या वर्षीच्या हस्तलिखित स्पर्धेसाठी देण्यात आले होते. **पुणे, नाशिक, सांगली, अंबाजोगाई, बारामती, मालेगाव, डोंबिवली** या सात ठिकाणी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत महाराष्ट्रभरातून ९२ संघ सहभागी झाले होते. त्यात एकूण ७५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत विभागस्तरीय दोन तर राज्यस्तरीय तीन क्रमांक व दोन उत्तेजनार्थ बक्षिसे दिली गेली.

### ० निवासी कार्यशाळा

अभिवाचन स्पर्धेत उत्कृष्ट अभिवाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व इतर विद्यार्थ्यांसाठी २८ ते ३० मे २०१९ रोजी तीन दिवसांची निवासी कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेमध्ये अभिवाचनासाठी कथा, कविता, ललित लेख, प्रवासवर्णन यांचे अभिवाचन कसे करायचे? त्यांची निवड कशी करावी? या विषयीची सत्रे घेण्यात आली. विविध साहित्य प्रकारातील मान्यवरांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. या विद्यार्थ्यांनी **'महाराष्ट्र साहित्य परिषदे'** ला भेट दिली. त्यावेळी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. अरुणाताई ढेरे यांची भेट घेतली व त्यांच्याशी गप्पा मारल्या. विद्यार्थ्यांसाठी ही एक छान पर्वणीच होती. उत्साही वातावरणात कार्यशाळा झाली. अंबाजोगाई, नाशिक, कराड, पुणे अशा विविध शहरातून एकूण ३० मुलांनी या निवासी कार्यशाळेत सहभाग नोंदवला. घरी जाताना विद्यार्थ्यांना भावना अनावर झाल्या होत्या.

### ० कार्यानुभव

मे महिन्याच्या सुट्टीत कुमार वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी कार्यानुभव शिबिर आयोजित केले होते. मासिक चालवण्यासाठी कोणकोणती कामे असतात? ती कशी करायची? याचे प्रशिक्षण यामध्ये दिले जाते. विद्यार्थ्यांकडून जुलैच्या विद्यार्थी विशेषांकाची तयारीही करून घेतली गेली. या विद्यार्थ्यांमधूनच विद्यार्थी संपादक मंडळ तयार झाले. १२ विद्यार्थ्यांनी ५ ते ८ दिवसांमध्ये सरासरी २० तास काम केले.

### ० प्रशिक्षण

यावर्षी पुण्याबाहेर जुलै २०१९ मध्ये अहमदपूर, जि. लातूर येथे **'संयोजक प्रशिक्षण शिबिर'** घेण्यात आले. दोन शाळांमधील नऊ शिक्षक सहभागी झाले होते. त्याचबरोबर साहित्य मेळावे घेण्यासाठी पुण्यात प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये मेळावे कसे घ्यावेत? मेळाव्यामध्ये कोणते साहित्य प्रकार व कलाकृती घ्याव्यात? या संबंधींचे प्रशिक्षण दिले गेले. **'मैत्री पुस्तकांशी'** या प्रकल्पांतर्गत सहभागी झालेल्या वाचकदूतांसाठी शैक्षणिक सत्रांच्या सुरुवातीला एकूण दोन वेळा कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये ग्रंथालयाचा वापर कसा करावा? मेळावे कसे घ्यावेत? स्पर्धा कशा घ्याव्यात? यासंबंधीचे प्रशिक्षण दिले गेले.

### ० विभागांतर्गत कार्यक्रम

- अंध उद्योजक श्री. भावेश भाटिया यांचा लेख छात्र प्रबोधन मासिकात प्रकाशित झाला होता. महाबळेश्वर येथे त्यांचा मेणबत्तीचा कारखाना आहे. एक अंध व्यक्ती एवढा मोठा कारभार चालवते या उत्सुकतेपोटी विभागातील सर्व सदस्यांनी त्यांच्या महाबळेश्वर येथील कारखान्याला भेट दिली. अंध असूनही एका उत्साही व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू बघायला मिळाले. तसेच जवळच असलेले पुस्तकांचे गाव–'भिलार' येथेही सदस्यांनी भेट दिली. असा **एक दिवसीय सहली**चा आनंद विभागातील सदस्यांनी घेतला.
- गदिमांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने विभागातील सदस्यांनी **गदिमांच्या साहित्यावर आधारित गणेशोत्सवाचा कार्यक्रम** केला. या कार्यक्रमात सर्व सदस्य सहभागी झाले होते.
- 'छात्र प्रबोधन' व 'नेतृत्व संवर्धन केंद्र' या विभागांचा मिळून **मातृभूमी पूजनाचा** कार्यक्रम झाला. तसेच दिवाळी अंकांच्या धामधुमीनंतर लक्ष्मीपूजन व सरस्वतीपूजनाचा कार्यक्रम झाला. श्रमपरिहारासाठी छोट्या खेळांचे व सहभोजनाचे आयोजन केले होते.

### ० ऐपावा उपक्रम

मार्च महिन्यात सुरू झालेल्या करोना संकटामुळे विद्यार्थ्यांपर्यंत साहित्य कसे पोचवता येईल, या विचारातून **ऐपावा (ऐका–पाहा–वाचा)** हा ऑनलाईन उपक्रम राबवण्यात आला. Whatsapp च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे एकूण १५ गट तयार करण्यात आले. त्यामध्ये २२१० सदस्य सहभागी झाले होते. दररोज ऐकण्यासाठी, वाचण्यासाठी व पाहाण्यासाठी अशी प्रत्येकी एक लिंक पाठवली गेली. या उपक्रमाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

✦✦✦

# ४ नेतृत्व संवर्धन केंद्र

- स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी चालविल्या जाणाऱ्या फौंडेशन व प्रिपरेटरी वर्गात ८५ विद्यार्थी सहभागी
- विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने सात महाविद्यालयांमध्ये १३ दिग्गजांची संकल्प व्याख्यानमाला - २००० युवक-युवती सहभागी, २५० युवक-युवतींनी ग्रेट-भेट स्पर्धेच्या माध्यमातून ६० दिग्गजांच्या मुलाखती घेतल्या
- सांगली येथे पूरग्रस्त मदतकार्यात विशेष सहभाग
- भारताच्या तीन सीमावर्ती राज्यांत ज्ञानसेतू मार्फत अभ्यासदौरे

## ■ विशेष उल्लेखनीय प्रासंगिक उपक्रम

नेतृत्व संवर्धन केंद्रात शिकणाऱ्या, यापूर्वी शिकलेल्या सगळ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या पुढाकाराने, स्वत:चा गट बांधत महाविद्यालयांमध्ये उपक्रम योजावेत असा आग्रह धरला जातो. गेली तीन वर्षे पुण्यातल्या विविध महाविद्यालयांमध्ये असे कार्यक्रम घडवले जात आहेत. यंदा या उपक्रमांनी संख्या आणि गुणवत्ता यामध्ये नवीन उंची गाठली!

### ० संकल्प व्याख्यानमाला

यावर्षी सात महाविद्यालयांमधे मिळून एकुण ११ व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमाले द्वारे तेरा दिग्गजांची व्याख्याने विविध महाविद्यालयांमधील २००० विद्यार्थ्यांनी ऐकली. नेतृत्व संवर्धन केंद्रातील ३० विद्यार्थ्यांनी जबाबदारी घेऊन या उपक्रमासाठी काम केले तर महाविद्यालयांतील इतर ६० स्वयंसेवक या व्याख्यानांच्या आयोजनामध्ये सहभागी झाले होते.

मॉडर्न कॉलेज (शिवाजीनगर), मॉडर्न लॉ कॉलेज (गणेशखिंड रोड), एच. व्ही. देसाई कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, गरवारे कॉमर्स कॉलेज, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय अशा एकूण सात महाविद्यालयांमध्ये कु. अपूर्वा जोशी (अर्थ क्षेत्र), श्री. किरण पळसुले (माजी AVM, भारतीय वायुसेना), श्री. विशाल सोळंकी (IAS), श्री. रवींद्र शिसवे (IPS), श्री. डी. डी. कांबळे (माजी न्यायाधीश), दीपक चटप, श्री. अतुलचंद्र कुलकर्णी (प्रशासकीय), श्रीमती. सीमंतिनी खोत (शेती), श्री. श्रावण हर्डीकर (प्रशासकीय), श्री. योगेश कुलकर्णी व श्री. मुकेश कणसकर (शैक्षणिक व सामाजिक), श्री. आदित्य शिंदे (शैक्षणिक) व मा. संदीप पाटील (प्रशासकीय) यांची अनुभवकथने /मुलाखती झाल्या.

### ० Great भेट मुलाखत स्पर्धा

२१ महाविद्यालयांतील २५० हून अधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. १८ वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या ८४ दिग्गजांच्या मुलाखती या स्पर्धेत घेण्यात आल्या. स्पर्धेच्या नियमांप्रमाणे ६३ गटांनी त्यांचे submission पूर्ण केले. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ ८ मार्च रोजी पार पडला. या कार्यक्रमासाठी मा. रेणुताई गावस्कर (सामाजिक कार्यकर्त्या) व मा. डॉ. नितिन करमळकर (कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) प्रमुख पाहुणे म्हणून आले होते.

## ■ नियमित वर्ग आणि अनुभवशिक्षण

नियमित वर्ग व त्यासोबतच अनेक उपक्रमांनी हे वर्ष भारलेले होते. केंद्रातील सर्व सदस्यांनी या सर्व उपक्रमांमधे सहभागी होऊन उपक्रम नवीन उंचीवर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. 'समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काम करताना प्रत्येक काम त्या दृष्टीने उत्तम व्हावे, यासाठी प्रयत्न करण्यात आले. नियमित वर्गासाठीची प्रवेश परीक्षा असो की वर्षाच्या शेवटी घेतली जाणारी अंतिम मुलाखत, या सर्व ठिकाणी उत्तमतेचा आग्रह होता.

### ० युवोन्मेष (नेतृत्व विषयाला वाहिलेले मासिक)

या वर्षी दिवाळी अंकासह पाच नित्य अंक प्रकाशित केले गेले. दिवाळी अंकाची संपूर्ण जबाबदारी यावेळी नेतृत्व संवर्धन केंद्राने उचलली होती. अंकासाठीची आर्थिक रचना उभी करणे, नोंदणी करणे, या जबाबदाऱ्या नव्याने केंद्राकडे देण्यात आल्या होत्या. या वर्षी ३२०० अंकांची नोंदणी करण्यात आली व ४४ पान प्रायोजक व दहा जहिरातींच्या माध्यमातून आर्थिक रचना उभी केली गेली. यासाठी केंद्रातील विद्यार्थ्यांसह छात्र प्रबोधनच्या

| वर्ग तपशील | स्पर्धा परीक्षा तयारी (प्रिपरेटरी) | नेतृत्व पायाभरणी (फाऊंडेशन) |
|---|---|---|
| **जिज्ञासा १४ :** ६४ विद्यार्थी (३५ युवती व २९ युवक) | GS & CAST : १००<br>UPSC Allied Sessions : १०३<br>नेतृत्व पायाभरणी नियमित सत्र : ४४ | १८ दिवसांचे निवासी व अनिवासी उपक्रम (रात्र गिरीभ्रमण सहल, ग्रामीण परिचय शिबिर, सायकल सहल, नेतृत्व शिबिरे इ.) |
| **आकांक्षा ७ :** २१ विद्यार्थी (१३ युवती व ८ युवक) | GS & CAST : १२१<br>UPSC Allied Sessions : ८०<br>नेतृत्व पायाभरणी नियमित सत्र : ३० | १५ दिवसांचे निवासी व अनिवासी उपक्रम (तालुका अभ्यासदौरे, जिल्हा अभ्यासदौरा, अभ्यास शिबिर, नेतृत्व शिबिर इ.) |

केंद्रप्रमुखांचे सहकार्य लाभले. महाराष्ट्रात विविध ठिकाणी नोंदणी करणाऱ्या या केंद्रप्रमुखांकडे छात्र प्रबोधन दिवाळी अंकांचे वितरण केंद्रतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने केले.

## ■ अन्य प्रासंगिक उपक्रम

### ○ माजी विद्यार्थी संपर्क

२०१३ पासून केंद्रात प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा संपर्क दृढ व्हावा, यासाठी काही कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरले. व त्यानुसार ६५० विद्यार्थ्यांना संपर्क करून त्याची माहिती अद्ययावत करण्यात आली. या विद्यार्थ्यांचा मेळावा दि. ७ डिसें. २०१९ रोजी घेण्यात आला. एकूण १३० विद्यार्थी या मेळाव्याला उपस्थित होते. या विद्यार्थ्यांच्या तीन गटांमधे गटचर्चा घेण्यात आल्या. स्पर्धा परीक्षा तयारी करणारा नवीन गट (० ते २ प्रयत्न), स्पर्धा परीक्षा तयारी करणारा जुना गट (दोन पेक्षा अधिक प्रयत्न) व स्पर्धा परीक्षा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात काम करणारा गट असे तीन गट करण्यात आले. या गटांनुसार पुढील उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. हा मेळावा फक्त get together न होता गटात अभ्यासपूर्ण चर्चा झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला व अशा उपक्रमांची वारंवारिता वाढवावी असा feedback त्यांच्याकडून मिळाला.

### ○ अभ्यासदौरे

यावर्षी ज्ञानसेतू या EARC च्या उपक्रमाशी जोडूनच अभ्यास सहलींचे आयोजन करण्यात आले होते. त्यांचे तपशील पुढीलप्रमाणे;

- **उत्तराखंड अभ्यासहल –** दि. ८ ते २३ मे २० दरम्यान या अभ्याससहलीत चार सदस्य सहभागी झाले होते. ज्ञानसेतू उपक्रमाच्या अंतर्गत पाच शाळांमधील ५५० विद्यार्थ्यांशी संपर्क झाला. याशिवाय कापकोट येथील ग्राम्या व वनपंचायत कार्यालय, कैवल्य एज्युकेशन फाऊंडेशन, डेहराडून येथील इंडिअन मिलिटरी अकॅडमी, फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट तर मसुरी येथील LBSNAA येथे भेटी दिल्या. अथर्व कुलकर्णी- (IMA), सौरभ सोनावणे (IAS, LBSNAA) या प्रबोधकांशी गटाचा संवाद झाला.
- **मेघालय अभ्याससहल –** दि. १४ मे ते १ जून २०१९ दरम्यान झालेल्या या अभ्याससहलीत पाच सदस्य सहभागी झाले होते. ज्ञानसेतू उपक्रमाच्या अंतर्गत पाच शाळांमधील सुमारे ९०० विद्यार्थ्यांशी यावेळी संपर्क झाला. याशिवाय सेवा भारती संस्थेला भेट दिली. प्रवीण शेवाळे, डेलीना खोगडूप (वकील) या सामाजिक कार्यकर्त्यांशी संपर्क झाले. श्री. संजय थाडे (IAS), डॉ. धनंजय घनवट (IPS), श्री. चिन्मय गोतमारे (IAS) व सायली ढोले (IRS) या प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संवाद झाला.
- **आसाम अभ्याससहल –** दि. १८ मे ते ४ जून २०१९ दरम्यान झालेल्या या अभ्याससहलीत सात सदस्य सहभागी झाले होते. ज्ञानसेतू उपक्रमाच्या अंतर्गत दहा शाळांमधील सुमारे ४३० विद्यार्थ्यांशी यावेळी संपर्क झाला. याशिवाय माजुली येथील आयांग, गुवाहाटी येथे विवेकानंद केंद्र कल्चरल इन्स्टिट्यूट या संस्थांच्या भेटी झाल्या. माजुली येथे सामूगरीसत्रचे प्रमुख डॉ. हेमचंद्र गोस्वामी, पत्रकार श्री. सयकीया, गुवाहाटी येथे डॉ. प्रबलकुमार दास (ज्येष्ठ पत्रकार), श्री.ऋत्विक फाटक (वर्ल्डबँक कन्सल्टंट ) या सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या भेटी झाल्या. तर डॉ. धनंजय घनवट (IPS-सायबर डोम गुवाहाटी), श्री. वैभव निंबाळकर (IPS, SP जोरहाट), श्री. हितेशचन्द्र रॉय (IPS, SP. माजुली), श्री. प्रतीक ठुबे (IPS, SP बाक्सा), डॉ. संतोष निंबाळकर (IPS, S.P. जाधवपूर कोलकाता), सौ. रोशनी कोरेट्टी (IPS.DC.जोरहाट ) व डॉ. विवेक भस्मे (IAS. Additional Director, National Health Mission, Kolkata) या प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संवाद झाला.

(या अभ्याससहलींची ध्वनीचित्रफीत पुढील दुव्यावर पाहता येईल: https://bit.ly/2yVRBZr). दोन्ही वर्गातील विद्यार्थी सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी झाले.

### ○ पूरग्रस्त भागात मदतकार्य

मागील वर्षी अतिवृष्टीमुळे राज्यात अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली होती व अशाच पुराने बाधित असलेल्या सांगली शहरात केंद्रातील विद्यार्थी मदतकार्यासाठी गेले होते. १४ ते १७ ऑगस्ट या काळात सांगली शहरातील चार शाळांची सफाई या गटाने केली. या मदतकार्यात केंद्रातील सतरा विद्यार्थी, एक समन्वयक असे एकूण अठरा जण सहभागी झाले होते.

## ■ अन्य विभाग साहचर्य

- **छात्र प्रबोधन – दिवाळी अंक वितरण –** छात्र प्रबोधनचे नित्य अंक महाराष्ट्रभरातील ८४ केंद्रांवर वितरित केले जातात. हे सगळे केंद्रप्रमुख मोठ्या प्रमाणात दिवाळी अंकांची नोंदणी करतात व चार मासिके मिळून साधारण ६०००० हून अधिक अंकांची नोंदणी यावर्षी होती. चार वेगवेगळ्या भागांत विभागून तेरा विद्यार्थ्यांनी हे वितरण दोन दिवसांमध्ये पूर्ण केले.
- **दिवाळी अंक मेळावे –** शालेय विद्यार्थ्यांना साहित्याची गोडी व वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील सर्जनशीलतेचा विकास व्हावा, यासाठी छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकावर आधारित मेळाव्यांचे आयोजन केले जाते. पुणे शहरातील व पुण्याबाहेरील शाळांमधे असे २८ मेळावे घेण्यात आले. या मेळाव्याच्या माध्यमातून १५०० विद्यार्थ्यांपर्यंत छात्र प्रबोधन पोचवू शकलो. केंद्रातील ३० विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले.
- **शैक्षणिक उपक्रम संशोधिका – विकासमित्र प्रकल्प –** शालेय वयोगटातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आवश्यक जीवन कौशल्ये व अभ्यास कौशल्यांचे प्रशिक्षण विकासमित्र या प्रकल्पाअंतर्गत देण्यात येत आहे. या प्रकल्पसाठी अभ्यासक्रम तयार करणे व प्रत्यक्ष सत्र घेण्यासाठी केंद्रातील माजी विद्यार्थी सहभागी झाले होते.

✦✦✦

# ९ स्पर्धा परीक्षा केंद्र

## ■ नियमित उपक्रम

### ० केंद्रीय लोकसेवा आयोग प्रशिक्षण वर्ग (UPSC)

अ) UPSC **नियमित वर्ग –** Comprehensive Batch आणि Facilitation Batch असे दोन UPSC मार्गदर्शन वर्ग झाले.

- सर्व अनिवार्य विषयांचे अध्यापन व फॅसिलिटेशन सेशन्स झाली. मुख्य परीक्षेच्या बारा व पूर्व परीक्षेच्या चौदा सराव परीक्षा झाल्या. विद्यार्थी व अध्यापकांची प्रश्नपत्रिकेवर चर्चा झाली.
- **0th Attempt -** मुख्य परीक्षेच्या सरावासाठी पूर्ण अभ्यासक्रमावर UPSC परीक्षा पद्धतीप्रमाणे परीक्षा होऊन पेपर तपासून देण्यात आले.
- **समुपदेशन –** वर्षभरात प्रत्येक विद्यार्थ्याचे तीनवेळा वैयक्तिक समुपदेशन झाले. अभ्यासातील व वैयक्तिक अडचणी सोडवण्यास मदत झाली.
- विद्यार्थ्यांशी नियमित संवाद राहावा म्हणून मार्गदर्शनपर ऑडियो क्लिप्स पाठवण्यात आल्या.
- **News Circle –** बातम्यांचे विश्लेषण, गटचर्चा व वक्तृत्व याबद्दलचे मार्गदर्शन तीन गटांमध्ये झाले. ज्येष्ठ विद्यार्थ्यांनी चालू घडामोडींवर आधारित keywords व प्रश्न काढले व त्यावर साप्ताहिक चाचणी घेऊन चर्चासत्रे झाली.
- **Mentors Guidance -** UPSC ज्येष्ठ विद्यार्थ्यांनी चार विद्यार्थ्यांच्या गटाला एक मार्गदर्शक याप्रमाणे वैयक्तिक मार्गदर्शन केले.
- **वर्षारंभ उपासना –** वर्षारंभ उपासना मा. गिरीशरावांच्या उपस्थितीत झाली. एकूण २४० सदस्य उपस्थित होते. मा. गिरीशरावांनी विद्यार्थ्यांना वर्षारंभाचे महत्त्व सांगितले. गायत्री मंत्र धर्मनिरपेक्ष असून सर्व जाती, धर्म, पंथ यांनाही लागू होतो, हेही सांगितले.
- मा. गिरीशरावांबरोबर कार्यालयीन सदस्यांची बैठक झाली. चार सदस्यांनी २०१८-१९ या वर्षांमध्ये झालेल्या चार उपक्रमांची निवेदने केली.
- **पालक मेळावा –** नियमित वर्गांच्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी मेळावा झाला. UPSC परीक्षेसाठी लागणारा वेळ, यातील आव्हाने, मानसिक ताणतणाव या विषयी मा. विवेकसरांनी पालकांशी संवाद साधला. प्रा. सविताताईंनी केंद्राची शिक्षण पद्धती, येथे चालणारे उपक्रम याची माहिती दिली. २०१७ UPSC परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम आलेली अबोली नरवणे (IAS) हिने पालकांना UPSC च्या प्रवासात मुलांना पालकांच्या आधाराचे महत्त्व सांगितले.

**ब) Aptitude Building Program (ABP - Batch 3)**

ज्ञान प्रबोधिनीत नियमित वर्गात नसलेल्या UPSC विद्यार्थ्यांसाठी अभ्यास कौशल्य, नियोजन, टिपणे, उजळणी, सद्य घटना, पूर्वपरीक्षा दृष्टिकोन, परीक्षा विश्लेषण, इत्यादींचे मार्गदर्शन करण्यात आले, तसेच 'Know Your Self' ची कार्यशाळा झाली.

**क) Mission Batch –** UPSC पूर्व परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुख्य परीक्षेच्या अनिवार्य विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले. अभ्यास साहित्य, अभ्यास पद्धती, सद्य घटनांची जोड, पूर्वीच्या प्रश्नपत्रिका याविषयी चर्चा झाली. विद्यार्थ्यांचा रोज लेखन सरावही झाला. या तुकडीला २०१८ च्या परीक्षेतील यशवंतांनी मार्गदर्शन केले.

**ड) केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मुलाखत प्रशिक्षण वर्ग – (प्रेरणा १९)**

UPSC मुख्य परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुलाखत प्रशिक्षण वर्ग तीन टप्प्यांमध्ये घेण्यात आला. एक व दोन टप्प्यांमध्ये एकूण आठ सत्रांमध्ये (Modules) विविध पुस्तके व चालू घडामोडी वर Seminars होऊन TED Videos दाखवण्यात आले. तज्ज्ञांची व्याख्याने, मुलाखतीची तयारी करण्याची पद्धत, अधिकारी अनुभव कथन, व्यक्तिमत्त्व जडणघडण, गटचर्चा, गटमुलाखती, अनुभवशिक्षण असे उपक्रम घेण्यात आले.

तिसऱ्या टप्प्यामध्ये अंतिम मुलाखतीस पात्र झालेल्या विद्यार्थ्यांसाठी सराव मुलाखती झाल्या. २३ विद्यार्थी व महाराष्ट्रातील तीन अधिकाऱ्यांनी बढतीसाठी मुलाखती दिल्या.

## ■ विशेष व्याख्याने

१) UPSC अभ्यास पद्धती – तृप्ती दोडमिसे, (IAS) Maharashtra topper
२) Economics & Sustainable Development– डॉ. गुरुदास नूलकर
३) NPA (हैदराबाद) प्रशिक्षण अनुभव – प्रवीण इंगवले (IPS)
४) Current Issues in Polity Good Governance – मृण्मयी जोशी (IAS, केरळ)
५) व्यापारवृद्धी व जागतिक अर्थव्यवस्था – अभय टिळक (अर्थतज्ज्ञ)
६) आंतरराष्ट्रीय प्रश्न – मैत्रेय कुलकर्णी (IFS, प्रथम सचिव, अर्जेंटिना)
७) विकासाचे विविध प्रश्न – डॉ. अय्याज तांबोळी, (IAS, जिल्हाधिकारी, जगदलपूर, छत्तीसगढ)
८) सद्य:स्थितीत महिलांच्या आरोग्य समस्या व उपाय– डॉ. प्राची साठे.

२०१९-२० वर्षातील वर्ग व विद्यार्थी संख्या

| | | |
|---|---|---|
| Comprehensive batch | - | ३६ |
| Facilitation batch | - | २० |
| Aptitude building program | - | १८ |
| Mission Batch | - | ६० |
| Prerana Batch | - | ३० |

## ■ अभ्याससहली व अनुभव शिक्षण

### ○ विवेक इन्स्पायर २०१९

अरुणाचल प्रदेश येथील डोलुनामुख व रोइंग येथे विवेकानंद केंद्र विद्यालयाच्या १५१ विद्यार्थ्यांसाठी NTS परीक्षेबाबत UPSC च्या नऊ विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध मार्गदर्शन केले. तसेच तेथील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या.

### ○ UPSC/ JKPSC मार्गदर्शन वर्ग (दोडा, जम्मू )

दोडा जिल्हाधिकारी कार्यालय आणि स्पर्धा परीक्षा केंद्र यांनी संयुक्तरित्या JKPSC या परीक्षांसाठी मार्गदर्शन वर्ग घेतला. सहा आठवड्यांच्या उपक्रमांमध्ये ६० विद्यार्थ्यांना UPSC च्या बारा ज्येष्ठ विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले. सर्व विषय, चालू घडामोडी, अभ्यासकौशल्य याचे मार्गदर्शन व विषयवार परीक्षा झाल्या. विद्यार्थ्यांचे वैयक्तिक समुपदेशन करण्यात आले. पुण्यामधून प्रा. सविताताई व वा. विवेक कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

### ○ अभ्याससहल

नियमित वर्गाची अभ्याससहल पाबळ येथील 'विज्ञानाश्रम' व अहमदनगरच्या 'स्नेहालय' येथे गेली होती. शिक्षण-तंत्रज्ञान व ग्रामविकास या सूत्राच्या आधारे तेथे चालणारे उपक्रम विद्यार्थ्यांनी पाहिले. त्यानंतर अहमदनगर येथील स्नेहालय संस्थेला भेट दिली. संस्थेचे संपूर्ण आवार, उपचार केंद्र व विद्यार्थ्यांचे वसतिगृह पाहिले. स्नेहालयच्या स्नेहांकुर या दत्तक विधान करणाऱ्या संस्थेला भेट देऊन नवजात बालकांच्या पुनर्वसनाचे व संगोपनाचे काम पाहिले. संस्थापक श्री. गिरीश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नव्या प्रशासकीय सेवकाकडून असणाऱ्या अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या. या सहलीमधून विद्यार्थ्यांना समाजामधील विविध स्तर जवळून अनुभवता आले.

### ○ ग्रामभेटी

दि. २५ व २६ जाने. २०१९ रोजी अभ्यासिका सदस्य व प्रेरणा तुकडीच्या विद्यार्थ्यांसाठी अनुभवशिक्षण उपक्रम झाला. वेल्हे तालुक्यातील तीन गावांचा अभ्यास करणे, महिला सभेचे आयोजन करणे, ग्रामसभेत सहभागी होणे असा या भेटीचा उद्देश होता.

ग्रामस्थांशी संवाद, शिक्षणाची व्यवस्था, वाहतूक सुविधा, पाण्याची व्यवस्था, बचत गटासमोरील समस्या, ग्रामपंचायत, अंगणवाडी, शेती, आरोग्य, सरकारी कागदपत्रे, शाळा या सर्व बाबतीत ग्रामस्थांना येणाऱ्या अडचणींचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. २६ जानेवारीला विद्यार्थी ग्रामसभेमध्ये सहभागी झाले. परत आल्यावर विद्यार्थ्यांनी ग्रामभेटीचे चित्रफितीच्या साहाय्याने सादरीकरण केले.

### ○ अधिकारी कार्यालय भेटी

पिंपरी-चिंचवड महानगर पालिका कार्यालय भेट (PCMC) - श्री. श्रावण हर्डीकर (IAS, आयुक्त, PCMC) यांनी या भेटीत नागरी समस्या व उपाययोजना यावर मार्गदर्शन केले.

पोलीस मुख्यालय भेट - श्री. संदीप पाटील (IPS, SP, पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण) यांच्या भेटीदरम्यान कायदा आणि सुव्यवस्था इ. मुद्द्यांवर चर्चा केली.

### ○ सेवा उपक्रम

पुस्तकी अभ्यासाला अनुभवाची जोड मिळून विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्यांचा विकास व्हावा या दृष्टिकोनातून सेवा उपक्रम झाले.

**शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचा अनुभव -**

➤ **प्रज्ञा विकास उपक्रम -** पुण्यातील नागरी वस्त्यांमधील स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसलेल्या मुलांना UPSC विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले. ३९ मुलांना दर रविवारी चार तास, एकूण नऊ आठवडे UPSC च्या ३५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मार्गदर्शन केले. दादा-ताईंमध्ये व मुलांमध्ये एक स्नेहपूर्ण नाते निर्माण झाले.

➤ **विद्यानिकेतन** NMMS **व शिष्यवृत्ती परीक्षा वर्ग -** डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्या निकेतनमधील आठवीच्या ३६ विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेकरिता आठवड्यातून चार दिवस रोज दोन तास वर्ग झाले व सराव चाचण्या झाल्या. UPSC च्या ३३ विद्यार्थ्यांनी पूर्वतयारी व उत्तम नियोजन करून अतिशय मनापासून मार्गदर्शन केले.

हे मार्गदर्शन केलेल्या विद्यार्थ्यांमधील प्रज्ञा विकास उपक्रमातील दोन विद्यार्थी व विद्यानिकेतन मधून पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले.

➤ **विकास मित्र -** शैक्षणिक उपक्रम संशोधिका (EARC) विभागातर्फे वेल्हे तालुक्यातील ५वी, ८वी, व ११वीच्या विद्यार्थ्यांसाठी विकास मित्र या उपक्रमांतर्गत UPSC विद्यार्थ्यांनी अभ्यासकौशल्य, जीवनकौशल्य, नेतृत्वकौशल्य यांचे मार्गदर्शन केले. यामध्ये संभाषण, वक्तृत्व, निरीक्षण, वाचन इत्यादी कौशल्य खेळ व पद्य वापरून शिकवली.

**समारोप व निवेदने -** वरील उपक्रमातील विद्यार्थी, उपक्रम प्रमुख यांच्यासाठी समारोप कार्यक्रम झाला. विद्यार्थी निवेदने व उपक्रम प्रमुखांची मनोगते झाली. त्यानंतर अतिथी मा. सुभाषराव देशपांडे यांनी मार्गदर्शन व सर्वांचे कौतुक केले आणि असे अनुभव घेण्याचे आवाहन केले. क्षणचित्रे व अभिप्राय फलकही लावण्यात आले होते. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

➤ **सेवा प्रकल्प उपक्रम समारोप -** सेवा उपक्रमांतर्गत प्रज्ञा विकास, विद्यानिकेतन आणि विवेक इन्स्पायर हे तीन उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमांचा सांगता समारंभ दि. १८

नोव्हें. रोजी झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. सुभाषराव देशपांडे उपस्थित होते. ज्येष्ठ कार्यकर्ते, मार्गदर्शक व कार्यालयीन सदस्य तसेच या उपक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी व अभ्यासिकेतील विद्यार्थी असे शंभरजण उपस्थित होते.

प्रा. सविताताईंनी कार्यक्रमाचे थोडक्यात प्रास्ताविक केले व मा. सुभाषराव देशपांडे, कार्यवाह ज्ञान प्रबोधिनी यांचा परिचय करून दिला. त्यानंतर या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी चार जणांनी निवेदने सादर केली. विद्यार्थ्यांनी दिलेली माहिती, अनुभव कथन पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन यामुळे उपक्रमाचे स्वरूप, त्यामागची पार्श्वभूमी व उपक्रमाची परिणामकारकता समजण्यास मदत झाली.

निवेदने झाल्यानंतर उपक्रमाशी संबंधित असलेल्या प्रमुखांनी मनोगते व्यक्त केली. प्रज्ञा विकासचे ओंकार बाणाईत, विवेक इन्स्पायरच्या मृण्मयी वैशंपायन, विद्यानिकेतन प्रशालेच्या दरेकर मॅडम व भरेकर सर यांनी या उपक्रमाची गरज व या उपक्रमादरम्यान आलेले अनुभव व्यक्त केले. त्यानंतर मा. सुभाषरावांनी मार्गदर्शन केले. उपक्रमाची माहिती व स्वरूप इतरांच्या लक्षात यावे म्हणून क्षणचित्रे फलक लावण्यात आले होते. तसेच उपस्थितांना अभिप्राय नोंदविण्यासाठी फलक लावण्यात आले होते. शेवटी उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आले. त्यानंतर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ■ अन्य उपक्रम

- **रक्तदान शिबिर** - कै. आप्पा पेंडसे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ९३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. ते रक्त दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला देण्यात आले.
- **गणेशोत्सव** - गणेशोत्सवात अर्थतज्ज्ञ मा. अभय टिळक यांच्या हस्ते श्रींची पूजा, आरती व अथर्वशीर्षाचे पठण झाले. त्यानंतर त्यांचे व्याख्यान झाले.
- **भोंडला** - नवरात्रीनिमित्त स्पर्धा परीक्षा केंद्र, ग्रामविकसन, संवादिनी व संत्रिका यातील महिला व विद्यार्थिनींचा एकत्रित भोंडला झाला.
- **अरुणाचल प्रदेश पब्लिक सर्व्हिस कमिशन (APPSC) वर्ग–** २०१८ मध्ये अरुणाचलमध्ये आपण घेतलेल्या मुख्य परीक्षा वर्गामधून बारा जणांची मुलाखतीसाठी निवड झाली. सेवा भारती या अरुणाचल प्रदेशामधील संस्थेबरोबर मुलाखत वर्गाची योजना करण्यात आली. अरुणाचलमधील तीन अधिकाऱ्यांनी व पुण्यातून डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. कौस्तुभ बोंद्रे व प्रा. सविता कुलकर्णी यांनी झूम मीटिंगच्या माध्यमातून व व्हिडिओ फिल्मद्वारे मार्गदर्शन केले. मार्गदर्शन व व्याख्याने प्रबोधिनीतर्फे व इटानगर येथील कार्यवाही, सेवा भारतीच्या माध्यमातून केली. प्रत्येक विद्यार्थ्याला केंद्रातील ज्येष्ठ विद्यार्थी किंवा अधिकारी हे मेंटर्स म्हणून दिले होते. व्हॉट्सअपच्या माध्यमातून संपर्कात राहून त्यांनी मार्गदर्शन केले व सराव मुलाखती घेतल्या. यातून आठ विद्यार्थ्यांची अंतिम यादीत अधिकारी म्हणून निवड झाली.
- **आसाम - अरुणाचल प्रदेश दौरा** - दि. १० ते १६ जानेवारी या कालावधीत वा. विवेक व सविता कुलकर्णी यांनी ईशान्य भारत दौरा केला. रोइंग येथे "RIWATCH' या आदिवासी संशोधन प्रकल्पास व विवेक गॅलरीस भेट दिली तसेच श्री. विजय स्वामी यांचे काम पहिले. तेथे पद्मश्री सत्यनारायणजी हेही भेटले. त्यांच्या ग्रंथालय चळवळीविषयी चर्चा झाली व एका बांबूसा ग्रंथालयाला भेटही दिली. इप्रा या आदिवासी व्यक्तीच्या घरी जाऊन त्यांची संस्कृती पाहून गप्पा झाल्या. करुणा ट्रस्टच्या मौसुमीदीदींचे काम पाहून आपला विद्यार्थी निसान्सो मालो याच्या घरी पालकांची भेट झाली. माजुली बेटावर शंकर देवांची सत्रं पाहून पेगो गुरुजींच्या शाळेला भेट दिली.

श्री. वैभव निंबाळकर, IPS, डेरगाव पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे भेट देऊन त्याच्या कुटुंबियांसह जेवण व गप्पा झाल्या. धेमाजी येथे श्री. धनंजय घनवट (IPS, SP, धेमाजी) यांच्या घरी कुटुंबियांसह जेवण व गप्पा झाल्या. जिल्हाधिकारी नरसिंग पवार यांचीही भेट झाली. या अधिकाऱ्यांशी बोलताना आसामची सामाजिक, राजकीय परिस्थिती व विविध आव्हाने यावर चर्चा झाली. सुरज खुडे (CISF, Security Chief, नुमालीगुडी ऑईल रिफायनरी) याच्याशी त्याच्या साईटवर जाऊन गप्पा झाल्या. गुवाहाटी येथे श्री. नितीन खाडे (IAS, Finance Secretary, आसाम) याच्या घरी भेट घेतली. अक्षय खंदारे (IAAS), नासिर मनेर (ICES), विजय पालवे (IFS) व अभय पाटील (CISF) यांच्याशी भेट व गप्पा झाल्या. काझीरंगा अभयारण्य व जोरहाट हॉलांगीपीर गिब्बन अभयारण्य येथील अनुभव अविस्मरणीय होते. कलकत्ता विमानतळावर डॉ. कुलदीप सोनावणे (IPS) व सायली ढोले (IRS, IT) यांची भेट झाली. एकूणच हा दौरा संस्था भेटी व अधिकारी भेटींनी भरगच्च होता.

✦✦✦

## ६ प्रज्ञा मानस संशोधिका

ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा मानस संशोधिका या विभागाचे सात उपविभाग कार्यरत आहेत

- **संशोधन**
- **शैक्षणिक अभ्यासक्रम**
- **मानव संसाधन विकास**
- **मनोमापन**
- **क्षमता संवर्धन**
- **अभिक्षमता मापन**
- **वैयक्तिक समुपदेशन व मार्गदर्शन**

### o मनसंधारण प्रकल्प

दुष्काळाशी सामना करण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि नागरी संस्था/संघटना अनेक वर्षे एका दिशेने काम करत आहेत. ह्याच अंतर्गत 'पाणी फाऊंडेशन' ने २०१५ पासून 'सत्यमेव जयते Water Cup' स्पर्धा आयोजित केल्या. अनेक गावांनी ह्या स्पर्धेत भाग घेऊन आपापले गाव पाणीदार करण्याचा संकल्प केला. यामुळे भौगोलिक वातावरणात पडणाऱ्या बदलांपलीकडे गावामधील माणसांत काय मनो-सामाजिक बदल झाला, हे तपासण्यासाठी प्रज्ञा मानस संशोधिकेचे साहाय्य घेतले गेले. सर्वसमावेशकता, गटप्रेरणा, स्व-पलीकडचे समाजकेंद्री वर्तन, सबलीकरणाची भावना, कामाप्रती निष्ठा आणि उत्साहपूर्ण-सळसळते गाव अशा सहा मुद्द्यांवर आधारित प्रश्नावली, गाव आराखडा सूची, गटचर्चा आणि मुलाखती अशी साधने वापरून सुमारे ४५ गावांतून ८०० हून अधिक व्यक्तींचा प्रदत्त (data) गोळा केला. यात ४५१ पुरुष तर ४१३ महिला होत्या. त्याशिवाय सर्व ४५ गावांची सविस्तर माहिती, १७८ व्यक्तींच्या मुलाखती आणि ८९ गटचर्चा घेतल्या. ह्या सर्व प्रदत्तांच्या विश्लेषणावरून असे लक्षात आले की : पाणी फाऊंडेशनच्या मूल्यमापनात ज्या गावांनी उच्च किंवा कमी गुण प्राप्त केले त्या गावांच्या मनसंधारण मधील गुणांचा अभ्यास केला तेव्हा सर्वच घटकांवर दोन्ही मूल्यमापनात खूपच साधर्म्य दिसून आले. याशिवाय स्त्रियांचे गुण बहुतेक सर्व मुद्द्यांवर पुरुषांपेक्षा उच्च आढळून आले. ज्या परिसरात मध्यम किंवा जास्त तीव्रतेची जल कमतरता आहे त्या गावांचा performance पाणी फाऊंडेशनच्या मूल्यमापनात आणि मनसंधारण परीक्षणात सारखाच चांगला दिसून आला. त्याचप्रमाणे गावातील लोकसंख्येचा आणि मनसंधारण संपादनाचा फारसा संबंध दिसून आला नाही. मात्र सक्षम नेतृत्वाचा परिणाम नक्कीच दिसून आला.

### o पिढ्यांमधील जीवन गुणवत्तेची बदलती संकल्पना

विद्यापीठ अनुदान आयोगाने अनुदानित केलेल्या या प्रकल्पात २५ ते ७० अशा प्रदीर्घ वयातील आणि विविध व्यवसायातील, शैक्षणिक पार्श्वभूमीच्या ३३० व्यक्तींचा अभ्यास झाला. यासाठी 'माझी जीवन गुणवत्तेची संकल्पना' अशी प्रश्नावली वापरण्यात आली. त्यासोबत 'सर्वांगीण जीवन गुणवत्ता चाचणी' तसेच 'मनस्वास्थ्य (Psychological Well Being) चाचणी' वापरण्यात आली. यांद्वारे भौतिक साधन संपत्ती, आरोग्य, निर्मितीक्षमता, सुरक्षितता, आणि एकूण जीवन गुणवत्ता या घटकांवर पिढ्यांमध्ये लक्षणीय फरक दिसून आले. वय वर्षे ४० ते ५९ या वयोगटावर सर्वाधिक ताण असून स्त्री-पुरुषांमध्येही निर्मिती-संपादन (productivity) या पैलूवर आणि मन:स्वास्थ्याशी संबंधित घटकांवर काही महत्त्वाचे फरक दिसून आले. वय वर्षे ६० पुढील व्यक्तींची जीवन गुणवत्ता इतरांपेक्षा सरस दिसून आली.

### o संपादन प्रेरणेवरील प्रमाणित चाचणीची निर्मिती

किशोरवयीन मुलांमधील संपादन प्रेरणा मोजणाऱ्या भारतीय प्रदत्तावर आधारित अशा प्रमाणित चाचणीची निर्मिती पूर्ण झाली. आठ प्रकारचे घटक मोजणाऱ्या या चाचणीत ४० प्रश्न आहेत. माध्यमिक प्रशालेतील एकूण ४१६ विद्यार्थ्यांच्या प्रदत्तावर प्रमाणीकरण केले. सर्व निष्कर्ष हे संख्याशास्त्रीय दृष्ट्या सिद्धतेच्या उच्च पातळीवर आले आहेत.

### o ओळख स्पर्शाची

प्राथमिक शाळेतील (१ली ते ७वी) मुलांचे मानसिक स्वास्थ्य/सुरक्षिततेची भावना जपण्यासाठी त्यांना' 'स्पर्श' या संकल्पनेची ओळख करून देण्यासाठी 'स्त्री शक्ती प्रबोधन संवादिनी गट २०१४ पासून 'ओळख स्पर्शाची' हा उपक्रम करीत आहे.

ज्ञा. प्र. संशोधन संस्थेतर्फे बजाज फिनसर्व्ह यांच्या अर्थसाहाय्यातून ग्रामीण भागातील शिक्षकांना त्याचा लाभ व्हावा आणि त्यांच्या बाल लैंगिक शोषणाकडे बघण्याच्या दृष्टिकोनामध्ये फरक पडावा यासाठी हा प्रकल्प आहे. त्या अंतर्गत स्त्री शक्ती प्रबोधन संवादिनीच्या सदस्यांचा प्रमाणित प्रशिक्षण पुस्तिका आणि त्यासोबत एक चित्र पुस्तिकाही तयार करण्यात आणि कार्यशाळांमध्ये तज्ज्ञ प्रमुख प्रशिक्षक म्हणून मोठा सहभाग आहे.

प्रकल्पांतर्गत पुणे जिल्ह्यात सर्व तालुक्यांमध्ये चौदा आणि औरंगाबाद, वर्धा येथे एकेक अशा सोळा कार्यशाळा घेण्यात आल्या. त्याद्वारे ७१४ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. सर्व प्रशिक्षणार्थींना सुरुवातीला एक प्रश्नावली आणि एक वाक्यपूर्ती चाचणीही दिली गेली. प्रकल्प परिणामकारकतेचा अभ्यास करण्यासाठी यातील एक प्रश्नावली गुगलफॉर्मच्या स्वरूपात शालेय सत्रे झाल्यानंतर १३९ शिक्षकांकडून भरून घेतली. त्याच्या विश्लेषणामधून प्रशिक्षणाचा आणि प्रत्यक्ष सत्रे घेतल्याचा अनुकूल परिणाम शिक्षकावर झाल्याचे दिसून आले आहे.

### o संयम प्रकल्प – Self Awareness in Youth for Anti-Addiction Motive

शालेय मुलांमध्ये व्यसने आणि लैंगिकता या विषयावरील

जाणीव-जागृती करणे आणि त्यांची स्व-नियमनाची धारणा बळकट करणे हा या प्रकल्पाचा उद्देश होता. या प्रकल्पाला ताराचंद रामनाथ सेवा न्यासाकडून देणगी मिळाली आहे. या अंतर्गत स्त्री शक्ती प्रबोधन- संवादिनीच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या भरघोस योगदानामुळे एकूण तीन प्रशिक्षणांमध्ये मिळून २१५ प्रशिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले. त्यातील १६५ प्रशिक्षकांनी ५३ शाळांमध्ये ८वी आणि ९वीच्या वर्गात प्रत्यक्ष जाऊन आणि चार नागरी वस्त्यांमध्ये स्वतंत्रपणे वीस सत्रे पूर्ण केली. त्यातून आत्तापर्यंत ७५०० मुलांपर्यंत प्रशिक्षण पोचले. या सर्व मुलांची पूर्व आणि उत्तर चाचणी घेतली गेली. प्रशिक्षणामुळे मुलांमध्ये नोंद घेण्याजोगा बदल झाला आहे, असे लक्षात आले.

**o स्वस्थ पोलीस- स्वस्थ भारत**

या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील ५०० पोलिसांचे मानसिक स्वास्थ्य मापन करण्यात आले. त्यात त्यांना सर्वसाधारणपणे मानसिक स्वस्थता आहे, परंतु कार्यस्वातंत्र्य (autonomy) आणि कार्यनिर्मिती (productivity) यामध्ये सुधारणेची गरज आहे असे दिसून आले.

## ■ चालू संशोधन प्रकल्प

१. रचना क्षमता चाचणी संच (Aptitude for Designing battery)
२. आकांक्षा (Careers of gifted girls)
३. वंचित मुलांच्या प्रतिभा आणि जीवन कौशल्यांवर प्रशिक्षणाच्या परिणामाचा अभ्यास
४. जीवनकौशल्य चाचणी संच निर्मिती

## ■ मानव संसाधन विकास

➤ **प्रवाह फाऊंडेशन, हैद्राबादने** योजलेल्या प्रकल्पामध्ये प्रज्ञावंत मुलांच्या जोपासनेसाठी समाजाच्या विविध स्तरातून मुलांची निवड करायची होती. त्यामुळे शिक्षकांसाठी अतिशय वेगळ्या धर्तीची एक नामनिर्देश (nomination) सूची बनवण्यात आली. ही सूची वापरून आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, दिल्ली, पंजाब, मध्य प्रदेश, राजस्थान आणि तेलंगणा ह्या राज्यांमधून ७६३ मुलांची माहिती गोळा करण्यात आली आणि त्यातून २०% मुलांची निवड करण्यात आली. त्यानंतरच्या टप्प्यावर प्रमाणित बुद्धिमत्ता चाचणी वापरून त्यातील ४१ मुलांची अंतिम निवड करण्यात आली. हे काम करताना विविध प्रांतातील मुले, त्यांची भाषा, संस्कृती, समज या गोष्टी खूप जवळून अनुभवता आल्या. हैद्राबाद आणि तेथील ग्रामीण भागातून आलेल्या मुलांना चाचण्या खूप आवडल्या आणि त्यांचे इंग्रजी भाषेवर चांगले प्रभुत्व जाणवले. तसाच काहीसा अनुभव बंगलोर इथेही आला. मात्र दिल्लीला राजस्थान आणि पंजाब वरून आलेल्यांना जरी ते इंग्रजी माध्यमात शिकत होते तरी हिंदी भाषा त्यांना जास्त जवळची होती.

➤ **स्वयंसिद्धा महिलाश्रम, लातूर –** महिलांसाठी काम करणाऱ्या या संस्थेच्या सेवकांसाठी समुपदेशन आणि प्रशिक्षण घेताना त्यांच्यासोबत असताना त्यांचे अनुभव ऐकताना मन विषण्ण झाले, विदारक जग समोर आले. पळून आलेल्या महिला, तरुण मुली, त्याचे प्रश्न त्यांची लहान मुले, त्यांचे प्रश्न, व्यसनाधीनता, वयात येणाऱ्या मुलींचे प्रश्न असे अनेकविध प्रश्न जाणवले. अतिशय वेगळा आणि विलक्षण अनुभव होता.

## ■ क्षमता संवर्धन

➤ **विविध शिबिरातील सहभागींची संख्या**

| शिबिरे व कार्यशाळा | संख्या |
|---|---|
| बाल विकास शिबिरे (७-१२) ७ दिवस | ७१५ |
| क्षमता संवर्धन शिबिरे (१३ ते १६) ५ दिवस | ३८ |
| निरंतर बालविकास (७-१२) वर्षभर साप्ताहिक २ दिवस | १२८ |
| पालकत्व कार्यशाळा | १०१ |
| **एकूण** | **९८२** |

## ■ अभिक्षमता मापन

➤ **अभिक्षमता मापन, व्यवसाय मार्गदर्शन (संगणकीय चाचणीसेवा) चाचण्यांचा संख्यात्मक तपशील-**

| चाचणीचे नाव | संख्या |
|---|---|
| Individual Testing | 112 |
| iTap Testing | 240 |
| Aptitude Testing (iA) (computerized) | 2377 |
| Aptitude Testing (iA) (paper-pencil) | 944 |
| Aptitude Testing (SWAYAM) | 42 |
| Engineering Aptitude Testing | 1864 |
| BEAM Testing | 9 |
| Career Advisor Training Program | 60 |
| Trainers' Training Workshop | 13 |
| **Total** | **5661** |
| Asoociates (iA) link | **1870** |

अभिक्षमतामापन (IA) च्या २०११ ते २०१८ मध्ये चाचणी झालेल्या २०७८ जणांचे संगणकीकृत (Online) व ४६६ जणांचे लेखी (Offline) नोंदणीचे आणि त्याच्या विश्लेषणाचे काम झाले आहे.

म्हेत्रेवस्ती येथील शाळेत वस्ती पातळी वरील वंचित गटातील मुलांसाठी थिसेन कृप इंडस्ट्रीज, पिंपरी (CSR) च्या माध्यमातून चालणाऱ्या नवचेतना उपक्रमाच्या आढावा बैठकीला यासाठी साहाय्य करणाऱ्या संस्थेचे संचालक मा. शैलेशजी घाटपांडे व समन्वयक नितीनजी पाटसकर उपस्थित होते. या बैठकीला २५ प्रशिक्षक उपस्थित होते. बैठकीमध्ये प्रशिक्षकांचे अतिशय सुंदर अनुभव कथन झाले. काम करत असताना मुलांमध्ये झालेल्या बदलाबद्दल त्यांनी सांगितले. तसेच आलेल्या तांत्रिक अडचणींबद्दलही चर्चा झाली. सकारात्मक रीतीने पुढील कामाबद्दल आशादायी चित्र निर्माण झाले.

- **'प्रज्ञा प्रबोधन वर्ग' (IGNITE) -** विशेष बुद्धिमत्ता असणाऱ्या मुलांसाठी चालणाऱ्या यावर्गात ५वी ते ८वी तील ८९ मुले सहभागी आहेत. त्यांचे 'ग्रामीण परिचय आणि नेतृत्व विकसन' या विषयाचे चार दिवसाचे निवासी शिबिर ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे येथे घेण्यात आले. या शिवाय या वर्गात 'आप्पा पेंडसे : एक प्रेरणास्त्रोत' या वैचारिकाचे वाचन आणि चर्चा घेण्यात आली. अनेक कृतिखेळांच्या माध्यमातून विविध विषय मांडण्यात आले. किशोर गटासाठी स्मृती आणि तर्कसंगत विचार या विषयावर आधारित सत्रात Affective module सुरू करण्यात आले.
- **प्रज्ञा मैत्र –** या क्षमतावान मुलांच्या पालकांसाठीच्या स्व-मदत गटात या वर्षी ६० पालकांनी सहभाग घेतला. या उपक्रमात प्रज्ञा- संस्कार, आविष्कार, स्वाध्याय, संवाद असे अनेक कृती-उपक्रम घेण्यात आले. याशिवाय पालक व मुले एक दिवस भात लावणीसाठी वेळे येथे गेले होते.

## ■ वैयक्तिक मार्गदर्शन व समुपदेशन

वैयक्तिक बुद्धिमापन मार्गदर्शनाअंतर्गत १६३ जणांचे चाचणी काम व ४७ जणांचे मार्गदर्शन झाले. तसेच प्रौढ ६४ जणांचे समुपदेशन झाले.

## ■ शैक्षणिक अभ्यासक्रम

शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्तम यश मिळवले. प्रज्ञावंताचे शिक्षण या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी प्रज्ञावंततेच्या जागरुकतेसाठी १२ जुलै रोजी ज्ञान प्रबोधिनीच्या उपासना मंदिरात व १४ जुलै रोजी छत्रे सभागृह, एरंडवणे येथे फलक प्रदर्शन व प्रसंगनाट्य सादरीकरण केले.

दोन्ही पदविका अभ्यासक्रमांचा वर्षारंभाचा कार्यक्रम दि. ५ ऑक्टोबर २०१९ रोजी झाला. सर्व विद्यार्थ्यांचे पुस्तक देऊन, त्यांच्यामधील काही चांगले गुण व त्यांच्या वर्षभरातील यश सांगून कौतुक केले गेले. काही विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये या अभ्यासक्रमांमधून त्यांना ज्या नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या, कसे आदर्श मिळाले, त्यांचा आपल्या संस्थेतील अनुभव कसा वेगळा होता तसेच आयुष्याला पुढील दिशा कशी मिळाली हे सांगितले. डॉ. श्रुती पानसे यांनी अत्यंत संक्षिप्तपणे चालू काळातील विद्यार्थ्यांबरोबर काम करणाऱ्या व्यावसायिकांसमोरील आव्हाने मांडली.

बाल व कुमारांचे मानसशास्त्र अभ्यासक्रमाच्या २५व्या तुकडीच्या ३१ जणांची मुख्यपरीक्षा २ मार्च २०२० रोजी झाली.

### ० पुढचे पाउल

- वृत्तांत वर्षात वेदांत अपार्टमेंट, सदनिका क्रमांक १०२, हत्ती गणपती चौक, ११६३ सदाशिव पेठ, पुणे या नवीन जागेत ज्ञा. प्र. संशोधन संस्थेचा संगणक चाचणी कक्ष सुरू होत आहे.
- विश्वकर्मा विद्यापीठ यांच्या सोबत सहयोगी काम करण्यासंदर्भात करार झाला. या वेळी विश्वकर्मा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे, उपाध्यक्ष डॉ. वासुदेव गाडे व संशोधन विभाग अधिष्ठाता डॉ. योगेश देशपांडे यांच्यासोबत वाच. अनघा लवळेकर, वाच. सुजला वाटवे, वाच. वनिता पटवर्धन व वाच. सुचरिता गद्रे उपस्थित होत्या.
- पोलीस संशोधन संस्थेसोबत तीन वर्षांसाठीचा संशोधन सहकार्याचा करार झाला.

### ० प्रशिक्षण व प्रदीर्घ बैठक

प्रज्ञा मानस संशोधिकेची प्रदीर्घ बैठक वीर बाजी पासलकर सभागृह येथे २-३ ऑगस्ट रोजी झाली. '२०१८-१९ वर्षातील ठळक उपलब्धी व आव्हाने' या विषयावर सदस्यांनी गटशः चर्चा केली. मा. संचालक यांनी 'उपासना व प्रार्थना समजून घेताना' या विषयावर मांडणी केली. मा. शिरीष जोशी यांनी 'प्रकल्प अर्थकारण/ शुल्क रचना निर्धारित करताना' या विषयावर ज्येष्ठ सदस्यांचे सत्र घेतले. त्या वेळात अन्य सदस्यांची 'कार्यकर्ते बनू या' व 'प्रज्ञा मानस ची जो-हॅरी विंडो' विषयावर सत्रे झाली. 'अन्य विभागांची कार्यपद्धती समजून घेताना' सत्रात ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, छात्र प्रबोधन व युवक विभाग अशा तीन विभागांतील सदस्यांची मुलाखत घेण्यात आली. दुसऱ्या दिवशी उपविभागाच्या गटात बसून सदस्यांनी भवितव्य लेख-आढावा व पुढील दोन वर्षांचे नियोजन तयार केले. एका सत्रात वाच. वनिता पटवर्धन यांनी नुकत्याच केलेल्या ह्युस्टन येथील प्रवासात बृहन महाराष्ट्र अधिवेशनात त्यांनी मांडलेल्या ज्ञान प्रबोधिनीच्या बूथ संबंधी व हिंदू स्वयंसेवक संघ (HSS) मध्ये घेतलेल्या सत्रांसंबंधी अनुभव कथन केले. पुढील सत्रात वाच. वनिता पटवर्धन यांचे 'प्रतिसाद व प्रतिक्रिया' विषयावर कार्यशाळा आधारित सत्र झाले. शेवटच्या सत्रात प्रश्नोत्तरे व दोन दिवसांचा आढावा घेऊन बैठकीचा समारोप झाला. एक नवी ऊर्जा घेऊन सर्व सदस्यांची प्रदीर्घ बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. बैठकीस एकूण ४० सदस्यांची उपस्थिती होती.

✦✦✦

### ■ प्रज्ञा मानस संशोधिकेची प्रकाशने

1. Glory of Intelligence
2. Ehancement of Intelligence through Play (Part I)
3. Ehancement of Intelligence through Play (Part II)
4. Why Gifted Eudcation?

५. बुद्धिवैभव
६. हसत खेळत बुद्धिविकास (भाग १)
७. हसत खेळत बुद्धिविकास (भाग २)
८. सामाजिक जाणीव संवर्धन
९. स्त्रीविधा

## विविध उद्योगांना/ संस्थांना दिलेल्या सेवा (कंसात संख्या)

- महिंद्रा CIE, KUL., महिंद्रा फौंड्री, बजाज ऑटो Shell India, कोका कोला, महिंद्रा व्हेईकल मॅन्यूफॅक्चरिंग लिमिटेड, जॉन डियर कंपनी, Aloha Lifestyle, सुबोधन कंपनी (४६८)
- COEP, प्रवाह संस्था, हैद्राबाद; राष्ट्रोत्थान संस्था, बेंगलोर; स्वयंसिद्धा महिला मंडळ, लातूर (४८९)
- नेतृत्व संवर्धन विभाग, वेल्हा येथील युवती सहनिवास (५२)

## शोधनिबंध प्रसिद्धी

- The Indian Police Journal : 'Pain in the Uniform (Exploring the quality of life and life satisfaction among lady officers from CISF and ITBP and Police) – श्री. प्रमोद फळणीकर, वा. अनघा लवळेकर व कांचन पांडे
- Journal of Pyscho-Social Research : Determinants of Mental Health of Adolescent Girls in Pune City – वा. प्रणिता जगताप
- Indian Journal of Social Work : 'Gender Differences in Emotional and Moral Responses among Children' – सुजाता होनप, वीणा शेपाळ, मृणाल परांजपे

## परिषदांमधील विशेष सहभाग

| | |
|---|---|
| July 2019 | Graduate Women International Centenary , conference, Geneva<br>Dr. Anagha Lavalekar, Anita Gurjar, Anjali Railkar<br>Say No- Stop Abuse (a demonstration of awareness building session for prevention of child sexual abuse) |
| July 2019 | Graduate Women International Centenary conference, Geneva<br>Dr. Anagha Lavalekar<br>Empowering youth to internalize and spread gender parity through sexuality education |
| October 2019 | National conference - Indian Institute of Public Health, Gandhinagar<br>Dr. Anagha Lavalekar<br>Occupational Stress and Mental Health Issues among Uniformed Personnel in India Methods for early recognition of mental health problems among uniformed personnel |
| October 2019 | Indian Institute of Public Health, Gandhinagar<br>National conference on Occupational Stress and Mental Health Issues among Uniformed Personnel in India<br>Dr. Sucharita Gadre, Exploring the mental health of police inspectors of Maharashtra, India |
| December 2019 | 87th National Symposium for Heads of Police Training Institutes, Delhi<br>Dr. Vanita Patwardhan<br>Personality Differences in Adult Learners & How to motivate them (panel discussion) |

# ७ संस्कृत-संस्कृति-संशोधिका

➤ ज्ञान प्रबोधिनी प्रणीत संस्कारविधींचा पुरोहित गटामार्फत पुण्यात, महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर प्रचार व प्रसार वाढत आहे. पौरोहित्य उपक्रमाच्या माध्यमातून वर्षभरात झालेल्या प्रमुख पूजा, शांती व संस्कारविधींची संख्यात्मक मांडणी खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नामकरण | २० | लक्ष्मीपूजन | १९ | दाहकर्म | १३२ |
| उपनयन | ११० | साठीशांती | ३४ | एकोद्दिष्ट श्राद्ध | १९४२ |
| सत्यनारायण | ५०२ | पंचाहत्तरी | २१ | वेदपूजन | २२७४ |
| विवाह | ९५ | वास्तुशांती | ३३९ | वर्षश्राद्ध | १६३४ |
| गणेश प्रतिष्ठापना | ६९ | सहस्रचंद्रदर्शन शांती | २६ | अन्य संस्कार | ६३ |
| मंगळागौरी | ३१ | महालय श्राद्ध | १०५ | **एकूण संस्कार** | **७४१६** |

## संत्रिकेद्वारे स्वयंपौरोहित्याच्या प्रसारासाठी घेण्यात आलेल्या विविध कार्यशाळा

| प्रशिक्षकाचे नाव | विषय | कार्यशाळेचे नाव | गट / सदस्य संख्या | तारीख |
|---|---|---|---|---|
| वाच. आर्या जोशी व प्रशिक्षक गट | स्वयं पौरोहित्य | पूजा प्रशिक्षण वर्ग | ३२ | १५ जुलै २०१९ |
| वाच. आर्या जोशी | प्रशिक्षक प्रशिक्षण (पुणे व डोंबिवली) | गणेश प्रतिष्ठापना | १७ | २४ व २६ जुलै २०१९ |
| वाच. मनीषा शेटे | स्वयं पौरोहित्य | गणेश प्रतिष्ठापना | चिपळूण | १७ व १८ ऑगस्ट २०१९ |
| वाच. सुजाता बापट<br>माधुरी करवडे<br>उर्मिला बेटकर | स्वयं पौरोहित्य | गणेश प्रतिष्ठापना | संत्रिका, पुणे | १८ ऑगस्ट २०१९ |
| विद्याधर मराठे<br>विद्याधर कुलकर्णी<br>राजेंद्र मोरे | स्वयं पौरोहित्य | गणेश प्रतिष्ठापना | स्वरूपवर्धिनी, पुणे | १८ ऑगस्ट २०१९ |
| माधुरी करवडे<br>नीला खडकीकर<br>वाच. सुजाता बापट | स्वयं पौरोहित्य<br>स्वयं पौरोहित्य | गणेश प्रतिष्ठापना<br>लक्ष्मी पूजन | संवादिनी, पौड रोड, पुणे<br>संत्रिका, पुणे | २५ ऑगस्ट २०१९<br>१६ ऑक्टोबर २०१९ |

## प्रशिक्षकांनी घेतलेल्या विविध कार्यशाळा

| प्रशिक्षक | विषय | कार्यशाळा/व्याख्यान | आयोजक | तारीख |
|---|---|---|---|---|
| वाच. सुजाता बापट | मासिक बैठक | प्रथा, परंपरा आणि संस्कार | रोटरी क्लब ऑफ पुणे, मेट्रो | ३ सप्टेंबर २०१९ |
| वाच. आर्या जोशी | मासिक बैठक | श्राद्ध संस्कार | संवादिनी, पुणे | — |
| उर्मिला बेटकर | | गुढी पाडवा | इंदिरा महिला बचत गट | |
| अदिती देवधर | पुरोहित साप्ताहिक बैठक | आपली मुळा-मुठा नदी | जीवित नदी गट व संत्रिका | ९ ऑगस्ट २०१९ |
| सुरेखा लिखिते | — | हिंदू संस्कारातील प्रतीके | महाराष्ट्र परीट महिला मंडळ, पुणे | २४ जानेवारी २०२० |

ज्ञान प्रबोधिनीच्या संस्कारांचे एक वैशिष्ट्य म्हणजे 'सार्थता'. पुरोहित यजमानांना विधींचा अर्थ समजावताना मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांचाही उपयोग करीत असल्याने आंतरप्रांतीय /आंतरदेशीय विवाहांची संख्या सध्या वाढत आहे. तमिळ व तेलगु, ख्रिश्चन व हिंदू वधू-वर असेही विवाह झाले.

**o विशेष विवाह**

१९ डिसेंबर २०१९ला दुबई मधील 'Fairmont Ajman Resort' अजमान, या ठिकाणी वाच. मनीषा शेटे व सुनीती गाडगीळ यांच्या हस्ते भारतीय वधुवरांचा विवाह संस्कार झाला.

**o नोंद घेण्यासारखे**

- १५ जुलैपासून संत्रिकेत नवीन पौरोहित्य वर्ग झाले. या वर्गात ३२ सदस्य होते. यावेळी प्रथमच वर्गात मातृभूमिपूजन पोथी प्रशिक्षण दिले गेले. पोथीमागचा विचार प्रा. प्रशांत दिवेकर व आदित्य शिंदे यांनी मांडला, अखिलेशदादा कसबेकर आणि मीराताई शेटे यांनी वर्गात मार्गदर्शन केले. औंध येथेही पौरोहित्य प्रशिक्षण वर्ग झाला त्यात २५ सदस्य सहभागी झाले आहेत.
- १९ जुलै रोजी झालेल्या गुरुपौर्णिमा कार्यक्रमात चंदाताई पागे यांचे 'मन करारे प्रसन्न' विषयावर कीर्तन झाले. गुरुपौर्णिमेची रक्कम पुरोहित गटाने नागरी वस्तीच्या कार्यासाठी मा. हर्षाताई किर्वे यांच्याकडे सुपूर्त केली.
- जानेवारी २०२० मध्ये गेली अनेक वर्षे संत्रिकेच्या माध्यमातून 'दाहकर्म' संस्कार करणाऱ्या चित्रा चंद्रचूड यांच्यावर मुंबईतील Xavier's Institute of Communication मधील विद्यार्थ्यांनी लघुपट बनवला आहे.
- लेख प्रसिद्ध - वाच. आर्या जोशी यांचे मंत्र पुष्पांजली व भाद्रपद महिन्यातील व्रते या विषयावर लेख प्रसिद्ध झाले.

**o तंत्रज्ञानाचा वापर**

स्वयंपौरोहित्यासाठी उपलब्ध केलेली सुविधा - दरवर्षी भाद्रपदात संत्रिकेतर्फे गणेश प्रतिष्ठापना App गुगल प्ले स्टोअर वर उपलब्ध करून दिले जाते. त्याला याही वर्षी चांगला प्रतिसाद मिळाला.

मीनाताई घाटपांडे यांनी अमेरिकेमध्ये महालय श्राद्ध दूरस्थ पद्धतीने केले.

✦✦✦

## ८ सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र

ज्ञान प्रबोधिनीच्या भवितव्यलेखात नोंदवलेल्या सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्राचे पायाभरणीचे काम संत्रिकेतून आंतरविद्याशाखीय अभ्यास गटाच्या माध्यमातून सुरू आहे.

### ■ वैचारिके

ज्ञान प्रबोधिनी संस्थेतील व संस्थेबाहेरील तज्ज्ञांनी अनेक महत्त्वाच्या विषयांची मांडणी केली. यामध्ये डॉ. अनघा लवळेकर, सुवर्णा गोखले, डॉ. गुरुदास कामत, डॉ. उल्हास बापट, प्रा. महेश साने, डॉ. संजय तांबट, प्रा. राम डिंबळे, डॉ. गिरीश बापट, दीपाली पाटवदकर, प्रदीप परांजपे, अतुलचंद्र कुलकर्णी, असित अरगडे, संतोष गोंधळेकर यांनी मार्गदर्शन केले. अभयाताई टोळ व वीणाताई लिमये यांनी पुस्तकाचा अभ्यास करून त्याबद्दल मांडणी केली. या एकोणीस वैचारिकांना सरासरी ३० ते ३५ जणांचा गट उपस्थित होता.

**o सत्रांचे विषय**

राष्ट्रीय एकात्मता -आठ सत्रे (तीन पाठपुरावा सत्रांसह),
अर्थशास्त्र -तीन सत्रे, तंत्रज्ञान-दोन सत्रे,
संशोधन -एक सत्र राज्यशास्त्र-एक सत्र
सामाजिक व्यवस्था/प्रसारमाध्यमे - दोन सत्रे,
उत्क्रांती-एक सत्र, नेतृत्व - एक सत्र

अशी एकोणीस सत्रे घेण्यात आली. ज्ञान प्रबोधिनीच्या विविध विभागांतील सदस्य व कार्यकर्ते, विद्यार्थीही याचा लाभ घेतात. अनेक विषयांचा आंतरसंबंध या वैचारिकांतून उलगडून दाखवला जातो.

### ■ राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशा प्रशिक्षण वर्ग

केंद्राच्या वतीने राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशेसाठी दोन दिवसांचा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला. ज्ञान प्रबोधिनीच्या विविध केंद्रातील व विभागांतील कार्यकर्त्यांचा यामध्ये सहभाग होता. परिस्थिती ज्ञान संकल्पना सत्र, परिस्थिती ज्ञानातून सामाजिक जाणीव संवर्धन, परिस्थिती ज्ञानासाठी माध्यमांचा वापर, सद्य घटनांचा अभ्यास, नमुना पाठ व चर्चा, गटचर्चा कशा घ्याव्यात, राष्ट्रीय एकात्मता आणि परिस्थिती ज्ञान अशी सत्रे ज्ञान प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांनी घेतली. याला गटचर्चांची जोड होती. प्रशिक्षण वर्गाच्या सुरुवातीला मा. संचालकांचे 'अध्यात्मिक राष्ट्रयोग' यावरील व्याख्यान झाले. यामध्ये ६५ कार्यकर्ते व नऊ संयोजक सदस्य उपस्थित होते.

**१) राष्ट्रीय एकात्मता अभ्यास गट :** राष्ट्रीय एकात्मतेचे पैलू समजून घेण्यासाठी २८ जून २०१९ ते १३ मार्च २०२० या कालावधीमध्ये १० ते १२ जणांनी मा. विश्वनाथ गुर्जर यांच्या मार्गदर्शनाखाली 'राष्ट्रीयत्वाचे पैलू' या मा. गिरीशराव बापट यांच्या पुस्तिकेचा अभ्यास केला. एकूण २६ बैठका वर्षभरात झाल्या.

**२) सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र चिंतनगट :** वरील सर्व उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी सात-आठ सदस्यांचा चिंतन गट महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या मंगळवारी एकत्र भेटतो. या वर्षी चिंतनगटाच्या सतरा बैठका झाल्या.

✦✦✦

# ९ ग्राम विकसन

| ■ पाणीटंचाई निवारण | ■ पाणलोट क्षेत्र विकास | ■ सौर ऊर्जा प्रचार प्रसार |
|---|---|---|
| विहीर खोदाई व बांधकाम उपक्रम | श्रमकार्य उपक्रम | सौर पॅनेल व दिवे जुळणी प्रशिक्षण |
| फेरोसिमेंट टाकी बांधकाम | अनुभवकथन व अभ्यासभेट | सौर दिवे प्रसार उपक्रम |
| विहीर लोकार्पण कार्यक्रम | | |

## ■ पाणीटंचाई निवारण

भोर व वेल्हे तालुक्यातील डोंगराळ भागातील दुर्गम गावांमधील पाणीटंचाई निवारणाच्या उपक्रमावर गेली काही वर्षे विभागातर्फे विशेष भर देण्यात येत आहे. यासाठी शासनाच्या अधिकृत पाणीटंचाईग्रस्त गावांच्या यादीचा आधार घेऊन तीन वर्षांहून अधिक काळ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या गावांना यात प्राधान्य देण्यात येते. पाणीटंचाई निवारणाच्या या उपक्रमात झरे विकास, नवीन विहीर खोदाई, जुन्या विहिरींचे खोलीकरण व रुंदीकरण, नवीन नळपाणी पुरवठा योजना, जुन्या नळपाणी योजनेची दुरुस्ती, पाणी साठवण टाकीचे बांधकाम आदी विषय लोकांच्या सहभागातून केले. श्रमदान व लोकवर्गणी याआधारे प्रत्येक गावाचा सहभाग निश्चित करून कामापोटी येणाऱ्या खर्चाच्या मोठ्या रकमेची तजवीज मात्र पुण्यातील विविध कंपन्यांच्या सीएसआर् निधीतून करण्यात येते.

### ○ विहीर खोदाई व बांधकाम उपक्रम

- खोदकाम पूर्ण झालेल्या विहिरीभोवती संरक्षक कठडे बांधण्याचे काम पूर्ण : वेल्ह्यातील गेळगाणे-कचरेवस्ती, निगडे-कोकरेवस्ती, बालवड-पळसगाणे, मुळशीमधील मुगाव -दुधवान
- गेल्या वर्षीचे खोदकाम व संरक्षक कठडे या वर्षी पूर्ण - गुंजवणे-धनगरवस्ती
- नव्याने काम चालू करून विहिरींचे खोदकाम पूर्ण - भोर मधील शिळींब, वेल्ह्यातील निगडे-कोकरेवस्ती, बालवड-पळसगाणे व मुळशीमधील मुगाव-दुधवान. हे बांधकाम आपले बीड जिल्ह्यातील कार्यकर्ते ज्ञानोबा भोसले यांनी प्रत्यक्ष गावात निवासी थांबून पूर्ण करून घेतले.
- निगडे-कोकरेवस्ती ही खरे तर शासनाने बांधलेली जुनी विहीर पण तिची शासकीय कागदपत्रात नोंद नव्हती. आपण या विहिरीच्या जागेचे शासनाच्या नावे बक्षीसपत्र करण्यासाठी पाठपुरावा केला. आपण या सरकारी विहिरीचे रुंदीकरण व खोलीकरण केले. बांधकाम करण्यात आलेल्या सर्व विहिरीच्या जागांचे शासनाच्या नावे बक्षीसपत्रे करण्यासाठी मोठ्या चिकाटीने पाठपुरावा करून ती मिळवण्यात आली आहेत.
- तीन गावांमध्ये ग्रामस्थांनी विहीर खोदकामामध्ये मोठ्या प्रमाणात श्रमदान केले तर अन्य दोन गावांमध्ये ग्रामस्थांनी आर्थिक योगदान दिले. अर्थसाहाय्य प्रामुख्याने पर्सिस्टंट फौंडेशन व इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड यांच्याकडून मिळाले.

### ○ फेरोसिमेंट टाकी बांधकाम

- पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीसाठी फेरोसिमेंट टाक्यांचे बांधकाम (लोकसहभागातून)- भोर तालुक्यातील दुर्गाडी, अभिपुरी व कोंडगाव आणि वेल्हे तालुक्यातील पाल बुद्रुक व भोसलेवाडी अशा पाच गावांमध्ये हे बांधकाम झाले. ही सर्व गावे दुर्गम व डोंगराळ असून या टाक्यांमुळे या गावातील पाणी साठवणुकीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. या सर्व टाक्यांचे यंदाचे वैशिष्ट म्हणजे यावर फेरोसिमेंट तंत्रज्ञानाच्या आधारे झाकणे बसविण्यात आलेली आहेत.
- पाल बुद्रुक व कोंडगाव येथील टाक्यांसाठी पॉलिवन इंडिया या कंपनीचे तर भोसलेवाडी येथील टाकीसाठी इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड यांचे अर्थसाहाय्य मिळाले. कोंडगाव व भोसलेवाडी या गावांनी प्रत्येकी २५ हजार रुपयांचे योगदान टाकी बांधकामासाठी दिले आहे.
- विशेष साहाय्य - मुंबईतील जलवर्धिनी संस्थेचे श्री. उल्हास परांजपे यांचे या फेरोसिमेंट टाकी बांधकामासाठी वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन लाभले.
- ग्रामीण भागात फेरोसिमेंट तंत्रज्ञानाचा वापर पाणीसाठवण टाक्यांच्या बांधकामासाठी केल्याबद्दल ज्ञान प्रबोधिनीस फेरोसिमेंट सोसायटी ऑफ इंडियातर्फे 'व्ही.डी. जोशी स्मृती पुरस्कार' देऊन यंदा सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. फेरोसिमेंट सोसायटीचे अध्यक्ष चंद्रमोहन हंगेकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अजित देशपांडे व प्रदीप जाधव यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

### ○ विहीर लोकार्पण कार्यक्रम

साळूंगण (ता. भोर) येथे बांधून पूर्ण झालेल्या विहिरीचे उद्घाटन केपीआयटी टेक्नॉलॉजीचे मुख्य कार्यकारी अधिकारी किशोर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी केपीआयटीचे सीएसआर् अधिकारी तुषार जुवेकर, संतोष सांडभोर तसेच सरपंच राजेश रांजणे, उपसरपंच अनंता दुरकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञान प्रबोधिनीचे सहकार्यवाह विश्वनाथ गुर्जर होते. विहिरीचे खोदकाम चालू असताना पुण्यातील महाविद्यालयीन युवकांना आवर्जून विहिरीवर श्रमदानासाठी घेऊन येणाऱ्या युवक विभागातील श्रीकांत काशिद याचा ग्रामस्थांच्यावतीने विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. भुतोंडे-खिळदेववाडी (ता. भोर) येथे बांधून पूर्ण झालेल्या विहिरीचे उद्घाटन पर्सिस्टंट सिस्टिमचे

मुख्य प्रशासकीय अधिकारी केदार परांजपे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. याप्रसंगी पर्सिस्टंट फौंडेशनचे सीएस्आर अधिकारी वैभव निकम, उपसरपंच वनिता डोंबे, शिवाजी कंक, तानाजी डोंबे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रबोधिनीच्या संत्रिका विभागातील समन्वयक डॉ. मनीषा शेटे होत्या. विहिरीच्या जलपूजनाचे पौरोहित्य पुरोहिता मीना घाटपांडे यांनी केले.

## ■ पाणलोट क्षेत्र विकास

### ० श्रमकार्य उपक्रम

वेल्हे तालुक्यातील मेटपिलावरे गावात बारा मीटर लांबीचा व एक मीटर उंचीचा वनराई बंधारा घालण्यात आला. या उपक्रमात केपीआयटी या माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) कंपनीतील ३४ पुरुष व १७ महिला कर्मचारी सदस्यांनी सहभाग घेतला. या बंधाऱ्यामुळे परिसरातील विहिरींचा पाणीसाठा वाढण्यास तसेच पुढे महिनाभर जनावरांसाठी पाणी उपलब्ध होण्यास मदत झाली.

सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगतर्फे यंदाही राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे वेल्हा परिसरात घेण्यात आली. वरोती बुद्रुक, वाजेघर खुर्द व गुहिणी येथे झालेल्या शिबिरात १०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. शिबिरात अजित देशपांडे यांनी अनुभवकथन केले. श्रमकार्याचा भाग म्हणून परिसरातील ओढ्यांवर तीन वनराई बंधारे व दोन दगडी बांध शिबिरार्थींनी घातले.

### ० अनुभवकथन व अभ्यासभेट

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कशेळे येथील 'शबरी सेवा समिती संस्थे'च्या प्रशिक्षण वर्गामध्ये अजित देशपांडे आणि सुनिताताई गायकवाड यांनी पाणीटंचाई निवारण कार्यक्रम अनुभवकथन केले. या वर्गात पालघर व नंदुरबार जिल्ह्यातील सुमारे सव्वाशे वनवासी कार्यकर्ते सहभागी झाले होते. आरोग्य विषयक जनजागृती व पाणी प्रश्नांवर हे कार्यकर्ते काम करतात. याला जोडूनच कर्जत येथील 'अनंत ओक वनौषधी संशोधन व संवर्धन प्रतिष्ठान केंद्रा'लाही अभ्यासभेट देण्यात आली.

## ■ सौर ऊर्जा प्रचार प्रसार

### ० सौर पॅनेल व दिवे जुळणी प्रशिक्षण

साळुंब्रे (ता. मावळ) येथे ज्ञान प्रबोधिनीतर्फे नुकताच सौर पॅनेल जुळणी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. सिगेट कंपनीच्या अर्थसाहाय्यातून या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. निवडक तेरा युवकांना या प्रशिक्षण वर्गात मोफत प्रशिक्षण देण्यात आले. सौर दिवे जुळणीचेही प्रशिक्षण या वर्गात देण्यात आले. प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन ग्राम प्रबोधिनीचे कार्यवाह व्यंकटराव भताने यांनी केले. तज्ज्ञ प्रशिक्षक म्हणून मितेश आचवल व प्रदीप जाधव यांनी काम पाहिले. वर्ग पूर्ण करणाऱ्या निवडक युवकांना सिगेट टेक्नॉलॉजीच्या पुणे केंद्रातील अभियांत्रिकीचे वरिष्ठ संचालक निरंजन पोळ यांच्या हस्ते त्यांच्या प्रबोधिनी भेटीत प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी सिगेट कंपनीचे जर्मन तज्ज्ञ हेल्मट पॉल, सीएस्आर अधिकारी जतिंदर वर्मा, केदार पाटणकर, सायली राजे हे उपस्थित होते.

कांबरे बु. (ता. भोर) या गावी ग्रामीण महिलांसाठी सौर दिवे जुळणी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण वर्गामध्ये २५ महिला आणि चार युवक सहभागी झाले होते. प्रशिक्षणातून महिलांनी स्वतः तयार केलेले दिवे त्यांना सवलतीच्या दरात देण्यात आले. या प्रशिक्षण वर्गासाठी इनरव्हिल क्लब ऑफ निगडी प्राईड यांनी अर्थसाहाय्य केले. यावेळी क्लबच्या अध्यक्षा रेखाताई मित्रगोत्री, माजी अध्यक्षा प्रतिभाताई दलाल उपस्थित होत्या. प्रदीप जाधव यांनी मुख्य प्रशिक्षक म्हणून तर अनिल पालकर यांनी साहाय्यक म्हणून काम केले.

### ० सौर दिवे प्रसार उपक्रम

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन परिसरातील मेघरे गावात सौर दिव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. मेघरे गावात ४२ तर दीपकवाडी येथे २२ कुटुंबांना सौर दिवे देण्यात आले. या वेळी सौर दिवे जुळणीचे प्राथमिक प्रशिक्षण ग्रामस्थांना थेट गावात जाऊन देण्यात आले. यासाठी पुण्याहून मितेश आचवल व प्रदीप जाधव यांनी प्रत्यक्ष गावात जाऊन प्रशिक्षक म्हणून काम पहिले. ग्रामीण भागात सौर दिव्यांचा प्रसार करणाऱ्या शारदाश्रम फौंडेशनला ४४५ सौर पॅनेल बनवून देण्यात आले.

**जपानी प्रशिक्षक भेट :** पुण्यातील ज्ञान प्रबोधिनीच्या सौर पॅनेल जुळणी प्रशिक्षण केंद्राला जपानी तज्ज्ञ प्रशिक्षक तोशिओ ताजिमा यांनी भेट दिली. याप्रसंगी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विभागप्रमुख डॉ. मनोज राठोड उपस्थित होते. जपानमधील खेडेगावात प्रसार करण्यासाठी त्यांना आपण ५५ सौर दिवे, ५४ मोबाईल चार्जर व दहा सौर पॅनेल बनवून दिले आहेत.

✦✦✦

# १० कृषी तांत्रिक विद्यालय, शिवापूर

## ■ कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

कातयंत्र चालक आणि स्वयं-कातारी चालक (CNC) असे दोन वर्ग या वर्षी घेण्यात आले. दोन्ही वर्गात एकूण २३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. केंद्रात प्रथमच कमवा आणि शिका योजना शिवापूर भागातल्या कंपनीबरोबर राबवली.

### ० कातयंत्रचालक तुकडी

या शैक्षणिक वर्षात तेरा विद्यार्थ्यांनी या तुकडीमध्ये प्रवेश घेतला होता. यामधील दहा विद्यार्थी हे स्थानिक परिसरातील होते व पुण्याबाहेरील तीन विद्यार्थी केंद्रात निवासी होते. दर वर्षीप्रमाणे प्रात्यक्षिके व अध्यापनाचे तास घेतले गेले. प्रात्यक्षिक म्हणून

प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःला वापरता येईल अशा वस्तूचे चित्र तयार करून ती वस्तू अध्यापकांच्या मदतीने बनवली. उद्योजकता विकसनाच्या दृष्टीने आपले माजी विद्यार्थी त्यांच्या व्यवसायाबद्दल विद्यार्थ्यांशी बोलायला आले होते. प्रशिक्षण वर्ग पूर्ण केल्यानंतर पुढील नोकरीच्या संधी अशा विषयावर विद्यार्थ्यांची काही सत्रेही घेण्यात आली. या प्रशिक्षण वर्गाला यावर्षी पहिल्यांदाच कमवा आणि शिका योजनेची जोड देता आली.

### ० कमवा शिका योजना

पुण्याबाहेरील विद्यार्थ्यांची निवास व भोजनाचा खर्च मिळवण्याच्या दृष्टीने यावर्षी कमवा/शिका योजना राबवली गेली. प्रशिक्षण केंद्राजवळच असणाऱ्या देसाई इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. या कंपनी बरोबर मिळून आपल्याकडील शिकाऊ विद्यार्थ्यांना त्यांच्या कंपनीत नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली. प्रशिक्षण वर्गातील सहा तास संपवून हे विद्यार्थी कंपनीमध्ये दुसऱ्या पाळीला जायला लागले. या विद्यार्थ्यांच्या दर महिन्याच्या वेतनातून प्रशिक्षण वर्गाचा, निवासाचा व भोजनाचा मासिक खर्च भागवून दर महिना सरासरी ३,००० रुपये विद्यार्थ्यांना स्वतःला मिळत होते. देसाई इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. या कंपनीत या मुलांना काही तांत्रिक कौशल्ये, नोकरीचे महत्त्वपूर्ण नियम शिकता आले व कंपनीत काम करायचे म्हणजे काय हे अनुभवता आले. यावर्षी सांगली व उस्मानाबाद येथील दोन विद्यार्थ्यांनी कमवा शिका योजनेचा लाभ घेतला.

### ० स्वयं-कातारीचालक तुकडी (CNC)

तीन महिन्यांचा स्वयं-कातारी शाखेचा अभ्यासक्रम यावर्षी प्रथमच प्रशिक्षण केंद्रात घेतला. Technofour कंपनी कडून घेतलेली Trainer CNC व Milling machine या अभ्यासक्रमासाठी वापरली. या तुकडीमध्ये दहा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. तीन महिन्यांमध्ये स्वयं-कातारी यंत्राची ओळख, Engineering Drawing प्रमाणे Toolpath तयार करणे, त्यासाठीचा प्रोग्रॅम वाचता येणे व त्यात छोटे बदल करता येणे आणि स्वयं-कातारी यंत्राची थोडीफार दुरुस्ती करता येणे ही काही उद्दिष्टे ठरविण्यात आली होती. प्रात्यक्षिकांचा सराव करण्यासाठी संगणक कक्ष तयार करण्यात आला ज्यामध्ये Simulation Software च्या आधारे विद्यार्थ्यांना प्रोग्रॅम लिहिणे शिकवले गेले.

### ० दसरा कार्यक्रम

यावर्षीही यंत्रपूजा करून दसऱ्याचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. दोनही तुकड्यांचे विद्यार्थी, अध्यापक यावेळी उपस्थित होते. प्रशिक्षण केंद्रात वर्षभर नियमित साप्ताहिक बैठका होत होत्या. यामध्ये नियोजन करणे, दर महिन्याची आर्थिक पत्रके तयार करणे व विद्यार्थ्यांबाबत निरीक्षणे नोंदवली. दोन्ही तुकड्यांचा सुधारित अभ्यासक्रम अध्यापक वर्गाकडून तयार केला. कोरोना संकटामुळे दोन्ही तुकड्यांच्या अंतिम परीक्षा घेता आल्या नाहीत. अभ्यासक्रमाचे संगणकीकरण करणे, आर्थिक हिशोब पूर्ण करणे व पुढच्या तुकडीची तयारी सुरू करणे इत्यादी कामे या काळात केली गेली.

✦✦✦

## ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास संचालित

## कमला मेहता नेत्र रुग्णालय (शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा)

ग्रामीण भागात नेत्रसेवा करण्याच्या उद्देशाने या रुग्णालयाची स्थापना १९९७ मध्ये झाली. आजतागायत दोन लाखांहून अधिक रुग्णांना नेत्रसेवा पुरवण्यात आली आहे. रुग्णालयाचा उद्देश ग्रामीण सेवा हा असून पहिल्यापासून ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी, औद्योगिक संस्थांच्या कामगारांची नेत्र तपासणी, आठवड्यातून दोन वेळा नेत्रशिबिर, रुग्णांची विनामूल्य ने-आण व शस्त्रक्रिया इ. उपक्रम आग्रहपूर्वक केले जातात.

### ० सध्याची परिस्थिती

- बाह्य रुग्ण विभाग : दोन द्विपदवीधर स्थायिक नेत्रविशारद उपलब्ध. दरमहा आठ शल्यविशारदांची भेट
- पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध
- महिन्यातून एकदा : स्पेशॅलिटी ओ.पी.डी., रेटिना ओ.पी.डी., लेसर ओ.पी.डी., टेरिजियम, लॅक्रीमल सॅक व अ‍ॅन्टीरियर सेगमेंट शस्त्रक्रिया
- आठवड्यातून दोन वेळा फॅको शस्त्रक्रिया
- महिन्यातून दोनदा ग्लुकोमा शस्त्रक्रिया
- दिव्यांग व्यक्तींसाठी शिबिरे
- शिकाऊ नेत्रविशारदांसाठी योग्य मार्गदर्शन व अनुभव
- अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज रुग्णालय - सर्वोत्तम दर्जाची नेत्रचिकित्सा व चष्म्याचे दुकान.
- Research activity KAP study on diabetic retinopathy in rural population

| ० चालू वर्षातील रुग्णसंख्या | | २०१८-१९ |
|---|---|---|
| बाह्यरुग्ण विभाग | एकूण | १२,३७० |
| शस्त्रक्रिया - मोतीबिंदू | एकूण | १,०५२ |
| शालेय विद्यार्थी तपासणी शिबिरे | एकूण | ३,६९९ |
| मोफत नेत्रतपासणी शिबिरे | | ४२ |

# ११ स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

| ■ महिला | ■ युवती | ■ किशोरी | ■ अन्य प्रकल्प |
|---|---|---|---|
| बचतगट, स्वयंरोजगार | प्रशिक्षण, अभ्यासदौरे | नियमित तासिका | कातकरी विकास प्रकल्प |
| नेतृत्व, आरोग्य | दल, खेळघर | क्षेत्रभेट | |
| समूहगुणविकसन | | निवासी शिबिरे / मेळावे | |

## ■ महिला

### ○ बचत गट

ज्ञान प्रबोधिनीच्या मार्गदर्शनाखाली गेली २५ वर्षे बचत गटाचे काम चालू आहे. अनेक वर्षांच्या कामामुळे बचत गट हे ग्रामीण महिलेच्या विकासातील सहभागाचा दरवाजा बनला आहे. सध्या ५६ गावात २३६ गट चालू आहेत. या गटांमध्ये दर महिन्याला रु. ८,९७,२५०/- बचत होते. बचतीबरोबरच महिला आता गटातून कर्ज घेणे, त्याचा घराच्या कामासाठी उपयोग करणे व परतफेड करणे, शिकल्या आहेत. त्यांच्यासाठी आरोग्य तपासण्या व मार्गदर्शन होते. स्वयंरोजगार प्रशिक्षणाची माहिती देतो, कधी सहलीची योजना करतो तर कधी बँकेतून कर्ज मिळवून देतो. सगळ्या बचत गटांतून मिळून वर्षभरात दिलेले कर्ज काही कोटी रुपयांचे असते.

### ○ समूहगुण प्रशिक्षण

'स्त्री शक्ती प्रबोधन'चे ग्रामीण भागात संघटनेचे काम करणाऱ्या २२ गावातल्या ३९ कार्यकर्त्यांचे निवासी समूहगुण प्रशिक्षण झाले. प्रबोधिनीचे संचालक वा. गिरीश बापट व कार्यवाह श्री. सुभाष देशपांडे यांनी गटाला अनुक्रमे संघटन मूल्ये व भविष्यवेध या विषयावर मार्गदर्शन केले. गटागटात बसून स्वयंरोजगार, आरोग्य, नेतृत्व या विषयांच्या विभागातील चालू कामाची एकमेकांनी माहिती घेतली. कार्यक्रम शिस्तबद्ध करण्यासाठी आज्ञा कशा द्यायच्या, याचा सराव गटाने केला. येत्या दहा वर्षांत काय काम करावे, हे स्वप्न गटाने एकत्र पाहिले.

### ○ स्वयंरोजगार

या अंतर्गत शिवण कामाचे विविध प्रकार, ओरिगामी वस्तू बनविणे, मण्यांपासून विविध वस्तू बनविणे, चॉकलेट व केक बनविणे, क्रोशाच्या वस्तू बनविणे, क्विलिंग पेपरच्या वस्तू बनविणे इ. ४६ प्रशिक्षणे घेतली. ४४ गावांतील ३६७ महिलांनी प्रशिक्षण घेतले. क्विलिंग पेपर पासून दिवाळी दिवे बनवायचा मोठ्ठा व्यवसाय गटाने केला. अशा दिव्यांचे उत्पादन करून त्यांनी गावोगावी प्रशिक्षणही घेतले.

### ○ नेतृत्व

गाव पातळीवर महिलांनी नेतृत्व करावे यासाठी मासिक बैठकीतून नियमित प्रशिक्षण होते. सहली, मेळावे यातून पण गाव पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळते. नवरात्रात ५० गावांत मेळावे घेतले. त्यात १६२६ महिला सहभागी झाल्या. त्यातल्या पाककला स्पर्धेत २९१ महिलांनी भाग घेतला तर बारा गावात या निमित्ताने ३७० गावकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. मेळावे झाल्यानंतर ५५ जणींचा शोधबोध मेळावा झाला. त्यात सगळ्यांनी आलेल्या वेगळ्या अनुभवांचे कथन केले. संक्रांतीला अठरा गावात तिळगुळाचे स्नेह मेळावे घेण्यात आले. यामध्ये ६७५ महिला सहभागी झाल्या व नेतृत्व बैठकीतील सतरा जणींनी मेळावे घेण्याची संधी घेतली.

## ■ युवती

### ○ जास्वंद गिरीकन्या निवास

या वर्षी वेल्ह्यामधल्या सहनिवासात ३१ मुली होत्या. T.Y. B.com ला असलेली सुषमा ७२% मिळवून पहिली आली आणि मंगल ७१% मिळवून तिसरी आली. याचा परिणाम म्हणून प्रवेशाची संख्या वाढून या वर्षी ४० जणींनी निवासासाठी अर्ज केले. दरवर्षीप्रमाणे अभ्यासाला पूरक शनिवारच्या शाळेचे उपक्रमही झाले. बरची, हिवाळी निवासी शिबिरे, यात्रेत विक्री हे सगळे उपक्रम करून अभ्यासही झाला हे विशेष!

### ○ युवती प्रशिक्षण

सुट्टीमध्ये विधायक काम करण्याची संधी म्हणून एप्रिल-मे महिन्यात येथील इ. १२वीच्या पुढच्या बारा युवतींनी पूर्णवेळ काम केले. शिवापूर उपकेंद्र भेट, पुणे प्रबोधिनी केंद्र भेट, काहींची निगडी प्रबोधिनी केंद्र भेट झाली. या गटाने शाळा व गावपातळीवर किशोर-किशोरी मेळावे घेतले आणि युवतींचा कौशल्य वर्ग घेतला, कातकरी वस्त्यांवरील मुलांसाठी सत्र घेतले, कातकरी अभ्यासासाठी सर्वेक्षणाच्या प्रश्नावली भरून घेणे असे काम करण्याचा अनुभव घेतला. प्रशिक्षणाचा समारोप पुण्यात मा. संचालकांच्या मार्गदर्शनाने झाला. यातून पुढील काम करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली.

### ○ युवती अभ्यासदौरा

वेल्ह्यातील युवतींचा महिनाभर कामाचा अनुभव घेऊन झाल्यावर तेरा जणींचा पहिला अभ्यासदौरा कोकणात झाला. कोकणात कुडावळे येथे रहाणाऱ्या दिलीप-पौर्णिमा कुलकर्णी यांच्या घरी भेट झाली. तर महाजनांची पर्यावरण पूरक सोडा फॅक्टरी, हरणे येथील मासळी बाजार पाहिला. महाड जवळ खैरे-वलंग येथे श्रमजीवी जनता साहाय्यक मंडळ यांच्या सुरुवातीपासूनच्या कामाची मांडणी डॉ. गिरीश बडवे व अशोक आखाडे यांनी केली. मत्स्योत्पादनाचे प्रशिक्षण व कामाची माहिती विठ्ठल कोळेकर यांनी दिली. तसेच दोन कातकरी वस्त्यांनाही त्यांनी भेटी दिल्या. या संस्थेचे संस्थापक मा. डॉ. बाळासाहेब कोळेकर व त्यांच्या सहकाऱ्यांची भेट साताऱ्याला

जाऊन घेतली. अनुभव कथनानंतर त्यातील काहींनी मत्स्य विक्री करण्यासाठी सुकट खरेदीचा अनुभव घेण्यासाठी गुंतवणूक केली.

**○ नवचैतन्य दल**

दहा गावात प्राथमिक शाळेतल्या मुलांसाठी दल चालते. दलावर येणाऱ्या ११० मुले/मुली यांचा व दल घेणाऱ्या एकोणीस मार्गदर्शिकांचा मेळावा झाला. या मेळाव्यात मुलांना विविध प्रकारचे खेळ आणि काही हस्तकौशल्ये शिकवली. जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात वेल्हे/शिवापूर भागातील दलावर नियमित येणाऱ्या मुलांसाठी घेतलेल्या सूर्यनमस्कार स्पर्धेमध्ये ५५ जणांनी भाग घेतला.

**○ खेळघर**

खेळघर हा नवा उपक्रम जुलै २०१९ पासून पाच गावांत आठवड्यातून दोन दिवस सुरू झाला. इ. पहिली ते सातवीपर्यंतच्या साधारण ६० ते ६५ मुलांचा सहभाग यात असतो. खेळघर प्रशिक्षकांची निगडी केंद्रातील खेळकर साहित्य बघण्यासाठी सहल काढली.

## ■ किशोरी

**○ नियमित तासिका**

पाच शाळांमध्ये वर्षभरात नऊ जीवनकौशल्ये व दोन हस्तकौशल्यांच्या तासिका झाल्या. जीवनकौशल्यांमध्ये व्यक्तिमत्त्व विकसन, नाते शरीर मनाचे, शारीरिक व मानसिक स्वास्थ्य, आरोग्य आहार यावर व्याख्याने व हस्तकौशल्यांमध्ये राखी बनविणे, पणती बनविणे, उत्तर पत्रिका सजविणे याचे प्रशिक्षण झाले. किशोरींना शिक्षणातल्या विविध संधी माहिती व्हाव्यात व चार भिंतीबाहेरचे जग पाहता यावे, यादृष्टीने चार शाळांमधील एकूण ८० किशोरींच्या क्षेत्रभेटी योजण्यात आल्या.

**○ निवासी शिबिर**

दि. २८-२९ डिसेंबर २०१९ ला १०१ किशोरींचे निवासी शिबिर राम-सीता पुराणिक महिला प्रशिक्षण केंद्र शिवापूर येथे झाले. सुट्टीत गावपातळीवर मुला-मुलींचे नवनिर्मिती हा विषय घेऊन दोन तासाचे मेळावे घेण्यात आले. यात ५५ गावांतील १४९५ मुलामुलींनी सहभाग घेतला. यासाठी वेल्हे भागातील बारा युवती, पुणे प्रशालेतील ९वी मुली, नवनगर विद्यालय निगडी येथील अग्रणी मुलामुलींनी काम केले. या प्रकल्पात दहा सदस्यांच्या गटाने जबाबदारी घेऊन काम केले. या उत्साही गटामुळे काम वेगाने पुढे सरकले. प्रकल्पाचे वर्षिक मूल्यमापन करायाला बजाज कंपनीच्या प्रतिनिधींची भेट झाली.

**○ नवदिशा प्रकल्प**

जानेवारी २०२०ला सुरुवात झालेल्या या प्रकल्पात ५० गावांतील ५० महिला सहभागी आहेत. कार्यकर्त्यांचे नेतृत्व विकसन व्हावे व त्यांनी पुढे जाऊन गावातील महिलांसाठी काम करावे अशी कल्पना आहे. त्या प्रकल्पाअंतर्गत बँकेत स्वतःचे खाते काढणे, सहल काढणे, विमा काढणे असे उपक्रम झाले. गणपतीपुळे येथे झालेल्या अभ्यासहलीमध्ये त्यातील ५० पैकी ३८ जणी सहभागी झाल्या होत्या. आरोग्य विमा काढण्याच्या कामात स्वतःचा व मैत्रिणीचा असे ८५ जणींचे आरोग्य विमा काढून पूर्ण झाले.

**○ टेलिमेडिसिन प्रकल्प**

(साहाय्य रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड) - वेल्हे तालुक्यातील करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येणाऱ्या अकरा आशा सेविकांच्या मदतीने टेलिमेडिसिन प्रकल्प झाला. यात १०७७ जणांची आरोग्य तपासणी झाली. सह्याद्री हॉस्पिटल व करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्रासोबत टेलिमेडिसिनची ट्रायल झाली. अडवली येथील कार्यालयात १४० जणींचा मेळावा घेऊन मेळाव्यात स्वयंरोजगाराची वेगवेगळी प्रशिक्षणे घेतली.

## ■ अन्य प्रकल्प

**○ आरोग्य सखी प्रकल्प**

बजाज कंपनीच्या आर्थिक साहाय्यातून आरोग्य सखी प्रकल्प वेल्हे तालुक्यातील ५० गावांसाठी जानेवारी २०१९ पासून सुरू झाला. या प्रकल्पाअंतर्गत पुढीलप्रमाणे सात विषयांवर एकूण १३८ जाणीव-जागृती सत्रे घेतली - १) ओळख स्पर्शाची (४४६ विद्यार्थी, २२ सत्रे), २) सॅनिटरी पॅड वापराविषयी माहिती (६१७ महिला, ३१ सत्रे), ३) स्त्री रोग (३८९ महिला, १९ सत्रे), ४) जंत संसर्ग (८९५ महिला, १७ सत्रे), ५) तंबाखू दुष्परिणाम (७०१ महिला, ३४ सत्रे), ६) मानसिक आरोग्य (१११ महिला, ५ सत्रे), ७) सकस आहार (२०२ महिला, १० सत्रे). यातून ३३६१ लोकांपर्यंत हे विषय पोहोचवले. याशिवाय डॉक्टरांच्या मदतीने पुढील सहा प्रकारची तपासणी शिबिरे घेतली - डोळे तपासणी, गरोदर माता तपासणी, गर्भाशय कॅन्सर तपासणी शिबिरे, हिमोग्लोबिन तपासणी, दात तपासणी, बाल आरोग्य तपासणी. या सहा प्रकारच्या १११ शिबिरांत २८३४ महिला व मुलांच्या तपासण्या झाल्या.

**महत्त्वाची नवीन भर :** मार्चमध्ये प्रकल्पाअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सहा वर्षापर्यंतच्या २०० बालकांना टायफाईड व काविळ (हिपेटायटिस) या लसी दिल्या. प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी डॉ. प्राजक्ता दोशी ह्यांनी याची जबाबदारी घेतली. या दोन्ही लसी सरकारी लसीकरणात समाविष्ट नाहीत.

**○ कातकरी विकास प्रकल्प २०१९-२०२०**

मालवलीच्या दोन वस्त्यांवर पाच ते पंधरा या वयोगटातील ४४ मुलांसाठी तर चेलाडी व कासुर्डी या वस्तीवरील १०५ मुला-मुलींसाठी नियमित सत्र घेतले. शारीरिक स्वच्छता व परिसर स्वच्छता यातून मुलांना नखं कापणे, दात घासणे, केस विंचरणे, हात-पाय धुणे याचे शिक्षण दिले. अभ्यासाची गोडी लागावी, इंग्रजी शब्द मोठ्या आवाजात म्हणणे, गणिती खेळ, बुद्धीला चालना देणारे मैदानी खेळ व त्यातून व्यायाम करणे इ. चा यात समावेश होता. अशा प्रकारे चार वस्त्यांवर मिळून १२१ सत्रे झाली. नियमित सत्रांमुळे मुलांमध्ये बदल दिसायला लागला आहे. मुलांसाठी पेशवे उद्यान व रेल्वे म्युझियम या दोन ठिकाणी सहल झाली.

➤ **प्रेरणा शिबिर** - दि. २८ व २९ डिसेंबर रोजी ३४ कातकरी

मुलांचे पहिले शिबिर वेल्ह्यामध्ये झाले. शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून दप्तर व स्वच्छता अशा दोन फिल्म पाहून त्यावर चर्चा झाली.

- **कातकरी मेळावा –** वेल्ह्यात पहिला कातकरी मेळावा दि. २० जून २०१९ला झाला. मेळाव्याचा उद्देश लोकांचे प्रश्न व अडचणी जाणून घेणे हा होता. प्रबोधिनीच्या द्वितीय प्रतिज्ञित कार्यकर्त्या कुंदाताई कचरे (रायदंडवाडी) यांचे अनुभवकथन झाले. जिद्द ठेवली तर गावासाठी जे हवे ते करता येईल, असे मोठे उदाहरण ताईंच्या माध्यमातून त्यांच्या पुढे होते. नंतर वस्तीवरच्या प्रश्नांवर, अडचणींवर चर्चा झाली. मा. शुभांगीताई तांबट कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या. ३० महिला, २५ पुरुष व १६ मुले-मुली असे नऊ गावांतील ७१ जण उपस्थित होते.

■ **याशिवाय..**

- **मराठी विकिपीडिया –** मराठी विकिपीडियावर ३० महिलांवर लेख लिहिले, भर घातली. यात यमुनाबाई सावरकर, निर्मला सीतारामन, अदिती पंत, कांचन परुळेकर, जानकी तेंडुलकर अशा महिलांचा समावेश आहे. पाबे, गेळगाणे, साखर, अशा कार्यक्षेत्रातल्या २१ गावांची भर विकिपीडियावर घातली.
- **विकिस्रोत (पुस्तके) –** प्रबोधिनीची पुढील सहा पुस्तके विकिस्रोतवर सगळ्यांना वाचनासाठी खुली केली- बँकेत पाऊल टाकण्यापूर्वी, बचत गटासाठी कार्यक्षम व्यवस्थापन प्रशिक्षण पुस्तिका, केल्याने होत आहे रे, आम्ही बी घडलो तुम्ही बी घडाना, महर्षी दयानंद काय म्हणाले?, रूप पालटू शिक्षणाचे. विकिपीडिया कॉमन्सवर 'काम करणाऱ्या महिलांचे' साधारण ७० फोटो फोटोथॉन अभियानाअंतर्गत समाविष्ट केले.
- **फिल्टर वाटप (CSR मिबा कंपनी) –** लोकांना स्वच्छ पाणी प्यायला मिळालं तर आजारांपासून त्यांना दूर ठेवता येईल, या विचारातून फिल्टर देण्याचे ठरवले. मिबा या रांजणगाव येथील कंपनीच्या आर्थिक मदतीमुळे 'टाटा स्वच्छ' फिल्टरचे कुंबळे व कुसारपेठ या गावातील १००% कुटुंबांना तर आंबवणे, आस्कवाडी, विहीर, वडगाव झांजे गावातील निवडक घरांना तसेच अंगणवाडीला व प्राथमिक शाळांनाही वाटप केले. त्यानिमित्ताने या कंपनीचे अधिकारी कुंबळे गावात येऊन गेले.
- **शाळांना वॉटर फिल्टर भेट –** 'रोटरी क्लब ऑफ गांधी भवन' यांच्या आर्थिक मदतीने अकरा शाळांमध्ये आरो वॉटर फिल्टर बसविण्यात आले. ज्या शाळांमध्ये पाण्याच्या टाकीची सोय नाही, अशा पाच शाळांमध्ये फिल्टरसह १००० लिटरची पाण्याची टाकीसुद्धा देण्यात आली.
- **डेली कलेक्शन –** ज्यांच्या उद्योगात रोज घातलेले भांडवल परत मोकळे होते (म्हणजे हॉटेल, पीठ गिरणी, शिवण) अशा ३० महिलांना २० ते ४० हजार रुपयांचे भांडवल पुरवले. त्याची परतफेड रोज १०० रुपयाप्रमाणे झाली. गटातल्या धडपड्या महिलांनी त्याला चांगला प्रतिसाद दिला. त्यातून कोणाचे व्यवसाय नव्याने सुरू झाले तर, कोणाचे होते ते मोठे झाले. काही जणींनी प्रथमच प्रासंगिक उद्योग करून या कर्जाची फेड केली. यामुळे कुटुंबालाही कमाईचा हातभार लागलाच! कुटुंबातल्या महिलेचा सन्मानही वाढला.
- **राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन –** जानेवारी-डिसेंबर २०१९ या काळात शिवण, चॉकलेट, केक, मणीकाम, क्विलिंग प्रशिक्षणाचे ३५ वर्ग झाले. त्यात कुसगाव, रांजे, कल्याण, इ. १२ गावातून १८३ जणी प्रशिक्षित झाल्या. या प्रयत्नामुळे २३ जणी नियमित उत्पादन कामामध्ये सहभागी झाल्या. महिलांनी बनवलेल्या उत्पादनाची रु. २,९४,६५२/- विक्री केली.

✦✦✦

## आरोग्य फेरी, ८ मार्च २०२०, जागतिक महिला दिन

ग्रामीण भागातल्या स्त्री-शक्ती प्रबोधनाच्या कामाला २५ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने, जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ८ मार्च २०२० रोजी किशोरी, युवती व महिला आरोग्य फेरीचे आयोजन केले होते. ही फेरी विंझर गावापासून वेल्हे गावापर्यंत अशी दहा कि. मी. होती. गेली चौदा वर्षे गरोदर महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी वेल्ह्यात येणाऱ्या डॉ. वैशालीताई बिनीवाले यांनी फेरीचे उद्घाटन केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एडके, करंजावणे प्राथमिक केंद्राचे डॉ. नांदेडकर, पोलीस अधीक्षक श्री. देवकर असे सर्वजण सहभागी झालेल्या सगळ्यांना महिला दिनाच्या शुभेच्छा व प्रोत्साहन देण्यासाठी आले होते. नऊवारी साडी नेसणाऱ्या ५० पेक्षा जास्त महिलांसह ४५० पेक्षा जास्त जणींनी दहा कि. मी अंतर चालत किंवा पळत ओलांडले. पुण्यातून आलेल्या पाच महिला डॉक्टर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टरही पाच कि.मी. चालले. या वेळी पोलीसांचे सहकार्य उल्लेखनीय होते. शासकीय आरोग्य खाते अगदी स्वतः डॉक्टरांपासून आशा सेविकांपर्यंत सगळे फेरीमध्ये चालले. वेल्ह्याच्या सहनिवासातल्या सतरा मुलींच्या आया फेरीमध्ये सहभागी झाल्या. नंतरच्या सभेत २५ वर्षात झालेल्या कामाचा आढावा, डॉक्टरांचे सत्कार, पाहुण्यांची मनोगते, मार्गदर्शन इ. झाले. वेगवेगळ्या गटांमधल्या चालणाऱ्या/पळणाऱ्या पहिल्या तीन जणींचे स्मृतीचिन्ह देउन कौतुक केले. गावागावातल्या प्रतिनिधींनी व सर्वच गटांच्या प्रयत्नामुळे हा कार्यक्रम अविस्मरणीय तर झालाच पण सगळ्याच गटाला नवीन ऊर्जा देणारा ठरला. सहा वर्षाची बाल-किशोरी ते ७४ वर्षाची ज्येष्ठ महिला या वयोगटातल्या १२० किशोरी, ८६ युवती, ६२० ग्रामीण महिला एकूण ६६ गावांमधून आल्या होत्या. त्याशिवाय प्रबोधिनीच्या अनेक विभागातील सदस्य, काही संस्थांच्या प्रतिनिधी अशा ४५ जणी मिळून ८९० जणींचा सहभाग होता.






















१. स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) - आरोग्य तपासणी
२. नेतृत्व संवर्धन केंद्र- साहस शिबिर
३. विस्तार केंद्र, डोंबिवली - विद्याव्रत संस्कार
४. युवती विभाग - गणेशोत्सव बरची प्रात्यक्षिक
५. संवादिनी- द्विदशकपूर्ती, स्नेहसेतु मेळावा
६. स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) - लग्नात हिमोग्लोबिन तपासणी शिबिर
७. संत्रिका - गणेश प्राणप्रतिष्ठा कार्यशाळा










१. संवादिनी- अभ्यास दौऱ्यात लातूर येथे विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक डॉ. अशोकराव कुकडे आणि डॉ. ज्योत्स्ना कुकडे यांच्याबरोबर
२. ग्रामीण युवती कोकण अभ्यास दौऱ्यात कुडावळे येथे श्री. दिलीप कुलकर्णी आणि पौर्णिमा कुलकर्णी यांच्याबरोबर
३. युवती विभाग पंजाब अभ्यासदौरा - इक्बाल सिंग लालपुराजी यांच्यासह
४. ज्ञान प्रबोधिनी, निगडी - दुर्गजागर मोहीम










५. ज्ञान प्रबोधिनी, निगडी - सायकल सहल
६. नागरीवस्ती- सावित्री दल शिवापूर-वेल्हे अभ्याससहल
७. छात्र प्रबोधन - अंध उद्योजक श्री. भावेश भाटिया यांच्या महाबळेश्वर येथील कारखान्याला भेट
८. पौडरस्ता संवादिनी अभ्यासदौऱ्यात आनंदवन येथे श्रद्धेय बाबा आणि साधनाताई आमटे यांच्या समाधीस्थळी






















१. ज्ञान प्रबोधिनी, हराळी - मैत्री पुस्तकांशी कुमार साहित्य मेळावा
२. ज्ञान प्रबोधिनी सोलापूर - गणेशोत्सव लेझीम मधील नाट्य
३. ज्ञानसेतू - बारांगबारी, सोनीतपूर (आसाम)
४. ज्ञान प्रबोधिनी, निगडी - पूर्वप्राथमिक अभिव्यक्ती सादरीकरण
५. गणेशोत्सव मिरवणूक - विस्तार केंद्र, अंबाजोगाई
६. ग्राम प्रबोधिनी,साळुंब्रे - पवनामाई उत्सव, पथनाट्य सादरीकरण
७. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला - प्रकल्प सादरीकरण



















१. शैक्षणिक उपक्रम संशोधिका - प्रज्ञा विकास उपक्रम
२. विस्तार केंद्र डोंबिवली - सेतुबंधन मेळावा
३. निगडी केंद्राचे - सांगली- कोल्हापूर पूर मदतकार्य
४. स्पर्धा परीक्षा केंद्र - सेवा प्रकल्पात सहभागी सदस्य
५. शैक्षणिक उपक्रम संशोधिका- विवेक इन्स्पायर, अरुणाचल प्रदेश
६. विस्तार केंद्र अंबाजोगाई - पाथरा गावातील ग्रामसभा
७. सोलापूर केंद्र - विडी घरकुल येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर
८. विस्तार केंद्र अंबाजोगाई - श्रमदानाची आणि एकजुटीची ताकद






# १२ स्त्री शक्ती प्रबोधन (शहरी)

■ मासिक बैठक ■ समतोल द्वैमासिक ■ उमलत्या वयाशी... ■ पालवी
■ विद्याव्रत संस्कार ■ विकासिका ■ कौशल्य गट ■ ओळख स्पर्शाची

## ■ मासिक बैठक

➤ जुलै महिन्यात संवादिनीची प्रदीर्घ बैठक सिंहगड रिसॉर्ट येथे झाली. पुणे मध्यवर्तीच्या ४० आणि डोंबिवलीच्या चार अशा एकूण ४४ संवादिनी प्रथमच पूर्णवेळ मुक्कामी होत्या. 'तत्त्वसप्तक' या सूत्र विषयाची मुख्य मांडणी मा. अनघाताई लवळेकर, मा. श्रुतीताई फाटक, मा. गिरीशराव यांनी केली.

➤ मासिक बैठक म्हणजे संवादिनीचे प्रवेशद्वार. दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारी बैठक असते. त्याचे तपशील पुढील तक्त्यात दिले आहेत.

➤ त्याशिवाय संवादिनीशी जोडल्या गेलेल्या नवीन सदस्यांच्या गटासाठी गेल्या वर्षभरात जास्तीच्या सहा बैठका झाल्या.

| विषय | वक्ते |
|---|---|
| चार सख्य चोवीस | संपदाताई जोगळेकर, निर्मोहीताई फडके, सोनालीताई लोहार, हर्षदाताई बोरकर |
| 'पंजाब दौरा'-अनुभवकथन | ज्ञान प्रबोधिनी युवती विभागातील अनुभवी युवती |
| व्हेईकल जीपीएस ट्रॅकर - मुलाखत | उद्योजिका मनालीताई पाळंदे |
| जिनिव्हा परिषद अनुभवकथन | अनघाताई लवळेकर, सुवर्णाताई गोखले, अंजलीताई राईलकर, अनिताताई गुर्जर |
| समतोल प्रकाशन समारंभ | डॉ. आनंद नाडकर्णी |
| 'अजिंठा लेणे : गतकाळाचा वारसा' | राधिकाताई टिपरे |
| श्राद्ध : एक श्रद्धा पुष्प | आर्याताई जोशी |

## ■ समतोल द्वैमासिक

➤ विशिष्ट सूत्रविषय घेऊन समतोल द्वैमासिक काढले जाते. संवादिनी आणि समतोलच्या द्विदशकपूर्ती वर्षानिमित्त समतोलच्या प्रत्येक अंकात एक जुन्या काळातील आणि एक आजच्या काळातील अशा दोन स्त्री चरित्रांवर लेख घेतले होते.

➤ 'आव्हान पेलताना' या दिवाळी अंकाचे प्रकाशन ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या हस्ते ऑक्टोबर मध्ये झाले.

➤ प्रत्येक महिन्याचे अंकाचे विषय पुढीलप्रमाणे होते : एप्रिल - तंत्रज्ञान आणि आपण, जून - जलसाक्षरता, ऑगस्ट - दान, डिसेंबर - मैत्री (संपादन - डोंबिवली संवादिनी), जानेवारी (विशेषांक) - संवादिनी द्विदशकपूर्ती स्मरणिका : संवादिनीच्या वीस वर्षांच्या कार्याचा आढावा, फेब्रुवारी - संकीर्ण

## ■ उमलत्या वयाशी जुळवून घेताना...

➤ उमलत्या वयाशी जुळवून घेताना... हा किशोरवयीन मुलामुलींसाठी शास्त्रीयदृष्ट्या लैंगिकता प्रशिक्षण देणारा उपक्रम आहे. यामध्ये पालकांसाठी तसेच महाविद्यालयीन गटासाठीही कार्यशाळा घेतल्या जातात.

| कार्यशाळा-नाव | कार्यशाळा | लाभार्थी |
|---|---|---|
| उमलत्या वयाशी जुळवून घेताना | ७ | ६३२ |
| प्रशिक्षक-प्रशिक्षण | ३ | ४३ |
| तरुणाईची आव्हाने | ५ | २६८ |
| सहजीवनाच्या उंबरठ्यावर | १ | ७० |
| बहर जोपासताना | ४ | १६५ |

➤ जनता वसाहतीतल्या इ. ७वी ते १०वीच्या ५० मुलींना उमलत्या वयाशी जुळवून घेतानाच्या विषयांची गप्पांच्या माध्यमातून ओळख.

➤ परिमला पांडे व अंजली राईलकर यांनी संत तुकाराम महाराजांच्या लोणी येथील पालखी मुक्कामी, दोन दिंड्यांमधील महिला व ७५ स्वयंसेविकांना, राज्य महिला आयोगाच्या निर्मल वारी उपक्रमांतर्गत, Sanitory napkins चा वापर व त्याची योग्य विल्हेवाट तसेच पाळीच्या दिवसात घ्यायची काळजी यावर प्रबोधन केले.

➤ **विकासमित्र उपक्रम :** वेल्हे व पानशेत भागातील तेरा शाळांमध्ये इ. ८वीच्या मुलांसाठी सुरुवात.

## ■ पालवी

➤ ज्ञानदा गुरुकुल - मुलांच्या मूलभूत क्षमता विकसित करणे या उद्दीष्टाने, ५वी, ६वी, ७वीच्या २० ते २५ मुलामुलींसाठी दर सोमवारी तासिका घेतल्या. त्यासाठी विविध कृती खेळ व hands on projects करून घेतले.

## ■ विद्याव्रत संस्कार

➤ ज्ञान प्रबोधिनी प्रशालेबाह्य १३ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी 'विद्याव्रत संस्कार' गटातर्फे पुण्यातील व पुण्याबाहेरील विविध शाळांमध्ये या संस्काराच्या

व्याख्यानमाला घेतल्या जातात. तसेच काही शाळांमध्ये विद्याव्रत पूर्व तयारीच्या तासिका देखील घेतल्या जातात.

- विद्याव्रत गट सदस्यांसाठी 'जोपासना सत्र' या विषयावर मार्गदर्शन – सदस्य १३.

## ■ विकासिका गट

- इ.५वी, ६वी व ७वीच्या विद्यार्थ्यांचे सामाजिक भान वाढावे यासाठी हा गट काम करतो.

| ठिकाण | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| पृथ्वीराज मेमोरियल हायस्कूल | १७५ |
| वेल्हे, साखर, दापोडे, सोंडेमाथाना | १२० |
| लोणी काळभोर | १७६ |
| सरिता विद्यालय, पुणे | ४० |
| यशोदीप शाळा, वारजे | २५० |
| वेल्हे | ७० |
| कन्याशाळा, वारजे | १७५ |
| पानशेत | ३० |
| सरिता विद्यालय, पुणे | ४८ |

- विषय : प्रसार माध्यमे, निर्णय, प्रतिज्ञा, शारीरिक, मानसिक, सामाजिक स्व-ओळख, प्रतिज्ञेचा अर्थ, परिचय, आहार, स्वच्छता, सुरक्षा, प्रसार माध्यमे, निर्णय, स्व-जाणीव, स्व-ओळख
- ७ जून २०१९ : गटाच्या प्रदीर्घ बैठकीत 'भारत माझा देश आहे' या प्रतिज्ञेवर अभ्यास चर्चा झाली.

## ■ कौशल्य गट

- संवादिनीमधील समुपदेशनाचे औपचारिक शिक्षण घेतलेल्या सदस्यांचा समावेश कौशल्य गटात आहे.

| शाळा | इयत्ता | सत्रे | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| विद्याविकास | ७ वी | ८ | १८० |
| सुंदराबाईराठी शाळा | ८-९वी | ८ | ९० |
| विद्याविकास | ८ वी | ४ | १६० |
| गोपाळ हायस्कूल | ८-९वी | ६ | ४८ |

## ■ ओळख स्पर्शाची

- प्रशिक्षक प्रशिक्षणे

| ठिकाण/संस्था | सहभागी सदस्य |
|---|---|
| ज्ञान प्रबोधिनी, पुणे | २२ |
| अमरावती | ४८ |
| डोंबिवली संवादिनी | १९ |
| विकास मित्र प्रकल्प, वेल्हे | २४ |
| नगर | २२ |
| **एकूण** | **१३५** |

- शालेय मुलांसाठी कार्यशाळा : ३६ : विद्यार्थी संख्या ७३०२
- जिनिव्हा आंतरराष्ट्रीय परिषदेत अंजली राईलकर, अनिताताई गुर्जर, अनघाताई लवळेकर यांनी प्रात्यक्षिक घेतले.
- प्रज्ञा मानस संशोधिका आणि बजाज फिन्सर्व यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या 'ओळख स्पर्शाची' या प्रशिक्षक प्रशिक्षणाच्या प्रकल्पात हस्त पुस्तिका आणि चित्र पुस्तिका तयार करण्यात आणि मुख्य प्रशिक्षक म्हणून संवादिनी सदस्यांचा मोठा वाटा.

## ■ विशेष प्रकल्प

- सप्टेंबर २०१८ पासून संवादिनीचे सर्व गट मिळून सेवासदन शाळेतील ५वीच्या ३० मुलींसाठी एकत्र असा एक प्रकल्प करत आहोत. या वर्गावर इ. १०वी पर्यंत वेगवेगळ्या तासिका होतील. या तासिकांच्या सुरुवातीला, मध्ये आणि शेवटी प्रज्ञा मानस संशोधिका विभागाच्या मदतीने चाचण्या घेतल्या जात आहेत. या वर्षी या प्रकल्पांतर्गत पालवी गट आणि विकासिका गट यांनी आत्तापर्यंत २२ तासिका घेतल्या आहेत.
- **संयम प्रकल्प :** ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट, पुणे व ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने इ. ८वी-९वीच्या विद्यार्थ्यांमधील व्यसन परावृत्तीसाठी 'संयम' प्रकल्पांतर्गत, संयम पुस्तिका लेखन, प्रशिक्षक प्रशिक्षण, नव्या गटाला मार्गदर्शन, व प्रत्यक्ष कार्यशाळा घेणे यामध्ये उमलत्या वयाशी...चा पूर्ण गट सामील होता.

## ■ संवादिनी द्विदशकपूर्ती

स्वयंविकासातून समाजपरिवर्तनाकडे हे उद्दिष्ट ठेऊन एकत्र आलेल्या संवादिनी गटाला जानेवारी २०२० मध्ये वीस वर्षे पूर्ण झाली. हे वर्ष अनेक कृतीयुक्त उपक्रमांनी साजरे करायचे असे ठरवून जाने २०१९ पासून उपक्रमांना सुरुवात झाली. वर्षभर रोज दुपारी ३.३० वाजता संवादिनी सदस्यांच्या घरी किंवा एखाद्या गटात ज्ञान प्रबोधिनीची उपासना झाली. या चक्री उपासनेत एकूण सहा हजारपेक्षा जास्त व्यक्ती सहभागी झाल्या. घराबाहेर पडून काहीतरी करू इच्छिणाऱ्या स्त्रियांच्या सद्यःस्थितीतील मनःस्थितीचा व इच्छा-आकांक्षा यांचा वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण प्रकल्प केला. यामध्ये २७५ जणींचा प्रतिसाद नोंदवला. कुसगाव व कल्याण (ता. वेल्हे) येथील इ. ८वीच्या मुलामुलींच्या एकूण सतरा तासिका घेऊन जीवन कौशल्यांच्या माध्यमातून परस्परपूरकता पोचवण्याचा प्रयत्न झाला.

हराळी- लातूर- अंबाजोगाई येथे चार दिवसांचा अभ्यासदौरा झाला. यामध्ये चार संस्था आणि व्यक्तिभेटी झाल्या. द्विदशकपूर्तीच्या निमित्ताने झालेल्या मातृभूमी पूजनाला जोडून प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये आठ सदस्यांनी प्रथम आणि चार सदस्यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

■ **स्नेहसेतु मेळावा**

द्विदशकपूर्ती सांगता समारंभ आणि चक्री उपासना संकल्पपूर्ती निमित्त ११ जानेवारी २०२० रोजी रेणुका स्वरूप शाळेच्या सभागृहात स्नेहसेतु मेळावा झाला. परिसंवाद, मुलाखती, गटचर्चा, अनुभवकथन, निवेदने अशा विविध सत्रांमधून कार्यक्रम रंगत गेला. पुणे व ज्ञान प्रबोधिनीची विस्तार केंद्रे यामधून साधारण १८० सदस्या मेळाव्याला उपस्थित होत्या. मेळाव्यात संचालक मा. गिरीशराव बापट यांच्या हस्ते चार संवादिनी सदस्यांना कृतिशील संवादिनी हा पुरस्कार आणि मा. अनघाताई लवळेकर यांना तेजस्विनी संवादिनी कृतज्ञता पत्र देण्यात आले मा. संचालकांच्या मार्गदर्शनाने समारोप झाला.

✦✦✦

# १४ नागरीवस्ती अभ्यास गट

■ किशोरी उपक्रम ■ युवती उपक्रम ■ महिला उपक्रम
■ कुमार उपक्रम ■ किशोर उपक्रम

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून हेतुपूर्वक काही स्वयंसेवकांसह २०१० पासून हा पूर्णवेळचा विभाग कार्यरत आहे. कामाची भूमिका म्हणून आपले कुटुंब, शेजारचा परिसर, आसपासचे विविध समाजगट ते सीमावर्ती प्रांत या सर्वच ठिकाणी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने जागरूक राहून काम करणे, तसेच शहरातील वंचित व अभावग्रस्त समाजगटात समाजासाठी, देशासाठी आपणही काही करणे लागतो ही प्रत्येकात असलेली भावना जाणीवपूर्वक वाढवणे.

ज्ञान प्रबोधिनीमार्फत मातृभूमीपूजनासारखे व अन्य प्रबोधन प्रशिक्षणाचे कार्यक्रम घेऊन, कृतिशील संकल्प करायला लावून देशप्रेम जागृत ठेवण्याचा प्रयत्न गटातर्फे केला जातो.

**o कुटुंबातील विविध घटकांसाठी यावर्षी केलेले काम**

➤ **उन्हाळी शिबिरे :** नागरीवस्ती अभ्यास गटाच्या नियमितपणे काम चालणाऱ्या दहा वस्त्यांमध्ये आणि खैरेवाडी (प्रासंगिक) येथे उन्हाळी शिबिरांचे आयोजन झाले. शिबिरांमध्ये निरनिराळे खेळ, प्रार्थना, पद्य, कलासत्रामध्ये-वर्तमानपत्र वापरून वस्तू - पेन स्टॅंड, बाऊल, डब्या इ. बनवणे असे उपक्रम घेतले. एकूण दहा वस्त्यांमधून ५० किशोर आणि १०० किशोरी सहभागी झाल्या.

■ **किशोरी उपक्रम**

प्रबोधिनीमध्ये निरनिराळ्या वस्तीतील किशोरींची तीन व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे झाली. या शिबिरात मुख्य भर बर्ची नृत्याच्या सरावावर होता. प्रबोधिनीच्या विसर्जन मिरवणुकीत विविध वस्त्यांमधील ३० किशोरी सहभागी झाल्या. त्या व्यतिरिक्त पद्य गायन, खेळ, कलासत्रात गणपतीला आरास करण्याच्या वस्तू बनवणे तसेच गटकार्य झाली. एकूण वर्षभरात १४९ किशोरी उपक्रमात सहभागी झाल्या.

■ **युवती उपक्रम**

युवती उपक्रमांचे दोन प्रकारे नियोजन केले जाते. पहिल्या नियोजनात कार्यकर्ती प्रशिक्षण होते. हा युवतींचा गट किशोर, किशोरी तसेच युवती यांच्यासाठी काम करणारा असतो तर दुसऱ्या नियोजनात वस्तीतील युवतींची शिबिरे आयोजित केली जातात. कार्यकर्त्या प्रशिक्षणात व्यक्तिमत्त्व विकसना अंतर्गत अभ्यास बैठक दर शनिवारी होते. या बैठकीमध्ये पुस्तकाचे वाचन व त्यावर चर्चा होते. याशिवाय राजगड साहस सहल, वारीमधील सहभाग, वस्तीतील युवतींची तीन शिबिरे आयोजित केली. या शिबिरांमध्ये पद्य, खेळ, कलासत्रात वेगळ्या प्रकारचे कानातले डूल बनवणे इ. चा समावेश होता. सिद्धी प्रेरणा आणि करियर मार्गदर्शन यावर व्याख्याने झाली. अर्थासहित पद्य आणि मातृभूमी पूजन असे उपक्रम घेतले गेले. गणेशोत्सवात प्रबोधिनीच्या विसर्जन मिरवणुकीत भाग घेण्यासाठी वस्तीतील मुलींचा महिनाभर सराव करून घेतला. गणेशोत्सवात वस्तीमध्ये आणि वडारवाडीत नवरात्र उत्सवात प्रात्यक्षिके केली. वर्षभरात एकूण १९१ युवती सहभागी झाल्या.

■ **महिला उपक्रम**

वर्षभरात सावित्री दलाच्या प्रबोधिका गटाच्या नऊ बैठका झाल्या, तर दोन मोठे मेळावे झाले. प्रबोधिका गटात प्रत्येक वस्तीतील दोन प्रतिनिधी असतात, तर मोठ्या मेळाव्याला आत्तापर्यंत येऊन गेलेल्या सर्व महिलांना बोलावले जाते. जानेवारी महिन्यात स्नेह मेळावा आणि नवरात्रात शारदोत्सव असे दोन मेळावे झाले. प्रबोधिका गटाच्या बैठकीत बौद्धिक व गंमत खेळ, मनाच्या श्लोकांची निरूपणे, फिल्म पाहून त्यावर चर्चा, माहितीपर व्याख्याने आयोजित केली. यामध्ये पोलिस मुख्यालयात काम करणाऱ्या ॲड. प्रार्थना सदावर्ते यांचे अनुभवकथन, डॉक्टर रोहिणी आठवले यांचे त्वचादान व भाजून झालेले अपघात कसे टाळावे यावर व्याख्यान, नैसर्गिक संसाधने

विभागाची सुनीताताई गायकवाड यांनी ग्रामीण भागात पाण्याची केलेली कामे, खाद्यपदार्थ बनवण्याची प्रात्यक्षिके (आयडिया फाऊंडेशन) झाली. आधुनिक नवरात्र या संकल्पनेत नऊ कर्तृत्ववान महिलांची माहिती सांगितली. वेल्हे केंद्र येथे सहल असे विविध उपक्रम झाले.

## ■ कुमार उपक्रम

चांगल्या सवयी चांगला माणूस (विद्याव्रताच्या आशयावर आधारित मेळावे) : यापूर्वी मुलांसाठी होणाऱ्या उपक्रमात नियमित सहभागी झालेल्या, निवडक ३० मुलांसाठी वर्षभर मेळाव्यांची योजना केली होती. कार्यक्षेत्रातील सहा वस्त्यांमधून येणारी १२ ते १६ वर्षे या वयोगटातील ही मुले होती. एका निवासी मेळाव्यासहित सात मेळावे झाले.

या सगळ्या मेळाव्यांमध्ये शरीराला व्यायाम होणे, मनाला शांत वाटणे याचा अनुभव मुलांनी घेतला. बौद्धिक क्षमतांची ओळख करून दिली. स्वतःचे प्रश्न समजणे, सोडवता येणे व इतरांच्या अडचणी समजून घेता येणे यासाठी काही सत्रे घेतली. मैदानी व बैठे खेळ, छात्र प्रबोधन अंकाचे वाचन, नाटकाचे सादरीकरण, चित्र काढणे, काम करणाऱ्या दादांचे अनुभवकथन, मुलांची मनोगते, निरनिराळ्या विषयावरची माहिती, चर्चा करणे, धडपड प्रयोग शाळेत जाऊन इलेक्ट्रॉनिक आय (LED bulb) बनवणे, वर्तमानपत्रापासून वेगवेगळ्या वस्तू बनवणे — उदा. पेन स्टँड इ. काही सत्रे वैयक्तिक व काही जोडीने करायची होती. एका शिबिरातील सत्रांतर्गत स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून मुलांना रामकृष्ण मठात नेले होते. ज्ञान प्रबोधिनीतील प्रज्ञा मानसने सुवर्ण महोत्सवानिमित्त योजलेल्या, वयात येणाऱ्या मुलांसाठी घेतलेल्या सत्रात सहभाग घेतला.

## ■ किशोर उपक्रम

या मुलांनी वस्तीमध्ये दलांवर येणाऱ्या ८ ते ११ वर्षे या वयोगटातील मुलांसाठी प्रबोधिनीत मेळावा घेतला. मेळाव्यात पाच वस्त्यांमधून ४० किशोर आले होते. पद्य, खेळ व गोष्टींचे गटात वाचन झाले. मग प्रत्येक गटाला विषय देऊन नाटुकले बसवून सादरीकरण झाले.

**मदत कार्य :** दि. २४ सप्टेंबर रोजी कात्रज येथे जोरदार पाऊस पडून भिंत पडल्यामुळे पुण्यातील आंबेडकर वस्ती, अरण्येश्वर- तावरे कॉलनी, टांगेवाला कॉलनी, अण्णाभाऊ साठे नगर व जय मल्हार या वस्त्यांमध्ये पाणी शिरले. सर्व वस्त्यांमधून शिक्षण घेत असलेल्या मुला-मुलींची माहिती जमा करून शक्यतो एका घरात एकदा तरी मदत मिळेल असे नियोजन केले. काही ठिकाणी अतिशय गरजू मुलामुलींची माहिती तेथील कार्यकर्त्यांनी दिली. त्यावेळी वरील नियम बदलून सर्व मुलांना वाटप केले. सर्वेक्षण होऊन माहिती गोळा केल्यावर ३री व ४थीच्या मुलांना छोट्या सॅक आणि पाच वह्या तर ५वी ते १२वीच्या मुलांना मोठी सॅक व सहा फुलस्केप वह्या दिल्या. मदतकार्य व सर्वेक्षण यामध्ये नागरी वस्ती अभ्यास गटाचे दहा कार्यकर्ते, वरील वस्तीतील पाच नवीन कार्यकर्ते व युवक/युवती विभागातील पंधरा सदस्य यांचा समावेश होता.

### विशेष संस्मरणीय

**आधुनिक नवरात्र प्रबोधन करणारे वक्तृत्व प्रशिक्षणाचा अनुभव देणारे**

ज्ञान प्रबोधिनीमध्ये आधुनिक नवरात्र ही संकल्पना मांडली आहे. आणि काळानुरूप बदल म्हणून सावित्रीबाई फुले यांची जयंती ३ जानेवारी ते जिजाबाई यांची जयंती १२ जानेवारी चे औचित्य लक्षात घेऊन या कालावधीमध्ये नवरात्र साजरे करायचे ठरले.

नागरीवस्ती अभ्यास गटाच्या सावित्री दलाच्या मासिक बैठकीमध्ये हा विषय मांडला. नऊ कर्तृत्ववान महिलांची चरित्रे सादरीकरण किंवा माहिती या स्वरूपात मांडायचे असे ठरले. नवरात्र आहे म्हणून नऊ पुष्पांची माला अर्पण करू असे ठरले. पहिले पुष्प होते जिजाबाई भोसले ज्या आदर्श माता होत्या. दुसरे पुष्प होते अहिल्याबाई होळकर ज्या आदर्श राज्यकर्त्या होत्या. तिसरे पुष्प होते सावित्रीबाई फुले ज्यांनी मुलींसाठी शिक्षणाची कवाडे उघडली. चौथे पुष्प होते डॉ. आनंदीबाई जोशी ज्या भारतातील पहिल्या महिला डॉक्टर होत्या. पाचवे पुष्प होते सिंधुताई सपकाळ ज्या अनाथ मुलांच्या आई बनल्या. सहावे पुष्प होते किरण बेदी ज्या अतिशय प्रामाणिक आणि निडर पोलिस अधिकारी होत्या. सातवे पुष्प होते कल्पना चावला ज्या मूळ भारतीय वंशाच्या अमिरिकेत जाऊन अंतराळवीर बनल्या. ही सगळी पुष्पे वाहिली वस्तीत राहणाऱ्या महिलांनी. आठवे पुष्प होते मेरी कोम ज्यांनी बॉक्सिंग या खेळात प्रावीण्य मिळवले. शेवटचे पुष्प होते नागरीवस्ती अभ्यासगटाच्या प्रमुख हर्षाताई किर्वे ज्यांनी प्रबोधिनीत काम करून त्यांचे पूर्ण आयुष्य समाजाकरता वेचले. शेवटची दोन पुष्पे सावित्री दल सहविचार समितीच्या महिलांनी वाहिली.

पहिला कार्यक्रम नागरीवस्ती अभ्यास गटाच्या ५ जानेवारी रोजी झालेल्या युवती मेळाव्यात झाला. दुसरा कार्यक्रम ७ जानेवारी रोजी काशीवाडी येथे काशी विश्वेश्वर मंदिरात झाला. तिसरा कार्यक्रम ९ जानेवारी रोजी गांधी वस्तीतील बुद्ध विहारमध्ये झाला.

काशीवाडीमधील ३० महिला, गांधी वस्तीमधील २० महिला, युवती मेळाव्यात सहभागी झालेल्या ३० युवती, वस्तीतील सादरीकरण केलेल्या ७ महिला आणि सावित्री सहविचार दलाच्या ८ महिला अशा एकूण ९५ महिलांनी आधुनिक नवरात्राचा आनंददायी अनुभव घेतला.

**नागरीवस्ती अभ्यास गट (२०१९-२०२०) उपक्रम विषय तक्ता व सहभागी संख्या**

- **निरंतर नेतृत्वगुण विकास कार्यक्रम**

**→ किशोरी विकास**

| | | |
|---|---|---|
| **साप्ताहिक दल** | : काशीवाडी, वडारवाडी, दांडेकर पूल, सातचाळ, पाटील इस्टेट, गांधी वस्ती, शिवाजी नगर चाळ, विष्णुकृपा नगर, आंबेडकर वस्ती, मार्केट यार्ड (प्रासंगिक) | १५० |
| **उन्हाळी शिबिरे** | : १० वस्त्यांमध्ये खेळ, पद्य, कलासत्र - वर्तमानपत्राच्या वस्तू बनवतात | १०० |
| **प्रबोधिनीतील मेळावे** | : वर्षभरात तीन मेळावे | १४९ |

**→ किशोर विकास**

| | | |
|---|---|---|
| **साप्ताहिक दल** | : काशीवाडी, वडारवाडी, दांडेकर (१ व २), पाटील इस्टेट, गांधी वस्ती, शिवाजी नगर चाळ, विष्णुकृपा नगर | १५० |
| **उन्हाळी शिबिरे** | : खेळ, पद्य, कलासत्र, वर्तमानपत्राच्या वस्तू बनवणे | ५० |
| **निवासी शिबिर** | : Electronic Eye (LED bulb) बनवले, उपासना, मैदानी खेळ, वर्तमानपत्रापासून वेगवेगळ्या वस्तू बनवणे, ध्वजारोहण व व्याख्यान | ३५ |
| **प्रबोधिनीतले मेळावे** | : विद्याव्रतातील आशयावर आधारित सत्र (६ मेळावे) | ३० |
| **कुमार मेळावा** | : वस्तीतील मुलांचा प्रबोधिनीत मेळावा | ४० |

- **व्यक्तीगुण व नेतृत्वगुण विकास**

| | | |
|---|---|---|
| **युवती कार्यकर्ता प्रशिक्षण** | : प्रत्येक शनिवारी अभ्यास बैठक - पुस्तक वाचन व चर्चा | २२ |
| **युवती सांस्कृतिक कार्यक्रम** | :आळंदी-पुणे वारी, बर्ची नृत्य प्रात्यक्षिके गणेशोत्सव व नवरात्र उत्सव | ६० |
| **युवती साहससहल** | : राजगड ता.वेल्हे | २२ |
| **युवती तीन मेळावे** | : कलासत्र, खेळ इ. व्याख्याने - सिद्धी प्रेरणा | ८७ |

- **महिलांचे संघटन प्रबोधन प्रशिक्षण**

| | | |
|---|---|---|
| **सावित्री दल** | : प्रबोधिका बैठक - खेळ, चर्चा सत्रे, व्याख्याने इ. | ५४ |
| **विशेष मेळावे** | : शारदोत्सव, संक्रांत स्नेह मेळावा | २६२ |
| **आधुनिक नवरात्र** | : प्रबोधिनी व दोन वस्त्यांमध्ये कार्यक्रम- नऊ कर्तृत्ववान महिलांचा जीवनपट | ९५ |
| **सहल** | : स्त्री शक्ती प्रबोधन वेल्हे केंद्रास भेट | २८ |
| **स्वयं रोजगार** | : प्रबोधिनीत विज्ञान दिन व गणेशोत्सवानिमित्त खाद्यपदार्थ विक्रीचे गाळे | १० |
| **मदत कार्य** | : एकूण आठ वस्त्यांमध्ये १०७७ कुटुंबांचे सर्वेक्षण त्यापैकी ४७१ गरजू विद्यार्थ्यांना वाटप | १०७७ |
| | मा. संचालक मार्गदर्शित विशेष बैठका (६) विभाग कार्यकर्ता संच | २० |
| | **एकूण** | **२४४१** |

## १३ जिजामाता दल

यावर्षीच्या वर्षारंभ उपासनेला मार्गदर्शन करायला वाच. सुजल ताई वाटवे यांना बोलावले होते. त्यांनी वानप्रस्थाश्रम वयात सामाजिक व कौटुंबिक मध्ये आपला सहभाग यावर मांडणी केली. दरवर्षीप्रमाणे गोपाल काला, शारदोत्सव, भोंडला हे कार्यक्रम नेहमीप्रमाणे साजरे झाले. या वर्षी मा. सुनीतीताई सहस्त्रबुद्धे यांनी उषाताईंच्या 'समर्थ जीवनासाठी समर्थ विचार' या पुस्तकाचा अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शन केले. मा. राधा गोडबोले यांनी सरस्वतीची सखोल माहिती दिली. मा. आशाताई साठे यांचा 'चंद्र माझा' याविषयावर कार्यक्रम झाला. त्यात त्यांनी स्वतःला चंद्र सापडला का शोधला असा नवीन विचार सांगितला. मनीषाताई शेटे यांनी विद्या वाचस्पती पदवीसाठी केलेल्या कासव या विषयावर मांडणी केली. वंदना कामठे यांनी स्त्रियांचा आत्मसन्मान याबाबत ज्येष्ठ या नात्याने अनुभव लिहून घ्यायला सांगितले आहे. विजया साठे यांनी जगभर प्रवास केला त्याची माहिती सांगितली. मार्चमध्ये आयुका ला भेट दिली.

✦✦✦

# १५ युवक विभाग

## ■ महाविद्यालयीन दले

### ० अभ्यास शिबिरे

- युवक विभागातील सदस्यांचे देश परिस्थिती ज्ञान अद्ययावत राहावे हा हेतू
- विविध विषय व घटना यांचा परिचय
- कार्यशाळा पद्धतीने अभ्यास केला जातो

### ० गणेशोत्सव

- चार ठिकाणी वाद्यांचा सराव व प्रत्येक दलावर बरची नृत्याचा सराव.
- युवकांची संख्या मागच्या वर्षीपेक्षा वाढलेली दिसली.
- महिनाभर बरची अथवा वाद्यांच्या सरावासोबतच समूहगुण-विकसनाचे विविध उपक्रम - शहर परिचय खेळ, पथकश: स्पर्धा, पथक मेळाव्यात सहभाग, प्रासंगिकं असे विविध उपक्रम.

## ■ शालेय दले

- एकूण २३ बरची प्रात्यक्षिके आणि तेरा मिरवणुका झाल्या.
- गणेशोत्सवातील शेवटच्या पाच दिवसांमध्ये १५वे वार्षिक विज्ञान प्रदर्शन झाले.
  - ज्ञान प्रबोधिनी, गोखलेनगर आणि कोथरूड अशा तीन ठिकाणी इलेक्ट्रॉन ह्या विषयावर प्रदर्शन झाले.
  - प्रदर्शन ७००० पेक्षा जास्त लोकांनी बघितले.
  - ५वी ते पदवी झालेले युवक अशा सर्व प्रकारच्या युवकांनी हे प्रयोग सादर केले.
  - एकूण ४०-४५ प्रयोगांचे सादरीकरण झाले.
  - अतिशय मूलभूत संकल्पनाही स्पष्ट केल्या गेल्या.
  - अनेक अत्याधुनिक तसेच त्या-त्या शास्त्रज्ञाने शोध लावताना केलेले प्रयोग सादर झाले.

| शिबिर | तपशील | सहभाग, कालावधी आणि वक्ते |
|---|---|---|
| निवडणूक अभ्यास शिबिर | भारतीय निवडणूक पद्धतीचा अभ्यास, प्रभाव पाडणारे घटक, निवडणुकांचा इतिहास असे विषय अभ्यासून २०१९च्या लोकसभा निवडणुकांचे अंदाज वर्तवले. | दि. २० आणि २१ एप्रिल<br>शालेय दलांचे मार्गदर्शक +<br>बोस दलाचे युवक असे २५ सदस्य<br>वक्ते : नचिकेत नित्सुरे. |
| प्रबोधिनी वाङ्मय व विचार परिचय शिबिर | प्रबोधिनीच्या एकूण साहित्यामधील काही निवडक लेखांची निवड करून त्याचं वाचन आणि चर्चा ज्येष्ठ कार्यकर्त्यांची सत्रे, सर्वसाधारण प्रबोधिनीपण, विशेष प्रबोधिनीपण आणि तत्त्वसप्तक यावर मार्गदर्शकांची मांडणी | दि.११ ते १४ जुलै २०<br>शालेय मार्गदर्शक. |
| पुरातत्व अभ्यास विषय - परिचय शिबिर | पुरातत्वशास्त्राची ओळख, भारताचा पुरातत्वशास्त्रीय इतिहास या विषयावर दिग्विजय पाटील व चैतन्य साठे यांची सत्रे झाली. 'श्री विठ्ठल - एक महासमन्वयक' हे सत्र आशुतोष बारमुखदादाने घेतले. | दि. ५ व ६ ऑक्टोबर<br>१४ युवक |
| छत्तीसगढ दौरा (बोस दल) | पंचशील आश्रम, कुटरू आणि बीजापुर या दोन दुर्गम भागात कौशल्य विकसन हे उद्दिष्ट, नक्षलवादी भागात प्रभावीपणे कार्य करणाऱ्या अनेक व्यक्तींच्या भेटी व तेथील सामाजिक परिस्थिती समजून घ्यायचा प्रयत्न केला. | २३ डिसे.२०१९ ते ५ जाने. २०२०<br>पाच युवक<br>संयोजक : विराज देवचके |
| Critical thinking परिचय शिबिर | चार सत्रे - क्रिटिकल थिंकिंग म्हणजे काय? कसे आणि कुठे वापरावे? काय काळजी घ्यावी? शेवटच्या सत्रात congnitive biases वर गटचर्चा | दि. १४ व १५ मार्च<br>३८ युवक<br>वक्ते : नचिकेत नित्सुरे |
| समर्थ रामदास अभ्यास शिबिर | रामदासांचे चरित्र, कोमळ वाचा, करुणाष्टके, मनाचे श्लोक आणि रामदास काय म्हणाले याचा अभ्यास | दि. १४ व १५ मार्च<br>३६ शालेय मार्गदर्शक |
| रामजन्मभूमी निकाल अभ्यास | रामजन्मभूमी निकाल जो सुप्रीम कोर्टाने दिला, त्यातील तपशील समजून घेणे व त्या प्रश्नाची पार्श्वभूमी समजून घेणे. मांडणी+गटचर्चा | शालेय व युवक मार्गदर्शक+<br>निवडक युवक गट<br>वक्ते : नचिकेत नित्सुरे. |

आत्तापर्यंत शालेय व महाविद्यालयीन गटाच्या सामाईक उपक्रमांचे वृत्त होते. आता दलशः वृत्ते दिली आहेत. (दलाच्या नावासमोर ते दल चालवण्याची जबाबदारी घेतलेल्या मार्गदर्शकांची व वर्षभरात वेळोवेळी सहभागी होणाऱ्या युवकांची संख्या घातली आहे)

## ■ महाविद्यालयीन दले

### ० वर्षारंभ

महाविद्यालयीन गटाची वर्षारंभ उपासना झाली. या वेळी नियुक्त मार्गदर्शक अधिक दलांवर येणारे निवडक युवक उपस्थित होते. यावेळी एकूण ४४ नियुक्त्या झाल्या. ५ प्रतोद, ७ साहाय्यक प्रतोद, १६ मार्गदर्शक, १४ गट प्रमुख आणि २ अन्य नियुक्त्या झाल्या. एकूण १९ सदस्यांच्या जबाबदारीत वाढ झाली.

### ० मार्गदर्शक बैठका

मध्यवर्ती प्रबोधक प्रशिक्षण वर्गामध्ये शिकवलेल्या Log Frame Analysis ह्या तंत्राचे महाविद्यालयीन दलावरील मार्गदर्शकांसाठी प्रशिक्षण झाले. सर्व दलांच्या कार्यकारिणी गटांनी महाविद्यालयीन दलांसाठीच्या log frames तयार करण्याचे काम केले. मा. संचालकांनी सहविचार गटासाठी समस्या लिहून काढून त्यापासून समस्या वृक्ष बनविण्याचे सत्र घेतले. समस्या वृक्षांची मांडणी करताना एकमेकांशी संबंधित समस्या एका वृक्षात मांडून नऊ समस्या वृक्ष आणि त्यांचे नऊ उद्दिष्ट वृक्ष तयार केले. प्रत्येक दलाने पुढील वर्षासाठी एकूण उद्दिष्टांमधून आपले उद्दिष्ट निवडले. या Log Frames ची मांडणी मा. संचालकांसमोर वर्षारंभानंतरच्या बैठकीत झाली. या व्यतिरिक्त या बैठकांमध्ये प्रासंगिकांची/वैचारिकांची तयारी कशी करावी, शोधबोध कसा घ्यावा, विज्ञान शिबिराच्या पूर्वतयारीचा अभ्यास, अद्वैतमूलक राष्ट्रकेंद्रित विज्ञाननिष्ठ कर्मयोग या वर्णनाचा अभ्यास, तत्त्वसप्तक अभ्यास, विविध उपक्रमांचे नियोजन, संवाद कसा करावा, केलेल्या संवादाचे निवेदन करणे असे विषय झाले.

### ० डॉ. विक्रम साराभाई दल (१० मार्गदर्शक आणि ८० युवक)

- जानेवारी २०२० मध्ये ध्वनी विषयावर पुस्तिका लिहिण्याचे आणि काही इंग्रजीमध्ये असलेल्या पुस्तिकांचे मराठीत भाषांतर करण्याचे देखील काम सुरू झाले.
- जानेवारी पासून भागशः (कोथरूड, सहकारनगर, शिवाजी नगर) तीन पथके पाडून पथकशः रचना नव्याने लावण्यात आली.
- मे २०१९ मध्ये आसाम तर जून २०१९ मध्ये तेलंगणा या राज्यात विज्ञान प्रकल्प पद्धती प्रशिक्षण शिबिर झाले. आसामचे शिबिर हे विवेकानंद केंद्राच्या शाळेत तीन युवकांनी घेतले व तेलंगणामध्ये परामिता ग्रुप ऑफ स्कूल्स या शाळेत चार युवकांनी घेतले. संशोधनात्मक प्रकल्प पद्धती तेथील मुलांना व शिक्षकांना समजावी हे मुख्य उद्दिष्ट होते.
- मे आणि डिसेंबर २०१९ मध्ये पाच दिवसीय निवासी विज्ञान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक शिबिरात ३० मुले सहभागी झाली.

### ० नेताजी सुभाषचंद्र बोस दल (१२ मार्गदर्शक, १३० युवक)

गणेशोत्सवात साधारण ६०-७० युवक दलामध्ये सहभागी झाले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीच्या दिवशी त्यांच्यावर आधारित Bose : Dead or Alive ही मालिका, तान्हाजी, १९१७ असे चित्रपट एकत्र बघितले. १५ ऑगस्टला सहा ठिकाणी जाऊन ध्वजारोहण कार्यक्रम केले. त्यात साधारण २० युवक सहभागी झाले. २४ नोव्हेंबर रोजी कोकणदिवा येथे दलावरील पंधरा युवक गिर्यारोहणासाठी गेले होते.

### ० लोकमान्य टिळक दल (९ मार्गदर्शक, ५० युवक)

- दरवर्षी प्रमाणे उन्हाळ्यात श्रमदानाचे काम भागातील ३० युवकांनी केले. जून महिन्यामध्ये ११वी-१२वी च्या २५ युवकांची Career exposure ची कार्यशाळा झाली.
- जानेवारी महिन्यामध्ये महाविद्यालयीन युवकांसाठी प्रबोधिनीमध्ये नचिकेतदादा आणि वरुणदादा यांच्या मार्गदर्शनात अभियांत्रिकीच्या सुमारे ३० युवकांसाठी प्रकल्प पद्धतीचे प्रशिक्षण सत्र झाले.
- फेब्रुवारी महिन्यामध्ये टिळक दलाची सुमारे ९० किलोमीटरची सायकल सहल झाली. त्यामध्ये आठ युवक आणि तीन मार्गदर्शक सहभागी होते.
- मार्च महिन्यामध्ये टिळक दलावर २५ युवक घरून व्यायाम करण्याच्या उपक्रमात सहभागी होते. गटकार्यांना प्रोत्साहन देण्यासाठी किल्ले स्पर्धा या उपक्रमामध्ये सुमारे ३५ संघ सहकारनगर व वारजे भागातून सामील झाले होते. एकूण २०० हून अधिक कुमार व युवक यात सहभागी झाले होते.

### ० गोखलेनगर युवक दल (३ मार्गदर्शक, ४० युवक)

युवक दलाबरोबर भागातील शालेय दले मार्गदर्शक दुष्काळ निवारणाच्या कामात सहभागी झाले होते. युवक दलाने गणेशोत्सवात वाद्य सराव करून मिरवणुका व प्रात्यक्षिके केली. सांगली आणि सहकारनगर मदतकार्यात युवक सहभागी झाले. दलावर वेळोवेळी वेगवेगळ्या प्रबोधिनीतल्या कार्यकर्त्यांनी भेट दिली. माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे चरित्र परिचय अभ्यास शिबिर झाले.

### ० चंद्रशेखर आझाद दल (१२ मार्गदर्शक, १३० युवक)

चिपळूण जवळ पोफळी आणि आरवली अशा दोन गावांमध्ये सहा युवकांनी तीन दिवसांची नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे घेतली. या शिबिरांमध्ये ७वी ते १०वीची एकूण ६० मुले सहभागी झाली. जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात ३५ युवकांची एकदिवसीय दुर्गभ्रमण सहल झाली. गणेशोत्सवामध्ये एकूण १०० युवकांनी सहभाग घेतला. या पैकी ३५ युवक नवीन होते. स्मृतिवनाच्या प्रबोधिनीच्या जागेत वृक्षारोपण करणे, खेळासाठी मैदान तयार करणे अशी अनेक कामे झाली. याशिवाय, वारजे भागात जो गट उभा राहतो आहे, त्या भागातील युवकांनी त्या भागात किल्ले स्पर्धा घेतली. यामध्ये २१ संघांनी भाग घेतला व एकूण १०५ लोकांनी सहभाग घेतला.

## ■ शालेय दले

### ० वर्षारंभ

शालेय युवक विभागाचा वर्षारंभ कार्यक्रम दि. ६ जुलैला झाला. वर्षारंभ उपासनेनंतर वर्षभराच्या नियुक्त्या जाहीर केल्या. एकूण दहा प्रतोद, आठ साहाय्यक प्रतोद, २३ मार्गदर्शक व २७ दल प्रतिनिधी अशा ६८ आणि चार मध्यवर्ती जबाबदारीतले प्रमुख अशा ७२ जणांनी वार्षिक जबाबदारी घेतली. नियुक्त्यांच्या वेळी भाग प्रमुखांनी आपापल्या भागाचे कार्यसंकल्प किंवा कृती संकल्प वर्षारंभ उपासनेच्या निमित्ताने सगळ्यांसमोर मांडले.

### ० मार्गदर्शक दल

गेल्या वर्षभरात शालेय मार्गदर्शक दलावर प्रशिक्षणाच्या हेतूने अनेक प्रकारचे उपक्रम घेण्यात आले. खेळ, संचलन, बैठका, उपासना असे दलाचे स्वरूप होते. वैचारिक प्रशिक्षण, उपक्रम नियोजन, गटबांधणी, कौशल्य प्रशिक्षण अशी त्याची मुख्य उद्दिष्टे होती. वर्षाची सुरुवात भीमाशंकर ते कोथळीगड अशी ३५ मार्गदर्शकांच्या सहलीने झाली.

मार्गदर्शक दलाच्या बैठकीत वैविध्यपूर्ण विषयांचा समावेश होता. कार्यसंकल्प लेखन, विविध संघटनांच्या विस्ताराची models, प्रतिज्ञाग्रहण व त्याची गरज, दुर्गभ्रमण सहलींचे आशयात्मक नियोजन, mentoring, CAA/ NRC आंदोलने, रामजन्मभूमी-कोर्ट निकाल, log frame analysis असे विषय यामध्ये झाले.

### ० आंतरदलीय सामने

दि. २३ फेब्रु. २०२० रोजी पुणे, निगडी (गुरुकुलमधील विद्यार्थी) आणि हराळी केंद्रावरील कुमारांसाठीचे सामने घेण्यात आले. सर्व दलांवरील मिळून २३५ विद्यार्थी आणि २८ मार्गदर्शक उपस्थित होते. युवक विभागातील १७ माजी मार्गदर्शकांनी पंच म्हणून काम पाहिले. कुमार (८-९वी) वयोगटातील मुलांना अंगातील रग जिरविण्याची संधी मिळावी आणि एका खेळात पारंगत व्हावे, इतर दले आणि विभागांतील मुलांशी ओळख आणि संवाद व्हावा, दलावरील मुलांना प्रबोधिनीचा अधिक परिचय व्हावा अशी उद्दिष्टे सामन्यांच्या नियोजनावेळी समोर ठेवण्यात आली होती. सामन्यांची पूर्वतयारी म्हणून सर्व दले साधारण दोन महिने खेळाची तयारी करत होते. कबड्डी आणि हँडबॉल या दोन खेळांचे अतिशय चुरशीचे सामने झाले. सर्व विद्यार्थ्यांचे सामूहिक संचलन आणि पद्य झाले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी मा. मनोजराव देवळेकरांनी मुलांना काही आठवणी सांगत संबोधित केले.

## शालेय दलांची भागशः रचना

## प्रशालेय भाग

### ० भा. डॉ. आंबेडकर दल (४ मार्गदर्शक, १२० विद्यार्थी)

मुलांमध्ये सामाजिक परिस्थितीचं भान तयार होण्यासाठी आंबेडकर दलावरील इयत्ता ९वीतील ३२ मुलं आणि दोन मार्गदर्शक वेल्हे तालुक्यातल्या गुंजवणे गावात श्रमदानासाठी गेले होते. इयत्ता ८वी व ९वीच्या गटाने वाल्हे ते नीरा असा वारीचा टप्पा वारकऱ्यांसोबत अनुभवला. दि. २५-२८ डिसेंबर या कालावधीत तंबूतले साहस शिबिर झाले. रॅपलिंग, रिव्हर क्रॉसिंग, अग्निदिव्य, रात्रीची साहस कार्य, रायफल शूटिंग व सर्पमैत्री अशी स्वतःच्या मर्यादांना ओलांडायला लावणारी साहसी सत्रे झाली. नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात नेतृत्वगुणविकसन होण्यासाठी व स्पर्धात्मक वातावरण तयार होण्यासाठी पथकशः रचनेत दल झाले. आजूबाजूच्या परिस्थितीचे भान वाढण्यासाठी दलावर विविध विषयांवरच्या प्रासंगिकांची व चर्चा सत्रांची योजना केली होती.

### ० स्वा. सावरकर दल (७ मार्गदर्शक, १२० विद्यार्थी)

गणेशोत्सवामध्ये दलावरील सर्व विद्यार्थ्यांनी ४५०० घरांमध्ये संस्कृत व मराठी अथर्वशीर्ष पठण केले. पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांचे २४ ते २६ डिसें. रोजी हिवाळी क्रीडा शिबिर घेण्यात आले. सातवीचे सामाजिक अनुभव शिबिर दिनांक २९ व ३० डिसें. ला झाले. पाचवीच्या विद्यार्थ्यांची पावसाळी दुर्गभ्रमण सहल रायरेश्वर गडावर गेली. सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांची दुर्गभ्रमण सहल पथकशः राजगड आणि तोरण्याला गेली. दिवाळीच्या सुट्टीमध्ये पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी किल्ले स्पर्धा घेण्यात आली, त्यात ३० मुलांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

## सहकारनगर भाग

### ० फील्डमार्शल सॅम माणेकशॉ दल (७ मार्गदर्शक, ५० विद्यार्थी)

डिसेंबर महिन्यामध्ये छत्रपती शिवाजी दल आणि फील्ड मार्शल सॅम माणेकशॉ दल या दलाच्या विद्यार्थ्यांची निवासी दुर्गभ्रमण सहल हरिश्चंद्र गडावर झाली, ज्यामधे १८ मुले व ६ मार्गदर्शकांचा सहभाग होता.

### ० छत्रपती संभाजी दल (४ मार्गदर्शक, ५० विद्यार्थी)

छत्रपती संभाजी दलाने स्वतंत्रपणे ३० किशोर, ९ कुमार, १ पालक व २ मार्गदर्शकांसह राजगडला किशोर गटाची दुर्गभ्रमण सहल तर गोरखगड ते आहुपे अशी कुमारांची निवासी दुर्गभ्रमण सहल नेली. दलाला युवक संघटन सचिवांची भेट झाली, या वेळी २५ मुले उपस्थित होती. राजा केळकर संग्रहालयाला दलाने भेट दिली.

### ० छत्रपती शिवाजी दल (५ मार्गदर्शक, ५० विद्यार्थी)

शिवाजी आणि संभाजी दल यांच्यामध्ये दश हस्तांतरणाचा सामना झाला, या सामन्याला पंधरा किशोर आणि चार कुमार होते. याशिवाय परीक्षेच्या काळात सात मुलांची अभ्यासिका झाली.

## गोखलेनगर भाग

युवक दलाबरोबर या भागातील शालेय दलांचे मार्गदर्शक ११ व १२ मे रोजी दुष्काळ निवारणाच्या कामामध्ये वेल्ह्यात सहभागी झाले. या दलांना सोळा वर्षं पूर्ण झाल्याच्या औचित्याने ११ नोव्हेंबर रोजी सगळ्या दलांनी एकत्र येऊन जोर मारले व आपल्या भागातल्या दलांची सुरुवात यावर भागप्रमुख श्रीकांत पाटील याचे जोशपूर्ण प्रासंगिक झाले. १८ किशोर, १५ कुमार आणि १३ मार्गदर्शकांनी रोज दलावर येईन व प्रबोधिनीमध्ये योगदान देत राहीन असा संकल्प केला.

**○ आर्य चाणक्य दल (३ मार्गदर्शक, २५ विद्यार्थी)**

चाणक्य दलावर नियमित दलासह वर्षभर मुलांच्या वृत्तीघडणीसाठी काही विशेष सत्रं ठेवण्यात आली होती. उन्हाळी सायकल सहलींचा मुलांनी अनुभव घेतला. परीक्षेच्या काळात नियमित अभ्यासिका दलांवर झाल्या. १५ एप्रिल रोजी चाणक्य दल साहससहल २२ मुलांसह सरसगड, पाली येथे गेली होती. ३० जून – १ जुलै रोजी चाणक्य + अभ्यासिका दलातील ११ विद्यार्थी + ३ मार्गदर्शक वारीमध्ये सहभागी झाले.

**○ सरदार वल्लभभाई पटेल दल (४ मार्गदर्शक, ७० विद्यार्थी)**

पटेल दलावर महापुरुषांची चरित्रकथने, युद्धकथा, परिस्थिती ज्ञान यावर प्रासंगिके झाली. एकत्र चित्रपट बघणे, डोंगरावर दलाची स्पर्धा घेणे, संक्रांतीला पथकश: पतंग उडवणे असे काही उपक्रम झाले. चाणक्य आणि पटेल दलांवर जन्माष्टमी साजरी झाली. ८ डिसेंबर रोजी पटेल दलाची तिकोना या गडावर दुर्गभ्रमण सहल झाली.

**○ गोखलेनगर विज्ञान दल (२ मार्गदर्शक, १५ विद्यार्थी)**

साप्ताहिक विज्ञान दल नियमित दर रविवारी झाले. दलावर वेगवेगळे विज्ञान विषयाचे प्रयोग व गणेशोत्सवात दुसऱ्यांदा विज्ञान प्रदर्शन या दलाने गोखलेनगरमध्ये भरवले. मे महिन्यामध्ये दलाचे एकूण ५० जणांचे मोठे विज्ञान शिबिर झाले. मे महिन्यात अभ्यासिका दलाला एकूण दहा पालकांना आवाहन करून सुरुवात झाली. काही दिवस अभ्यासासाठी दल रात्रभर झाले. सामूहिक उपासना व आवश्यक चाचण्याही दलावर झाल्या. परीक्षेच्या नियोजनासाठी दलावर ओंकारदादा बाणाईत यांचे सत्र झाले. या सर्व प्रयत्नांमुळे मुलांच्या गुणांमध्ये किमान २०% चा फरक पडला आहे.

**○ अभ्यासिका दल (३ मार्गदर्शक, १५ विद्यार्थी)**

मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात एकूण दहा पालकांना आवाहन करून दलाची सुरुवात झाली. चाणक्य दलाचा १०वीचा गट हाच या दलाचा पट होता. काही काळ एका मंडळाच्या खोलीत दल झाले त्यानंतर एका मुलाच्या गच्चीवर दल घ्यायला लागलो. परीक्षेच्या काळात चल दलाची वारंवारता वाढवण्यात आली. काही दिवस ठरवून दल रात्रभर घेतले व त्यात एका विषयाचा अभ्यास झाला. दलावर अभ्यासाबरोबर चाचणी परीक्षा सुद्धा झाल्या. परीक्षेच्या नियोजनासाठी दलावर ओंकार दादा बाणाईत याचे ही सत्र झाले. या सर्व प्रयत्नांमुळे मुलांच्या गुणांमध्ये किमान २०% वाढ झाल्याचे दिसून आले.

## कोथरूड–कर्वेनगर भाग

**○ नांदेड सिटी विस्तार दल (४ मार्गदर्शक, ३० विद्यार्थी)**

उन्हाळ्यात नांदेड सिटी दलाच्या एकूण बारा किशोरांनी दोन दिवस सरबत विक्री करत १५००/– रुपयांची विक्री केली. भागातील कुमार साहस शिबिरामध्ये सहभागी झाले होते. रात्रीचे गटकार्य आणि व्यक्तिकार्य, रॅपलिंग अशा अनेक सत्रांमुळे मुलांच्या अनुभवात विशेष भर पडली. नांदेड सिटी दलाने हिवाळ्यात विद्यार्थ्यांसाठी शिबिर घेतले, त्यात १४० हून अधिक विद्यार्थी आणि भागातील नऊ मार्गदर्शक सहभागी झाले.

**○ क्रांतिवीर चाफेकर दल (६ मार्गदर्शक, ८५ विद्यार्थी)**

चाफेकर दलावर दासनवमी निमित्त दोन आठवडे सामूहिक सूर्यनमस्कार आणि रामदास चरित्रकथन उपक्रम झाला. उपक्रमाचा शेवट 'रामदास चरित्र प्रश्नमंजूषा' स्पर्धेने झाला. जून आणि जुलै महिन्यात पथकशः रचनेत कबड्डी व डॉजबॉल हे खेळ झाले. जुलै महिन्याच्या शेवटी या दोन खेळांचे अंतिम सामने झाले. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी दोन आठवडे दलावर अभ्यासिका घेतली. डिसेंबर महिन्यात कोथरूड भागाच्या तंबू शिबिरामध्ये चाफेकर दलाचे चौदा कुमार सहभागी होते. १९ फेब्रुवारीला शिवजयंती निमित्त भागप्रमुखांनी प्रासंगिक घेतले. त्यामध्ये २४ मुले सहभागी होती. ऑक्टोबर ते डिसेंबर असे चाफेकर आणि प्रताप दलाच्या १०वीच्या बारा मुलांचे नियमित साप्ताहिक अभ्यासिका दल झाले. त्यातून सहा दल प्रतिनिधी होऊ शकतील अशी मुले तयार झाली.

**○ शिवसागर सिटी विस्तार दल (२ मार्गदर्शक, २० विद्यार्थी)**

शिवसागर सिटी विस्तार दलाची सुरुवात सोसायटीचा बरची गट बसवण्याद्वारे गणेशोत्सवातून झाली. त्यानंतर डिसेंबर पासून नियमित साप्ताहिक दल झाले. ऑक्टोबर ते डिसेंबर असे चाफेकर आणि प्रताप दलाच्या १०वीच्या बारा मुलांचे नियमित साप्ताहिक अभ्यासिका दल झाले.

**○ लक्ष्मणराव किर्लोस्कर दल (४ मार्गदर्शक, ४० विद्यार्थी)**

किर्लोस्कर दल महानगरपालिकेच्या क्रीडा मैदानाचा पुरेपूर वापर करत वर्षभरात फुटबॉल, हँडबॉल, लंगडी, डॉजबॉल, लगोरी, चौरसधावा इ. मैदानी खेळ दलावर घेण्यात आले. नियमित व्यायाम आणि ठराविक कालावधीने पद्य, प्रासंगिक आणि संचलन हे दलावर झालं. डिसेंबर महिन्यामध्ये दोन पथकं पाडण्यात आली. दलामध्ये आठवडाभर पूर्वनियोजित खेळाचा सराव आणि सामने झाले. आणि प्रत्येक शुक्रवारी त्या खेळांचे पथकश: सामने घेण्यात आले. प्रत्येक रविवारी पथकश: सामन्यांचं गुणपत्रक जाहीर करण्यात येत होतं.

## विज्ञान विषय

**○ मेघनाद साहा दल (६ मार्गदर्शक, ४० विद्यार्थी)**

दलावर विविध प्रकारचे संग्रहात्मक व संशोधनात्मक प्रकल्प झाले. इलेक्ट्रॉन या विषयावर विज्ञान प्रदर्शन झाले, ज्यामधे अठरा विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

**○ कोथरूड विज्ञान दल (३ मार्गदर्शक, १५ विद्यार्थी)**

या वर्षी मे आणि जून महिन्यांमध्ये कोथरूड भागात दोन विज्ञान विस्तार शिबिरे झाली. या शिबिरांना एकूण ६० मुले उपस्थित होती. या मुलांसोबत १ जून पासून कोथरूड भागामध्ये विज्ञान दल सुरू झाले. या दलावर येणाऱ्या वीस मुलांनी गणेशोत्सवात दोन दिवस कोथरूड भागातल्या दोन सोसायट्यांमध्ये 'Electromagnetism' या विषयावर विज्ञान प्रदर्शन भरवले. ते प्रदर्शन सुमारे १००० लोकांनी बघितले.

✦✦✦

**युवक संघटन सचिव**

- शालेय दले प्रमुख -

- विज्ञान विषय प्रमुख
  - कोथरूड विज्ञान दल (३ मार्ग. १५ विद्यार्थी)
    - डॉ. मेघनाद साहा दल (६ मार्ग., ४० विद्यार्थी)
      - गोखलेनगर विज्ञान दल (३ मार्गदर्शक, १५ विद्यार्थी)
- कोथरूड भाग प्रमुख
  - क्रांतिवीर चाफेकर दल ( ६ मार्ग. ८५ विद्यार्थी)
    - लक्ष्मणराव किर्लोस्कर दल (४ मार्ग. , ४० विद्यार्थी)
      - नांदेड सिटी विस्तार दल (४ मार्ग., ३० विद्यार्थी)
      - शिवसागर सिटी विस्तार दल (२ मार्गदर्शक २० विद्यार्थी)
- सहकारनगर भाग प्रमुख
  - फील्डमार्शल सॅम माणकेशॉ (७ मार्ग.५० विद्यार्थी)
    - छत्रपती संभाजी दल (४ मार्ग., ५० विद्यार्थी)
      - छत्रपती शिवाजी दल (३ मार्ग. , १५ विद्यार्थी)
- गोखलेनगर भाग प्रमुख
  - आर्य चाणक्य दल (३ मार्ग. २५ विद्यार्थी)
    - सरदार वल्लभभाई पटेल दल (४ मार्ग., ७० विद्यार्थी)
      - अभ्यासिका दल (३ मार्ग., १५ विद्यार्थी)
- प्रशालेय भाग प्रमुख
  - स्वातंत्र्यवीर सावरकर दल (७ मार्ग. १२० विद्यार्थी)
    - डॉ. आंबेडकर दल (४ मार्ग., १२० विद्यार्थी)
- अन्य दले
  - राजर्षी शाहू दल (१ मार्ग. १५ विद्यार्थी)

- महाविद्यालयीन दले प्रमुख -

- चंद्रशेखर आझाद दल (१२ मार्गदर्शक १३० युवक)
- लोकमान्य टिळक दल (९ मार्गदर्शक, ५० युवक)
- डॉ. विक्रम साराभाई दल (१० मार्गदर्शक, ८० युवक)
- नेताजी सुभाषचंद्र दल (१२ मार्गदर्शक, १३० युवक)
- शहीद भगतसिंह दल

## सर्वसाधारण प्रबोधिनीपण व कृतिप्रेरणा

संस्थापक संचालक कै. आप्पांनी 'एक्सलन्स ॲवार्ड' स्वीकारताना चैतन्यपूर्ण (डायनॅमिक) व्यक्तिमत्त्वासाठी आवश्यक अशा काही वृत्तींच्या आधारे सर्वसाधारण प्रबोधिनीपणाची मांडणी केली आहे. विविध विभागांचे सदस्य, व विद्यार्थी -विद्यार्थिनी, युवक-युवती यांनीही या वृत्ती मिळवल्या पाहिजेत. मग जे स्वतःला उत्तरदायी कार्यकर्ता मानतात आणि लोकही त्यांच्याकडे तशा प्रकारे पाहातात त्यांनी तर या वृत्तींची जोपासना अवश्य केली पाहिजे. त्या वृत्ती आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या कृतिप्रेरणा यांची सांगड विद्यमान संचालकांनी घालून पुढीलप्रमाणे मांडणी केली आहे.

१. माझ्या आयुष्यात काही लक्षणीय केल्याशिवाय माझे समाधान होणार नाही म्हणून -
   - विनाश्रमाचे घेणार नाही.
   - आजचे काम उद्यावर नाही.
   - आपले काम दुसऱ्यावर नाही.
   - कालच्यापेक्षा आज पुढे गेलेच पाहिजे.

२. माझ्या प्रत्येक कामात उत्तमता आल्याशिवाय माझ्या जीवनाचे सार्थक होणार नाही म्हणून -
   - गुणवत्तेत तडजोड नाही.

३. मला नवीन कल्पना सुचल्याशिवाय माझ्या जीवनात आनंद येणार नाही म्हणून -
   - रोज नवीन सुचलेच पाहिजे.

४. परिस्थितीच्या गरजेनुसार स्वतःमध्ये आवश्यक बदल घडवून आणण्याचा मनाचा लवचिकपणा मी आयुष्याची जास्तीत-जास्त वर्षे टिकवीन म्हणून —
   - रोज उपासना झालीच पाहिजे.
   - प्रत्येक कामात इतरांच्या हिताचा विचार झालाच पाहिजे.

(खंड ४ भाग ४ - पान नं. ५९)

# १६ युवती विभाग

■ प्रशालेय दले
■ प्रबोधशालेय दले
■ महाविद्यालयीन दले
■ युवती संघटन बैठक

### ० उद्दिष्ट

विविध वयोगटातल्या किशोरी-युवतींमधील गटात काम करण्याचे व नेतृत्व करण्याचे गुण वाढवणे, सामाजिक जाणीव वाढवणे व आपल्यातील गुणांचा वापर करून संघटित होऊन देशप्रश्नांवर काम करण्याची प्रेरणा वाढवणे, यासाठी त्या-त्या वयोगटाच्या दलांच्या माध्यमातून अनेक उपक्रम योजले जातात.

### ० पंजाब अभ्यासदौरा

दि. २३ जुलै ते ३ ऑगस्ट २०१९ या कालावधीत सात युवतींचा पंजाब अभ्यासदौरा झाला. देशाच्या सीमा पाहण्यासाठी, सीमावर्ती राज्याची परिस्थिती, प्रश्न आणि संस्कृती समजून घेण्यासाठी त्या पंजाबला गेल्या होत्या. चंदीगड, फिरोजपुर, आनंदपुर साहिब आणि अमृतसर इथे गटाने पुढील व्यक्तींच्या भेटी घेतल्या व विविध विषयांवर चर्चा केली -

१. श्रीमती नीलांबरी जगदाळे (वरिष्ठ पोलीस अधीक्षक, चंदीगड) : पंजाबमधील अंमली पदार्थांचा प्रश्न, महिलांचे प्रश्न व प्रशासकीय सेवेतील विविध अनुभव
२. श्री. अजित जोशी (कृषी महासंचालक, हरियाणा) : वृत्तपत्रे-चित्रपटांमधून केले जाणारे हरियाणा व पंजाबचे वर्णन व सध्याची प्रत्यक्षातली सामाजिक परिस्थिती, हरियाणामधील औद्योगिक विकास
३. श्री. इक्बालसिंग लालपुरा (निवृत्त पोलीस महासंचालक, पंजाब) : पंजाबचा इतिहास, शीख तत्त्वज्ञान, ऑपरेशन ब्लू स्टार दरम्यानचा पंजाब, खलिस्तान चळवळ
४. कर्नल यश पटेल (कमांडिंग ऑफिसर, १५ ग्रेनेडिअर) : लष्कर, सीमा सुरक्षा दल आणि पोलीस दल यांच्या कामाचे स्वरूप व सीमावर्ती भागांमधील कामाच्या समन्वयाच्या पद्धती, सीमावर्ती गावांमधील सामाजिक प्रश्न व नार्को दहशतवाद.
५. तेनसिंग दीदी (विवेकानंद केंद्र, चंदीगड) : भारतभर झालेल्या प्रवासातील काही महत्त्वाचे अनुभव.

संस्था/स्थान भेटी - पोलीस मुख्यालय नियंत्रण कक्ष, इन्फोसिस फाउंडेशन रेड क्रॉस सराई व अन्नपूर्णा भोजनालय (चंदिगड), आनंदपुर साहिब तख्त, विरासत-ए-खालसा संग्रहालय, खालसा शाळा (आनंदपुर साहिब), सारागढी स्मारक गुरुद्वारा, फिरोजपुर लष्करी छावणीमधील युद्ध संग्रहालये, हुसैनीवाला सीमारेषा व राष्ट्रीय शहीद स्मारक (फिरोजपुर), जालियनवाला बाग, फाळणी संग्रहालय, सुवर्ण मंदिर, अटारी सीमारेषा (अमृतसर). याशिवाय काही स्थानिक प्रसिद्ध ठिकाणांना भेटी दिल्या.

### ० नियमित बैठक / प्रशिक्षणे

वर्षभर गटप्रमुख व मार्गदर्शिका म्हणून काम करणाऱ्या युवतींची कामाची प्रेरणा वाढती राहावी, यासाठी काही प्रशिक्षणे व बैठकींची योजना केली जाते. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताना दले घेणाऱ्या युवतींसाठी आयोजित प्रशिक्षण बैठकीत पद्य, आज्ञांचा सराव, नोंदी, नियोजन अशा विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले. त्याशिवाय नेतृत्वगुण व उपक्रम याची संगती, भविष्याभिमुखता याबद्दल सत्रे झाली.

## ■ प्रशालेय दले (२४० मुली)

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील मुलींसाठी चालणाऱ्या कमलाबाई सोहोनी (इ. ५वी-७वी) आणि कल्पना चावला (इ. ८वी-१०वी) दलांवर मुलींचे व्यक्तिमत्त्व विकसन, समूहगुणविकसन आणि नेतृत्वगुणविकसन व्हावे यासाठी नियमित क्रीडादल, साप्ताहिक पथकश: दल, वर्गबैठकी आणि प्रासंगिक कार्यक्रम अशा रचनेत उपक्रम घेण्यात आले. त्यात विविध स्पर्धा, योगदिनानिमित्त योगासने, सामाजिक उत्सवातील सहभाग म्हणून वारीत सहभाग, शारदोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम तसेच चौफेर विचार व्हावा, म्हणून गटचर्चा अशांचा समावेश होता.

➤ **पथकश: उपक्रम** - दलांवर अभंग स्पर्धा, क्रीडा स्पर्धा अशा उपक्रमांबरोबर गणेशोत्सवात पथकश: बर्ची प्रात्यक्षिके झाली. कमलाबाई सोहोनी दलातील प्रत्येक पथकाने लागोपाठ तीन अशी एका दिवशी पुण्याच्या विविध भागांत बारा ठिकाणी सादरीकरणे केली. दोन्ही दलांचा पथकश: तिळगुळ विक्री उपक्रम झाला. या उपक्रमांची पथक म्हणून गटभावना वाढायला मदत झाली.

➤ **हिवाळी शिबिरे** - १) दि. २६ ते ३० डिसेंबर दरम्यान इ. ५वी ते ९वी मुलींचे क्रीडाशिबिर झाले. शारीरिक क्षमता ताणता याव्यात यासाठी आयोजित क्रीडासत्रांबरोबरच काही गटकार्ये व वैचारिक सत्रे झाली. दि. २६ तारखेला योग्य माहिती समजून घेऊन सूर्यग्रहण बघितले. पथकश: क्रीडा स्पर्धा झाल्या. व्यावहारिक कौशल्ये शिकता यावीत अशी योजना केली होती. बँक, पोलीस ठाणे अशा ठिकाणी जाऊन काम समजून घेण्यापासून शिवणकाम, स्वच्छता अशा अनेक गोष्टी शिबिरात केल्या. २) दि. २९ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान १०वी मुलींचे अभ्यास शिबिर झाले. यामध्ये विविध अभ्यास कौशल्यांचा वापर करून मुलींनी स्वयंअध्ययन केले.

■ **प्रबोधशालेय दले** (दोन्ही ठिकाणी सुमारे १२-१५ मुली)

ज्ञान प्रबोधिनी भवन आणि स्नेह पॅराडाईज सोसायटी, पौड रस्ता या दोन ठिकाणी साप्ताहिक दले झाली. या दलांमध्ये प्रबोधिनीच्या प्रशाले व्यतिरिक्त शाळांमधील साधारण इ. चौथी ते आठवी मधील (मुख्यतः स्थानिक) मुलींचा सहभाग होता. या दलांवर शारीरिक विकसनासाठी आवश्यक खेळ आणि व्यायामाबरोबरच कृतिसत्र आणि गटकार्य यावर भर दिला गेला. कलाकृती बनवणे, कात्रण संग्रह, मुलाखत घेणे, विविध स्पर्धा अशी व्यक्तिमत्त्व विकसन व गटबांधणीचे उद्दिष्ट ठेवून कला व विज्ञान यासंबंधी गटकार्ये घेतली.

■ **महाविद्यालयीन दले**

- **अहिल्याबाई होळकर दल –** (सुमारे १०-१२ युवती नियमित, १२० युवती प्रासंगिक) – वर्षभर नियमित साप्ताहिक दल जमले. यामध्ये युवतींनी एकत्र येऊन क्रीडा, कला अशा विविध माध्यमांद्वारे गटात काम करण्याचे व अन्य कौशल्ये वाढावीत, प्रबोधिनीचा परिचय वाढावा, सामाजिक जाणीव विकसन वाढावे, आपल्या राष्ट्राचा अधिक परिचय व्हावा यासाठी विविध कार्यक्रम दलावर योजण्यात आले. उदा. आंबील ओढ्याला आलेल्या पुरानंतर दांडेकर पूल जवळील वस्तीत नागरीवस्ती विकास विभागाच्या मार्गदर्शनाखाली सर्वेक्षण पाहणी केली. त्याशिवाय महाविद्यालयीन युवतींनी विभागाच्या अन्य उपक्रमांतही सहभाग घेतला.
- **पर्यावरण अभ्यास दल (सुमारे १०-१२ युवती) –** पर्यावरण व त्या अनुषंगाने संबंधित अन्य विषयांचा अभ्यास आणि त्यासंदर्भात जाणीवजागृती व कृती-उपक्रम यासाठी साप्ताहिक पर्यावरण दलाची सुरुवात झाली. पर्यावरणासाठी काम करणाऱ्या संस्था आणि त्यांचा अभ्यास सुरुवातीला या दलाने केला. दलाचा पहिला उपक्रम म्हणून दि. १६ ऑक्टोबर रोजी टेकडीवर वृक्षारोपण कार्यक्रम झाला. दलावरील युवतींच्या नियमित अभ्यासासाठी 'कचरा व्यवस्थापन' हा विषय प्रामुख्याने ठरवण्यात आला. तसेच पर्यावरण विषयक जागृतीसाठी दि. १२ फेब्रुवारी रोजी प्रशालेय गटावर महाविद्यालयीन पर्यावरण दलाच्या युवतींनी वर्गश: सत्रे घेतली. त्यात चित्रफिती बघून पर्यावरणाबद्दल चर्चा झाली

**o प्रशालेय आणि महाविद्यालयीन दलाचे एकत्र उपक्रम**

- **गणेशोत्सव –** बर्चीनृत्य, लेझीमनृत्य आणि टाळीनृत्य व त्यांच्या साथीला वादन या माध्यमातून गणेशोत्सवात युवतींच्या गटांनी सहभाग घेतला. २०० शालेय आणि १२० महाविद्यालयीन युवतींनी मिळून पाच मिरवणुका आणि पाच प्रात्यक्षिके केली. त्याशिवाय शिस्तबद्ध बर्चीनृत्याच्या प्रचारासाठी दि. ७ सप्टेंबर रोजी पुण्याच्या विविध भागांत बारा प्रात्यक्षिके केली.
- **तिळगुळ विक्री –** प्रशालेतील मुलींचे विक्रीकौशल्य आणि संभाषण कौशल्य वाढावे यासाठी पथकश: तिळगुळ विक्री उपक्रम झाला. या उपक्रमात संयोजक असलेल्या युवतींची नियोजन-कार्यवाही कौशल्ये, समस्यापरिहार, समूहगुण आणि उद्योजकता याचे प्रशिक्षण झाले. घरोघरी जाऊन व स्टॉल या दोन प्रकारे साधारण २१० मुलींनी ११०० किलो तिळगुळ विक्री केली. आयोजनात वीस युवतींनी सहभाग घेतला. यावर्षी विक्री हिशोबाची संगणकीय यंत्रणा तयार केली.
- **अन्य –** शारदोत्सवात अभ्यासयज्ञ, भोंडला आणि दिवाळीत अकरावीच्या युवतींच्या पुढाकारातून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

✦✦✦

## ■ युवती संघटन बैठक

**सर्व केंद्रांवर युवती संघटनाच्या दिशेने काम करणाऱ्या विभागांमधील प्रमुख मार्गदर्शिकांची एकमेकींसोबत औपचारिक व अनौपचारिक पद्धतीने प्रबोधिनी संबंधी आणि युवती संघटनाच्या संबंधी वैचारिक देवाण-घेवाण व्हावी, यासाठी वर्ष २०१९-२० पासून युवती संघटन बैठक गटाच्या नियमित द्वैमासिक बैठकी सुरू झाल्या आहेत. यावर्षी गटाच्या सहा बैठकी झाल्या आणि पुणे (युवती विभाग, नागरीवस्ती अभ्यासगट), निगडी, हराळी, स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण इथल्या बारा प्रतिनिधी या नियमित बैठकीत सहभागी झाल्या. वर्षभर विविध विषयांवर या गटाने अभ्यास व चर्चा केल्या. त्यामध्ये युवती संघटन संकल्पना म्हणजे काय, हेतूसाठी आवश्यक उपक्रम कोणते आणि उपक्रम चालू नसताना युवती संघटनाचं स्थिर काम म्हणजे काय, विविध वैचारिक साहित्याचा नियमित कामात उपयोग, युवतींचा प्रबोधिनीच्या विविध कामांमध्ये सहभाग, महत्त्वाच्या विषयांवरील निवेदने, स्त्री शक्ती प्रबोधन-युवती संघटन संगती, अशा विषयांचा विचार झाला.**

**दि. ८, ९ आणि १० ऑगस्ट २०१९ रोजी 'युवती संघटन प्रशिक्षण वर्ग' हराळी येथे झाला. ज्ञान प्रबोधिनीच्या वेगवेगळ्या केंद्र/विभागात काम करणाऱ्या युवतींचा प्रबोधिनीचा गट म्हणून एकत्र येऊन काही विचार व्हावा, काम करण्याची प्रेरणा वाढावी, वेगवेगळ्या ठिकाणच्या उपक्रमांमध्ये शक्य त्या ठिकाणी पद्धतींमध्ये सुसूत्रता यावी, या हेतूने हा वर्ग आयोजित केला होता. पुणे केंद्रातील युवती विभाग व नागरीवस्ती अभ्यास गटाच्या मिळून सात, निगडी युवती विभागातील चार, स्त्रीशक्ती प्रबोधन ग्रामीण गटातील आठ, सोलापूर येथील दोन आणि हराळी येथील पाच अशा एकूण २६ युवती यात सहभागी झाल्या होत्या. प्रबोधिनीचा इतिहास, युवती संघटन व नेतृत्वगुण विकसन यांतील संबंध, नियमित दलांमधून कार्यकर्ते घडण, चरित्रकथने, युवती संघटन संकल्पना, अनौपचारिक संपर्कातून कामाचा विस्तार इत्यादी विविध विषयांवर गटचर्चा, कृतिसत्रे झाली. अनौपचारिक पद्य गायन, वाचन इत्यादी सत्रेही झाली.**

# १७ उद्योजकता विकास केंद्र

उद्योजकता विकास केंद्राची सन २०१९-२० या वर्षातील वाटचाल नवीन दालने शोधत-शोधत झाली. उद्योजकता अभिक्षमता चाचणी (बीम) नव्या उत्सुक युवक-युवतींना देण्याचे प्रयत्न मॉडर्न कॉलेज व अन्य ठिकाणी झाले. एकूण नऊ व्यक्तींनी ही चाचणी दिली. त्यातील चारजण अगोदरच उद्योग करीत होते, त्यांना अधिक सुधारणा करण्यासाठी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू लक्षात आले. तीन नोकरदारांना उद्योगाकडे वळायचे होते. एका महिलेला करिअर मधील बऱ्याच वर्षांच्या खंडानंतर उद्योग सुरू करण्याची इच्छा होती. सर्व संबंधितांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले.

श्री. कैलास कोटवाणी हे नागपूर येथे संपर्क नावाचा नव-उद्योजकांचा एक गट चालवितात. त्यांनी जानेवारी २०२० मध्ये केंद्रास भेट देऊन एकत्रित काम करण्याची इच्छा व्यक्त केली. केंद्राचे काम काय अंगाने वाढवावे, याबाबत पुण्यातील विषयतज्ज्ञांची एक बैठक दि. १० मे २०१९ रोजी घेण्यात आली. या बैठकीला श्री. सुनील भावे, श्री. जगदीश भट, श्री. अतुल मराठे, श्री. राजीव हजरनवीस, श्री. मोनीष देशमुख व श्री. सागर कानडे उपस्थित होते. महाविद्यालयांमध्ये उद्योजकतेसाठी मार्गदर्शन करण्यापासून ते नव्या उद्योजकांना हँड होल्डिंग करण्याची त्यांनी तयारी दर्शविली.

नागपूर येथे कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या वतीने झालेल्या परिसंवादात प्रज्ञा मानस संशोधिकेच्या श्रीमती नीलिमा आपटे व चारुता केळकर यांनी सहभाग घेतला. पुण्यात झालेल्या स्टार्स फोरम च्या वार्षिक अधिवेशनात श्री. सुभाष देशपांडे व श्री. विवेक गिरिधारी उपस्थित होते. तेथे दिल्ली येथील NIESBUD च्या निवृत्त प्राध्यापिका श्रीमती रिटा सेनगुप्ता व अहमदाबाद च्या EDII चे भूतपूर्व संचालक डॉ. दिनेश अवस्थी यांनी सहकार्याची तयारी दर्शविली.

केंद्राच्या फेसबुक पेजवर कै. श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या चरित्राचा परिचय श्री. सुभाषराव देशपांडे यांनी, तर इन्फोसिस च्या श्री. नारायण मूर्ती यांच्या वाटचालीचे पैलू श्री. अनिलराव रिसबूड यांनी उलगडून दाखविले. या चरित्रातील निवडक मजकूर नव उद्योजकांसाठी दिला गेला. त्याला सुमारे पन्नास हजार दर्शकांनी प्रतिसाद दिला.

पुण्यातील कॉलेज ऑफ इंजीनीअरिंग मध्ये उद्योजकतेवर काम करणाऱ्या BHAU Institute येथे या संस्थेचे संस्थापक व देणगीदार अमेरिकेतील श्री. नरेंद्र काळे यांनी मा. संचालक डॉ. गिरीश बापट यांची भेट योजली होती.

महाराष्ट्र सेंटर फॉर आंत्रप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंट (MCED) यांच्या 'उद्योजक' या मासिकामध्ये फेब्रुवारी २०२० च्या अंकात आपल्या केंद्रावर एक लेख प्रकाशित झाला. बीम चाचणी विषयी अर्ध्या पानाची जाहिरात दिली होती. माजी विद्यार्थी मंडळाच्या Livelyhood Employment या विषयावरच्या विशेष उद्दिष्ट गटामध्ये (SPG) 'उद्योजकता' या विषयावर काम होणार आहे. या गटातर्फे उद्योजकता विकास केंद्राचे काम आगामी वर्षामध्ये अधिक वेगाने वाढेल, असा विश्वास वाटतो.


■ **आद्य संचालकांची पुस्तके/प्रकाशने (कै. वाच. वि. वि. तथा आप्पा पेंडसे)**

१) विवेकानंदांचा राष्ट्रधर्म
२) उपासनेद्वारा व्याधिमुक्ती
३) श्री माताजी-श्री अरविंद काय म्हणाले?
४) राष्ट्रदेवो भव
५) हरिसिंह नलुआ
६) प्रेरक कथा

■ **विद्यमान संचालकांची पुस्तके व प्रकाशने (वाच. गिरीश श्री. बापट)**

१) जनी जनार्दन ऐसा भाव
२) रामदास काय म्हणाले ?
३) विद्यार्थ्यांच्या अंतरंगाची जडणघडण
४) महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म
५) राष्ट्रधर्माचे आचरण
६) विशेष प्रबोधिनीपण
७) सारे विचारप्रवाह आपलेच
८) Emerging Novelty in Life, Mind and Society
९) From Formal Education to Man-Making
१०) स्वत:ला घडवण्यासाठी उपासना
११) राष्ट्रघडणीसाठी मनुष्यघडण
१२) महर्षी दयानंद काय म्हणाले ?
१३) मनुष्यघडणीसाठी आवाहन भाग १ व भाग २
१५) Emotional and Motivational Development of Intellectually Gifted Students
१६) Man-making : Nurturing Abilities, Motivating The Able
१७) प्रकट चिंतन - पुस्तिका १ व २
१९) राष्ट्रीयत्वाचे पैलू (प्रकट चिंतन पुस्तिका ३)
२०) समाजाभिमुख उपासना (प्रकट चिंतन पुस्तिका ४)
२१) सर्वसाधारण प्रबोधिनीपण (प्रकट चिंतन पुस्तिका ५)
२२) ज्ञान प्रबोधिनी : संस्थेच्या घटनेतील उद्देश (प्रकट चिंतन पुस्तिका ६)
२३) प्रबोधनाची प्रेरणा (प्रकट चिंतन पुस्तिका ७)
२४) प्रबोधिनीची वैशिष्ट्ये (प्रकट चिंतन पुस्तिका ८)

# ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ■ **मराठी माध्यम** | ■ **इंग्रजी माध्यम** | ■ **गुरुकुल** | ■ **संवेद** | ■ **युवक विभाग** |
| पूर्वप्राथमिक, | पूर्वप्राथमिक, | ■ **क्रीडाकुल** | ■ **मुक्ती सोपान** | ■ **युवती विभाग** |
| प्राथमिक, | प्राथमिक, | | ■ **अटल धडपडालय** | ■ **पालक संघ** |
| माध्यमिक | माध्यमिक | | ■ **संगणक विभाग** | ■ **जैवतंत्रज्ञान** |

दुसऱ्या सत्रापासून विविध उपक्रमांसाठी , प्राथमिक विभागासाठी आणि मुक्तीसोपान संगीत विभागासाठी नवीन स्वतंत्र इमारत उभी राहिली. रोज खेळाचा तास सुरू केल्यामुळे मुलांच्या दैनंदिन शारीरिक शिक्षणाची सुरुवात झाली. पालकांच्या सहमतीने आपण शाळेची वेळ वाढविली. अशा प्रकारे बदलत्या काळाची गरज ओळखून त्यासाठी पाऊले टाकत आहोत.

### o दुर्ग जागर

ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाचा एक अभिनव उपक्रम. संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान असलेल्या शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या हिंदवी स्वराज्याचा इतिहास आपण लहानपणापासून ऐकतो. स्वराज्य स्थापनेपासून ते स्वराज्य वैभवाप्रत नेणारे महाराजांचे नरवीर या सर्वांचा अभ्यास प्रत्यक्ष त्या-त्या ठिकाणी जाऊन मुलांना करता यावा, त्यांच्या क्षमतांचा कस लागावा, त्यांना गटात काम करण्याची संधी मिळावी, अनेक तज्ज्ञ व्यक्तींचा सहवास मिळावा या बरोबरच मुले निसर्गाच्या जवळ जावीत, त्यांनी साहस अनुभवावे अशा उद्देशाने नवनगर विद्यालयातील इतिहास अध्यापक शिवराज पिंपुडे यांनी एक मोहीम आखली. मोहिमेचे नाव होतं दुर्गजागर आणि संकल्प होता दहा महिन्यात पुणे जिल्ह्यातील २९ किल्ले सर करण्याचा.

मोहीम सुरू असताना मुलांची 'किल्ल्याचे विविध घटक कोणते, जैवविविधता, पुणे जिल्ह्यातील किल्ले, ट्रेकिंगच्या साहित्याचा परिचय, प्रवास वर्णन कसे करावे, महाराजांवरील प्रेरणादायी पद्य पाठांतर, गटात काम कसे करावे, गटप्रमुख म्हणून काम कसे करावे, उत्तम फोटो काढण्याची तंत्रे' अशा विविध विषयांवर प्रशिक्षणे घेण्यात आली.

मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात सोप्या श्रेणीतील किल्ले निवडण्यात आले. एप्रिल २०१९ मध्ये मोहिमेस सुरुवात झाली व जानेवारी २०२० मध्ये मोहिमेची सांगता झाली. इ. ७वी ते ९वी मधील एकूण ४० विद्यार्थ्यांपैकी चौदा मुली तर सव्वीस मुले होती. २९ ट्रेकमध्ये मिळून एकूण ८१ पालक सहभागी झाले. याशिवाय सहा पालकांनी मोहिमेसाठी भरपूर कष्ट घेतले. ही संपूर्ण मोहीम विद्यालयाचे दोन इतिहास प्रेमी, दुर्गप्रेमी पालक श्री. निलेश गावडे व श्री. रघुराज एरंडे यांच्या अनुभवांवर बेतली होती.

मोहिमेच्या सांगता समारंभासाठी दुर्ग अभ्यासक श्री प्र. के. घाणेकर व एव्हरेस्टवीर श्री. श्रीहरी तापकीर आवर्जून उपस्थित होते. दोघांनीही मुलांचे व पालकांचे कौतुक केले व अशा प्रकारच्या मोहिमा शाळातून झाल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले. यावेळी मावळी पगडी, शरभ प्रतिकृती व मेडल देऊन मुलांचे कौतुक करण्यात आले.

### o प्राणबोधिनी स्थापना

अटल टिंकरिंग मॅरेथॉन २०१६ मध्ये गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवर 'आरोग्य' विभागात विजेतेपद मिळवले. 'आयु स्प्रे' हा आयुर्वेदिक स्प्रे असून तो हवेतील जंतू नष्ट करतो. दोन वर्षं विद्यार्थी व शिक्षकांनी यावर संशोधन केले. आता त्यांनी 'आयु स्प्रे' या त्यांच्या उत्पादकाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करायचे ठरवले आहे. शाळेने या कामासाठी जागा उपलब्ध करून देऊन या प्रकल्पाला प्रोत्साहन दिले आहे. विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शाळेतील शिक्षक अशा एकत्र भागीदारीतून 'प्राणबोधिनी' या कंपनीची स्थापना जानेवारी २०२० मध्ये करण्यात आली.

या प्रयोगशाळेमध्ये विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली काम करतात. आयु स्प्रे व त्याचे वेगवेगळे फॉर्म्स जसे आयुकॅन्डल अशा वेगवेगळ्या उत्पादनांचे उत्पादन करण्याचा, तसेच विद्यार्थ्यांना IPR प्रणाली, पेटंट प्रक्रिया कळावी, त्यांना उद्योजक होण्यासाठी प्रेरणा मिळावी हा 'प्राणबोधिनी' चा उद्देश आहे.

आयु स्प्रे व आयुकॅन्डल याची ३००० पर्यंत विक्री मुलांनी शाळेच्या स्वरगंधर्व महोत्सवादरम्यान केली.

### o अभिरुची वर्ष

विद्यार्थ्यांसाठी विषयानुसार वर्षभरात दोन उपक्रम योजावे असे ठरले होते, त्याप्रमाणे इ. ७वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक सत्रात एक याप्रमाणे दोन कार्यशाळा योजल्या गेल्या. प्रत्येक विषयाचे महत्त्व व त्यातील संधी विद्यार्थांना समजाव्यात या दृष्टीने दोन व चार तासांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. दोन्ही कार्यशाळांना साधारणपणे ६५० ते ७०० विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन उत्तम प्रतिसाद दिला. यासाठी अध्यापक व मार्गदर्शकांची तयारी योग्य दिशेने होण्यासाठी मार्गदर्शक व्याख्याने, त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती अशा प्रकारे वर्षभरात अभिरुची वर्षानिमित्त वेगवेगळ्या दिशांनी काम झाले. विद्यार्थ्यांच्या अंगी असणारी कौशल्ये ओळखून त्यावर काम करणे हे या वर्षात झाले. परंतु या विषयाची खोली खूप जास्त आहे. तसेच या विषयी मुळातूनच काम होणे आवश्यक आहे. आणि म्हणूनच अभिरुची वर्ष हे केवळ या वर्षापुरते मर्यादित न ठेवता पुढील वर्षीही त्यामध्ये अधिक सखोलपणे काम करण्याचा विद्यालयाचा मानस आहे.

### ० स्वरगंधर्व

अभिरुची वर्षाच्या निमित्ताने कलेचा आस्वाद घेण्याचे प्रशिक्षण ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी केंद्रामध्ये अभिनव पद्धतीने देण्यात आले. यापैकी संगीत, नृत्य, वक्तृत्व या विषयाचे एक पिंपरी-चिंचवड साठीचे अत्यंत दर्जेदार असे व्यासपीठ उदयाला यावे, या उद्देशाने मातृमंदिर संस्था आणि त्यांना सहयोग देणारी समर्थ प्रॉडक्शन या दोन संस्थांनी मिळून दि. ८ आणि ९ फेब्रु. २०२०ला नवनगर विद्यालयाच्या मैदानावर स्वरगंधर्व संगीत महोत्सवाचे आयोजन केले. ह्या संगीत महोत्सवात श्री. अर्शद अली खान, सौ. सोनिया परचुरे, विदुषी अश्विनी भिडे देशपांडे, श्री. शकीर खान, पंडित राकेश चौरसिया आणि पंडित उल्हास कशाळकर आदि दिग्गजांचा समावेश होता. विश्व विक्रमी नृत्यांगना कुमारी संयोगिता पाटील आणि सौ. मीनल कुलकर्णी यांचे देखणे समूहनृत्य सादरीकरण, काही बाल कलाकारांचेही अत्यंत दर्जेदार सादरीकरण या महोत्सवात झाले.

परंतु त्याहूनही विशेषत्वाने नोंदवावे असे म्हणजे आपल्याच संस्थेमध्ये शिकून पुढे गेलेले श्री. उमेशदादा पुरोहित, श्री. रामदास पळसुले आणि कुमारी अनुजा बोरुडे यांच्यासारख्या कलाकारांचा त्याच्यामध्ये असलेला सहभाग. अनुजाच्या पखवाज वादनाने सर्व उपस्थित मंत्रमुग्ध झाले होते. ह्यात भर म्हणून सकाळच्या सत्रामध्ये श्री. सु. ग. शेवडे यांचे हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आणि श्री. शरद पोंक्षे यांचे स्वा. सावरकर ह्या विषयांवर व्याख्यान योजण्यात आले. शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन हे ही महोत्सवाचे एक वैशिष्ट्य होते.

या सर्व कार्यक्रमांना जवळजवळ चार हजार श्रोत्यांची उपस्थिती होती. मंडपात एकाच वेळी सर्वाधिक २३०० श्रोते उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रसिद्ध उद्योजक श्री राजकुमार संकला हे स्वागताध्यक्ष होते, डॉ. पी. डी. पाटील सर हे उद्घाटक म्हणून लाभले होते. माननीय डॉ. विश्वास मेहेंदळे आणि श्री. सुरेश साखळकर सर हे मार्गदर्शक समितीचे आधार स्तंभ होते. मा. श्री. देवळेकर सर यांचा पाठिंबा, मार्गदर्शन व्यवस्थापूर्ती मध्ये त्यांनी दिलेले विशेष लक्ष आणि मा. भाऊ यांच्या आशीर्वादाने हे सहज जमून गेले. ह्या कार्यक्रमाची कार्यकारी मंडळी म्हणजे श्री. श्रीकृष्ण दादा, श्री. रविदादा सातपुते, श्री. सचिन चपळगावकर, श्री. आदित्य शिंदे, श्री. शिवराज पिंपुडे, सौ. शीतल कापशीकर ह्यांनी भरपूर परिश्रम घेतले. विद्यालयाच्या सर्व अध्यापक पालक कर्मचारी ह्यांच्या सहकार्यामुळे हे उत्तम कार्य उभे करू शकले.

## ■ अटल धडपडालय

अटल इनोव्हेशन मिशन तर्फे गतवर्षी आयोजित अटल इनोव्हेशन मॅरेथॉन मधील पहिल्या १०० प्रकल्प गटातील विद्यार्थ्यांसाठी Deep Technology कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेसाठी ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाची विद्यार्थिनी श्रुती कुलकर्णी हिची निवड झाली आहे. ही कार्यशाळा रशियातील 'सोची' याठिकाणी होणार आहे. निवडलेले २५ विद्यार्थी या कार्यशाळेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

### ० भारत आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सव २०१९

ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील १३ विद्यार्थी, कोलकाता येथे आयोजित पाचव्या India International Science Festival (IISF २०१९) मध्ये सहभागी झाले. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे देशातील विद्यार्थ्यांना विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन शोध व प्रगतीबद्दल माहिती करून देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांसाठी विविध प्रात्यक्षिक सत्रे, वैज्ञानिक भेटी, सायन्स एक्स्पो भेट, व्याख्यान, विद्यार्थ्यांतर्फे भित्तीपत्रकाचे सादरीकरण, अवकाश दर्शन इत्यादी सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. दि. ५ ते ८ नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत कोलकाता येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## ■ क्रीडाकुल

दि. ३ व ४ नोव्हें. रोजी अंकिता बोडके व सरिता गोयकर यांची मंड्या येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

दि. १० नोव्हेंबर रोजी संघटनेच्या राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धा पुणे येथे पार पडल्या. त्यात अकरा खेळाडू सहभागी झाले होते. त्यामध्ये बारा वर्षाखालील मुलांना सांघिक कांस्य, चौदा वर्षाखालील मुलांना सांघिक कांस्य, अठरा वर्षाखालील मुलांना सांघिक कांस्य तर अठरा वर्षावरील मुलांना सांघिक रौप्य आणि चौदा वर्षाखालील मुलींना सांघिक कांस्यपदक मिळाले. मल्लखांबाच्या चार खेळाडूंनी वैयक्तिक पदक मिळवले आहे व या चार जणांची राजस्थान येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

छत्तीसगड येथे झालेल्या संघटनेच्या दि. ५ ते ७ मार्च दरम्यान झालेल्या मल्लखांबाच्या राष्ट्रीय स्पर्धेत वेदांत वाडेकर याला वैयक्तिक रौप्यपदक व सांघिक सुवर्णपदक मिळाले.

## ■ पूर्व माध्यमिक विभाग (मराठी माध्यम)

विभागातील विद्यार्थ्यांनी यावर्षी प्रथमच छात्र प्रबोधन आयोजित अभिवाचन स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय असे जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. या अभिवाचनाची संहिता शाळेची विद्यार्थिनी शांभवी देशपांडे हिने लिहिली होती.

## ■ युवती विभाग

प्रेरणा दल - ११वी - १३वी च्या महाविद्यालयीन युवतींचे पाक्षिक दल -

### ० गुजरात अभ्यासदौरा

**प्रासंगिक उपक्रम -** इ. १२वीच्या युवतींचा गुजराथ अभ्यासदौरा - दोन वर्षं पाक्षिक वारंवारितेने भेटणाऱ्या १२वीच्या युवतींच्या अभ्यासदौऱ्याचे नियोजन २२ ते ३० मे २०१९ या कालावधीत

केले होते. या युवतींना युवती विभागाच्या कामाच्या आतील वर्तुळात आणणे, गटकार्याचा व सामाजिक कामाच्या अभ्यासाचा अनुभव देणे, दोन वर्षांपूर्वीच्या पश्चिम बंगालच्या मातृभूमी परिचय शिबिराच्या पुढील टप्प्याचा अनुभव देणे, ही मुख्य उद्दिष्टे होती. १२वीची परीक्षा दिलेल्या चौदा युवती, १३वीची परीक्षा दिलेली एक युवती आणि चार मार्गदर्शिका यात सहभागी होत्या.

**दौऱ्याची मुख्य वैशिष्ट्ये –** युवतींनी केलेला गुजराथ संबंधित व्यक्ती/संस्थांच्या कामाचा अभ्यास. उदा. महात्मा गांधी, सरदार पटेल, धीरूभाई अंबानी, जमशेदजी टाटा, दूधक्रांती, गोधरा हत्याकांड, इ. प्रत्येक युवतीने काही ना काही अभ्यास केला. हा अभ्यास या युवतींनी दौऱ्यामध्ये सर्वांच्यासमोर मांडला. १२वीच्या युवतींनी या वेळी प्रवास, निवास, आर्थिक, अभ्यास, संपर्क, भोजन, साहित्य अशी बारा खाती सांभाळली.

**संस्थाभेटी –** ISRO, सफाई विद्यालय, साबरमती आश्रम, सेवा कॅफे, श्रमजीवी, Hanning Motors, अमूलच्या कारखान्याला भेट इ. विविध प्रकारे सामाजिक काम करणाऱ्या संस्थांना भेट देऊन किती वेगवेगळ्या प्रकारे आपण समाजकार्यात योगदान देऊ शकतो हे गटाने अनुभवले. Statue of Unity ला भेट, राणी की वाव, Calico Museum, सयाजीराव राजवाडा भेट इ. गुजरात मधील अशा विविध ठिकाणच्या भेटीतून गुजरातचा आणि भारताचा वेगळा वारसा मुलींच्या समोर आला. सरदार पटेलांच्या कार्याची पुन्हा ओळख झाली. या गटाचे इ. ९वीसाठी होणाऱ्या नेतृत्व प्रशिक्षण शिबिरामध्ये अनुभवकथन देखील झाले.

## ■ गुरुकुल

### ○ विवेकानंद जयंती

पराक्रमाला माथ्यावरचे अथांग नभ अपुरे

दि. १२ जानेवारी २०२० रोजी गुरुकुलने विवेकानंद जयंतीनिमित्त प्रत्येकी किमान १००० सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प केला होता. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी पहाटे ४.१५ वाजता सूर्यनमस्कार घालण्यास सुरुवात केली. ९.४५ वाजता सर्वांचे १००० सूर्यनमस्कार पूर्ण झाले. पाचवीच्या १८, सहावीच्या १६, सातवीच्या १४, आठवीच्या १६, नववीच्या ८, दहावीच्या २ विद्यार्थ्यांनी १००० नमस्कार घातले. हा किमान आकडा गाठल्यानंतर त्यापुढे आपल्या क्षमता ताणत पाचवी ते दहावीच्या ३९ विद्यार्थ्यांनी ११११ ते १६०० दरम्यानचा आकडा गाठला. याशिवाय २९ विद्यार्थ्यांनी २०२० सूर्यनमस्कार घालून यावर्षीचा उच्चांक गाठला. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मिळून यावर्षी एकूण १,९४,८११ सूर्यनमस्कार घातले.

या व्यतिरिक्त पालक, स्नातक आणि युवक-युवतींनी २७८० सूर्यनमस्कार घातले. एकूण १,९७,५९१.

## ■ माध्यमिक विभाग (मराठी माध्यम)

संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान, मुंबई व पतंजली योग समिती, पिंपरी चिंचवड' आयोजित 'नैतिक शिक्षण योजने' अंतर्गत घेतलेल्या लेखी परीक्षेत एकूण ६० शाळांमधील ५५०० विद्यार्थ्यांमधून आपल्या मराठी माध्यमिक विभागातील सहा विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचे यश मिळविले.

तसेच या परीक्षेत अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग आणि मिळालेले प्रथम क्रमांक यामुळे ज्ञान प्रबोधिनी नवनगर शाळेला 'आदर्श शाळा' म्हणूनही गौरविण्यात आले.

## ■ जैवतंत्रज्ञान

### ○ बांबू प्रकल्प, आंबी

निगडी केंद्रात शिक्षणाबरोबर संघटन आणि संशोधनाचे काम सुरू केले आहे. यंदा आपल्या जैवतंत्र विभागाने बांबूच्या रोप निर्मितीचे तंत्रज्ञान कला बायोटेक कंपनीबरोबर वापरून सुमारे एक लाख रोपांची निर्मिती केली. पर्यावरण क्षेत्रात प्लास्टिक वस्तूंना पर्याय, ऊर्जा-कागद निर्मिती अशा अनेक गोष्टींसाठी बांबूची मागणी वाढत आहे, वाढणार आहे. यासाठी उपयुक्त तंत्रज्ञान आपल्या या विभागातील सदस्यांनी नुसतेच विकसित केले नाही तर ते कार्यवाहीत आणून दाखविले. समाज प्रश्नांवर काम करायचे म्हणजे काय हे या जैवतंत्र विभागाच्या कामातून आपल्या लक्षात येईल.

✦✦✦


**छात्र प्रबोधन प्रकाशने**

✻ **कथासंग्रह**
१. मोहोर
२. बहर
३. रस्काझी-रशियन कथा
४. सफर विज्ञानकथांची
५. प्रेरक कथा
६. कहाणी दोन भावांची

✻ **ललित लेखसंग्रह**
७. अलगुज
८. केवड्याचं पान
९. बकुळफुलं

✻ **कविता/काव्यपंक्ती संग्रह**
१०. कवितेच्या गावा
११. शब्दांची रत्ने

✻ **काव्य-रसग्रहण लेखसंग्रह**
१२,१३. गंध मोहवी काव्याचा भाग १ व २
१४. पाहिलेच पाहिजे असे काही
१५ ते १७. वाचलेच पाहिजे असे काही भाग १,२,३

✻ **माहितीपर पुस्तके**
१८. आपला पाऊस
१९. छंद आकाश दर्शनाचा
२०. वनस्पतींचे अनोखे विश्व

✻ **विचार व कृतिप्रवर्तक लेखांचा संग्रह**
२१. स्वीकारशील स्वदेशी
२२. हरित संदेश
२३. Green Messages
२४. हट्टी व्हा हट्टी


(पान नं. ५८ पुढे चालू)

# ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र

- पूर्व प्राथमिक विभाग
- प्राथमिक विभाग
- माध्यमिक विभाग
- शिशु अध्यापिका विद्यालय
- युवक-युवती विभाग
- विस्तार
- पौरोहित्य व सत्संग विभाग

## ■ पूर्व प्राथमिक विभाग

परीक्षा, स्पर्धा, लेखन यांना टाळून आपली शिशु शाळा ही बालमानसशास्त्राच्या तत्त्वानुसार कारक व बौद्धिक कौशल्यांच्या विकासावर भर देते.

दि. १० ते १२ जून २०१९ या कालावधीत अध्यापक प्रशिक्षण झाले. बालभवन (पुणे) येथील पल्लवी कासंडे व विजया गोरिंटला या ताईंनी अभिनयगीत, खेळ, हस्तव्यवसाय, टाकाऊ वस्तूपासून विविध खेळ, विज्ञान प्रयोग यासंदर्भात मार्गदर्शन केले. दि. २२ जून रोजी 'कथाकथन तंत्र-मंत्र' या कार्यशाळेत सर्व शिक्षिका सहभागी झाल्या होत्या.

आषाढी एकादशीनिमित्त मोठ्या गटातील मुलांनी पूजा साहित्याचे ४० स्टॉल्स शाळेच्या परिसरात थाटले होते. सामान्यज्ञान वाढावे हा हेतू होता. तसेच पालखी-दिंडी सोहळा भक्तिमय प्रसन्न वातावरणात झाला. दीपपूजन कार्यक्रमात गारगोटी ते सौरऊर्जेवर चालणाऱ्या दिव्यांची ओळख करून दिली. अपर्णाताई कल्याणी यांनी शुद्ध उच्चारासह श्लोक कसे म्हणावेत यासंदर्भात छोट्या गटातील पालकांना मार्गदर्शन केले. नागपंचमीनिमित्त मुलींनी तेरा प्रकारच्या पारंपरिक खेळांचे सादरीकरण केले. गोकुळाष्टमी प्रकल्प पद्धतीने साजरी करण्यात आली. बासरीवादन ऐकणे, पिंपळपानाची पिपाणी करणे, कागदी पुंगळी करणे, कृष्णाची गाणी-गोष्टी ऐकणे, इ. उपक्रम झाले. तसेच बालकृष्ण ते भगवद्‌गीता सांगणाऱ्या कृष्णाची माहिती नाट्यीकरणाच्या माध्यमातून साजरी करण्यात आली.

कोजागिरीनिमित्त सायंकाळी शाळा भरविण्यात आली. यावेळेस अभिनय गीते, बोलक्या बाहुल्या व भातुकलीचा खेळ, स्वकल्पनेने किल्ला (मातीकामात) तयार करणे, इ. कार्यक्रम झाले.

### o बालविकास मंदिर अमृत महोत्सवी वर्षानिमित्त योजलेले उपक्रम

- **माजी विद्यार्थी मेळावा –** अमृत महोत्सवी उपक्रमांची सुरुवात बालविकास मंदिराच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याने झाली. ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीशराव बापट, सोलापूर केंद्राचे सहकार्यवाह श्री. अमोलदादा गांगजी, सर्व विभागप्रमुख या मेळाव्यास उपस्थित होते.
- **राखी पौर्णिमा –** राखी पौर्णिमेचे औचित्य साधून बालविकासच्या माजी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास निमंत्रित करण्यात आले. मोठ्या गटातील शिशुंनी सुंदर राख्या तयार केल्या होत्या. त्याच उपस्थितांना बांधण्यात आल्या.
- **त्रिचक्री स्वार –** शाळेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून अमृत महोत्सवानिमित्त यावर्षीचा विशेष व आनंददायी उपक्रम म्हणजे शिशुची त्रिचक्रीवर फेरी अर्थात सायकल रॅली ! ५५ विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते. 'खेळ खूप खेळुनी सतेज व्हायचे' या उक्तीनुसार रॅलीमध्ये या बालचमूने आपला सहभाग नोंदवला. आई-बाबांबरोबर गाडीवर, गाडीत किंवा रिक्षामधून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली दोनचाकी, तीनचाकी सायकल त्यांनी आणली होती. सकाळी ६.०० ते ७.३० या वेळेत होमकट्टा परिसरात सायकल रॅलीचा आनंद मुलांनी अनुभवला.
- **विज्ञान मेळा –** विज्ञानदिनाचे औचित्य साधून अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विज्ञान मेळाव्याचे आयोजन केले होते. मोठ्या गटातील ७५ मुलांनी ७५ प्रयोगांचे सादरीकरण संभाजीराव शिंदे विद्यामंदिर (विडी घरकुल भाग) येथे केले. निरीक्षणात्मक, वर्गीकरणात्मक, प्रयोगात्मक व माहितीप्रधान अशी चार प्रकारची मांडणी होती.
- **मातृदेवो भव –** आईविषयीचा आदरभाव व कृतज्ञता बालवयातच रुजावी आणि 'मातृदेवो भव' हा संस्कार मुलांवर व्हावा म्हणून मातृपूजनाच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. १०६ पालिकांचा या उपक्रमात सहभाग होता.
- **छायाचित्र स्पर्धा –** पालकांना उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षण प्रक्रियेमध्ये सामावून घेण्यासाठी व्हॉट्स्‌ॲप स्पर्धा घेतली गेली. मुले बहुदिशेने विचार करतात हे पालकांच्या लक्षात यावे यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले गेले. पालकांना आपल्या पाल्याचा चौकटीबाहेर विचार करतानाचा एक फोटो व त्या फोटोखाली गद्यात किंवा पद्यात त्या फोटोसंबंधी आपणास काय वाटते याचे लेखन करून पाठविण्यास सांगण्यात आले. १२५ बालकांचे फोटो आले.
- **पौष्टिक पाककला –** बालवयात पौष्टिक आहार कसा असावा हे कळावे म्हणून पालिकांसाठी पाककला स्पर्धेचे नियोजन करण्यात आले. ७१ पालिकांनी विविध पौष्टिक पदार्थ करून आणले होते.
- **आजी-आजोबा कार्यशाळा –** बालवयात बालकांच्या जडण-घडणीत आजी आजोबांचा मोठा वाटा असतो. त्यांच्या अनुभवांची देवाण-घेवाण व्हावी व आजी-आजोबांची भूमिका यात काय असावी हे उलगडण्यासाठी एकदिवसीय कार्यशाळा योजली होती. या कार्यशाळेत ज्येष्ठ मानसतज्ज्ञ व समुपदेशक

अलकाताई काकडे यांनी मार्गदर्शन केले. १३१ आजी-आजोबांनी यात सहभाग नोंदवला.

- **गंमत खेळ –** आपल्या शिशु शाळेमध्ये शिशुंच्या विकासासाठी चाललेले प्रयोग इतर शाळांनाही कळावे यासाठी पुष्पा गुप्ता मॉडेल स्कूल (आसावा शाळा) तसेच शरदचंद्र पवार प्रशालेतील पूर्वप्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी गंमत खेळांचे नियोजन शिशु विभागातील सहशिक्षिकांनी केले होते.

सौ. अवंतिकाबाईंनी शिशु शाळेमध्ये नावीन्यपूर्ण उपक्रमांचा जो दीप लावला होता तो दीप तेवता ठेवण्यात यशस्वी ठरलो आहोत याची जाणीव या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त झाली.

## ■ प्राथमिक विभाग

मुलांची वृत्तिघडण व्हावी व मूलभूत क्षमतांचा विकास व्हावा या उद्देशाने प्राथमिक विभागात विविध उपक्रमांची रचना केलेली असते. अध्यापक प्रशिक्षणामध्ये गणित प्रशिक्षण या विषयावर स्नेहाताई भन्साळी यांचे मार्गदर्शन मिळाले. दि. ५ ऑक्टो. रोजी इ. ४थीच्या विद्यार्थ्यांची रोटरी नॉर्थ राधाकिशन फोरम कर्णबधिर विद्यालय या ठिकाणी क्षेत्रभेट झाली. रोटरी क्लबतर्फे सौ. सविता माढेकर, प्रतिभा इंगळे व शिवगंगा सगरे यांना 'नेशन बिल्डर अॅवॉर्ड २०१९-२०' देऊन गौरविण्यात आले.

- **आरोग्य सप्ताह –** या वर्षातील वेगळा उपक्रम म्हणजे दि. १८ ते २३ डिसें. २०१९ दरम्यान आरोग्य सप्ताह साजरा केला. या मध्ये विद्यार्थ्यांना चित्रफिती दाखवून आरोग्याचे महत्त्व सांगितले. श्री. व सौ. डॉ. हत्ताळी यांनी बाल आरोग्यासंबंधी माहिती दिली. योगासनाचे व व्यायामाचे महत्त्व मा. स्नेहलताई पेंडसे यांनी सांगितले व योगासने शिकवली. मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम याबद्दल चित्रफीत दाखवली. आरोग्य चांगले राहण्यासाठी आहार कसा व कोणता घ्यावा याबाबत मार्गदर्शन केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालयातर्फे दंत तपासणी शिबिर झाले. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त इ. १ली ते ४थी पर्यंतच्या एकूण २९६ विद्यार्थ्यांपैकी ७५ विद्यार्थ्यांच्या गृहभेटी अध्यापकांनी घेतल्या. 'सुजाण पालकत्व' या विषयावर ब्रेन एज्युकेशन सल्ला व समुपदेशन केंद्राचे संचालक श्री. किरण कुलकर्णी व सौ. शलाका कुलकर्णी यांनी पालक सभेत पालकांना मार्गदर्शन केले. फेब्रवारी महिन्यात विज्ञानदिन साजरा करण्यात आला. यामध्ये ७५ भित्तिपत्रकांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.

## ■ माध्यमिक विभाग

माध्यमिक विभागात शालेय शैक्षणिक गुणवत्ता वाढीसोबतच स्वयंअध्ययन कौशल्ये, नेतृत्वगुण विकसन, सामाजिक जाणीव संवर्धन, जीवनकौशल्ये ओळख या उद्देशांनी उपक्रमांची रचना केलेली असते. विद्यारंभ, वर्षारंभ, योगदिन, आषाढी एकादशी कार्यक्रम, गणेशोत्सव, शिबिरे, सहली, पालक सभा इ. दरवर्षीप्रमाणे उपक्रम झाले. यातील नवीन प्रयोग आणि उपक्रम यांचे वृत्त खाली देत आहोत.

दि. ११ जुलै रोजी बालविकास मंदिरचा ७४वा वर्धापनदिन होता. यानिमित्त प्रशालेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ झाला. एकूण १०२ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या समारंभास सोलापूर ज्ञान प्रबोधिनीची माजी विद्यार्थिनी डॉ. अपूर्वा जोशी हिला प्रमुख अतिथी म्हणून बोलावले होते. Forensic accounting या क्षेत्रात अपूर्वा काम करीत असून तिची या क्षेत्रातील यशस्वी वाटचाल, अनुभव तिच्या मुलाखतीतून विद्यार्थ्यांसमोर उलगडण्यात आले. या वर्षी शैक्षणिक संशोधन केंद्रामार्फत आयोजित 'ज्ञानवाहिनी प्रेरणा सेतू' या उपक्रमांतर्गत प्रबोधिनीच्या पुणे, निगडी, सोलापूरच्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या इ. ९वी मधील विद्यार्थ्यांशी गप्पा स्वरूपात संवाद साधून मुलांना करियर विषयक मार्गदर्शन केले. वर्षभरात अशी २१ सत्रे झाली. इ. ८वीतील शिष्यवृत्ती परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी गणित विषयासाठीची कार्यशाळा झाली. तसेच या विद्यार्थ्यांसाठी आणि इ.१०वीतील एन.टी.एस्. परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी सौरभ बोडस यांचे 'बुद्धिमत्ता' विषयासाठी दूरस्थ पद्धतीने मार्गदर्शनपर तास झाले. गणेशोत्सव दरम्यान इ. ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प शिबिर झाले. दि. १२ सप्टें. रोजी श्रींची विसर्जन मिरवणूक डफरिन चौक ते पोलीस कल्याण केंद्र या मार्गावर निघाली.

नोव्हेंबरमध्ये राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेमार्फत आयोजित प्रकल्प स्पर्धेत इ. ८वीतील सई जकनाईक व श्रेयसी कुंटे या दोघींनी प्रकल्प सादर केला. 'स्वच्छ, सुंदर व आरोग्यसंपन्न देशासाठी नावीन्यपूर्ण कल्पना' या विषयांतर्गत 'सडलेल्या भाज्यांपासून खतनिर्मिती' या प्रकल्पाची विभागीय स्तरावर निवड झाली.

दि. २७ डिसें. रोजी आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धा घेण्यात आली. दहा शाळांतील ९९ विद्यार्थ्यांचा सहभाग यात होता. तसेच सहा शाळांतील अध्यापकांनी सहभाग घेतला होता.

इ. ८वीतील विद्यार्थ्यांचे हराळी-उस्मानाबाद येथे विद्याव्रत शिबिर घेण्यात आले. दि. ९ ते ११ जाने. २०२० या तीन दिवसीय शिबिरात व्याख्याने, गटकार्य, अनुभव कथन, गावभेटी, श्रमकार्य, परिसर पाहाणी, मनाचे श्लोक पठण यांचे नियोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये आदरणीय संचालक डॉ. गिरीशराव बापट, श्री. अभिजितदादा कापरे, बागेश्रीताई पोंक्षे यांची व्याख्याने झाली तर गंधारदादा कुलकर्णी आणि गौरीताई कापरे यांचे अनुभवकथन सत्र झाले.

इ. ५वीची उजनी धरण, इ. ६वीची कोल्हापूर-पन्हाळा, इ. ७वीची अहमदनगर व मुंबई आणि इ. ८वीची रायगड व राजगड या ठिकाणी सहली झाल्या. तसेच ९वीचे तंबू शिबिर झाले.

दि. १८ फेब्रु. रोजी आंतरशालेय बालविकास वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इंग्रजी विषयासाठी झालेल्या या स्पर्धेत पंधरा शाळांतील एकूण ९० विद्यार्थी सहभागी होते.

शिवजयंतीनिमित्त प्रमुख पाहुणे हृतिकदादा कुर्ले यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रातील महत्त्वाच्या प्रसंगांचे वर्णन केले. दि. २७ फेब्रु. रोजी 'मराठी राजभाषा' दिनानिमित्त इ. ९वीच्या मुलींच्या अग्रणी गटाकडून भाषिक खेळ व प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी या दिवशी आकाशवाणी केंद्रावर 'ऐश्वर्यवती मराठी' कार्यक्रमानिमित्त मराठीचा इतिहास, तिचे स्वरूप, बदलते प्रवाह, सद्य:स्थिती आणि भाषा संवर्धनासाठी काम करणाऱ्या संस्था यांची माहिती सांगणारा संवादात्मक कार्यक्रम सादर केला.

परिसरातील शाळांतील इ.९वीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान जिज्ञासा मंच सुरू केला आहे. यावर्षी रक्त व रक्तसंकलन, ॲमेझॉन जंगल सफर, जलसंवर्धन, वैज्ञानिक संकल्पना व विज्ञानातील आश्चर्ये या विषयांवर सत्रे झाली. एकूण सुमारे ७० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

## ■ शिशु अध्यापिका विद्यालय

शिशु अध्यापिका विद्यालयाची ५६वी तुकडी उत्तीर्ण झाली. परीक्षेचा निकाल १००% लागला.

उद्योजकता विकासाचे प्रशिक्षण विद्यार्थिनींना देण्यात आले. या प्रशिक्षण उपक्रमात ५० जणी सहभागी झाल्या होत्या. या प्रशिक्षणास स्नेहाताई नित्सुरे, प्रतिभा स्वामी व अरुणा गवई यांनी मार्गदर्शन केले. दि. ७ फेब्रु. रोजी विद्यार्थिनींचा संकल्प ग्रहणाचा कार्यक्रम झाला. यावेळी पौरोहित्य विभागाच्या प्रमुख डॉ. अपर्णाताई कल्याणी यांनी 'संकल्प शक्ती' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विज्ञानदिनानिमित्त आजी व माजी विद्यार्थिनींनी मिळून संभाजी शिंदे बालक मंदिर येथे २२ विज्ञान प्रयोगांची मांडणी केली. यावेळी १३० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रयोग करून पाहिले. सहजीवनाचा अनुभव देण्यासाठी विद्यार्थिनींची सहल सोनदरा येथील गुरुकुलम्, रामलिंग, कुंथलगिरी व तुळजापूर येथे नेण्यात आली.

## ■ युवक-युवती विभाग

प्रशालेतील इ. ५वी ते १०वी क्रीडा दलांची जबाबदारी युवक-युवती विभागाकडे होती. गणेशोत्सवामध्ये गणेशमूर्ती निर्मिती व विक्री उपक्रमांतर्गत २१५ पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करून विकल्या. रक्तदान, गरजूंना कपडे वाटप, प्रबोधनात्मक नाट्य, अन्नछत्रात वाढपसेवा इ. सामाजिक उपक्रम केले.

➤ **आरोग्य शिबिर –** सोलापुरात आरोग्याच्या क्षेत्रात काही काम सुरू व्हावे या दृष्टीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. सोलापुरातही आता पुरेशा प्रमाणात डॉक्टर्स झालेले प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी आहेत. या सगळ्यांचे संघटन व्हावे व या सगळ्यांनी मिळून भविष्यात सोलापुरातही प्रबोधिनीचे आरोग्य सेवा केंद्र उभे करावे अशी कल्पना आहे. या दृष्टीने सोलापुरातील माजी डॉक्टर विद्यार्थ्यांची एक बैठक झाली. 'मोफत आरोग्य तपासणी शिबिर' घ्यावं असं ठरलं. सोलापूर शहरातील संख्यात्मक दृष्टीने मोठ्या परंतु आर्थिकदृष्ट्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत असणाऱ्या विडी घरकुल भागातील सदस्यांसाठी हे शिबिर मोफत योजले गेले. या शिबिराचा सुमारे २०० जणांनी लाभ घेतला.

## ■ पौरोहित्य व सत्संग विभाग

श्रीमद्‌भगवद्‌गीता प्रशिक्षण वर्ग जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात ४४ महिलांसाठी झाला. सोलापुरातील डॉक्टर भगिनींचे रूद्रपठण, दुर्गा सप्तशती प्रशिक्षणाचे वर्गही झाले. या दोन्ही वर्गांमध्ये मिळून ६९ महिला सहभागी होत्या. स्वामी स्वरूपानंद सेवा मंडळ, पावस आणि ज्ञान प्रबोधिनी सत्संग परिवार, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभंग ज्ञानेश्वरी सप्ताह' आणि 'साधना शिबिराचे' संयोजन करण्यात आले होते. सत्संग विभागातर्फे दर रविवारी सायं. ४.३० ते ५.३० या वेळेत प्रवचन, अभंग गायन इ. कार्यक्रम असतो. या वर्षी हरिपाठावर निरूपण झाले. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून या सप्ताहाचे संयोजन केले होते.

## ■ विस्तार

विस्तार कार्यास सुरुवात व्हावी म्हणून गेले वर्षभर कर्नाटकातील कलबुर्गी येथे दर रविवारी शिबिर घेतले. दि.९ जुलै २०१९ रोजी पहिल्या वर्गास वीस मुलांसह सुरुवात केली. वर्षभरात एक दिवसीय चार तासांचे ४१ विकासिका वर्ग घेतले. या शिबिरात सामान्य प्रबोधिनीपणाची चार मूल्ये रुजवण्याचे ठरविले होते. यासाठी उपासना, चर्चा, गटकार्य, व्याख्याने या प्रकारच्या उपक्रमांची योजना केली.

प्रबोधिनीपण विद्यार्थ्यांमध्ये रुजवायचे असेल तर पालकांनाही प्रबोधिनी समजली पाहिजे म्हणून पालक संपर्क सुरू केला. विद्यार्थ्यांच्या घरी जाणे, गप्पा मारणे व त्यातून उपक्रमाचा हेतू पोचवणे असे सुरू झाले. त्यातूनच पुढे एक पालक सभा झाली. त्यातूनच मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. अशा प्रकारे आत्ता विस्ताराच्या दिशेने पहिले पाऊल पडले आहे. पण भविष्यात तेथे मोठे काम करण्याचा संकल्प केला आहे.

✦✦✦

# ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र

- विद्यालय व गुरुकुल
- प्रदेश विकसन
  - कृषी विद्यालय
  - जलसंधारण
- पूरक शिक्षण

## ■ विद्यालय व गुरुकुल

### ० पंढरीच्या वारीतील सहभाग

अनुभव शिक्षणाचा भाग म्हणून दि. ९ व १० जुलै २०१९ ला इ. ९वीचे विद्यार्थी पंढरपुरच्या वारीमध्ये सहभागी झाले. वाखरीला जाऊन त्यांनी वेगवेगळ्या दिंड्यांना भेट दिली, वारकऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्यासोबत राहण्याचा देखील अनुभव घेतला.

### ० अटल टिंकरिंग लॅब उद्घाटन

शालेय विद्यार्थ्यांनी उपक्रमशील बनावे व आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याची संधी त्यांना मिळावी, या हेतूने नीती आयोगाने अटल टिंकरिंग योजना सुरू केली असून त्याअंतर्गत आपल्या शाळेची निवड झाली आहे. दि. १० ऑगस्ट रोजी हराळी विद्यालयाच्या 'अटल टिंकरिंग' प्रयोगशाळेचे उद्घाटन मा. संचालकांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमासाठी या उपक्रमाचे मार्गदर्शक म्हणून श्री. गजानन वैद्य, श्री. विलास रबडे, श्री. मिलिंद बडे, श्री. रवींद्र गोडबोले तसेच हराळी केंद्राचे स्नेही व ज्येष्ठ उद्योजक श्री. नरेंद्र कानडे, अन्य शाळांमधील प्रशिक्षक प्रणव पुजारी, कल्पेश कोठाळे उपस्थित होते. गेल्या सहा महिन्यात मुलांनी अनेक प्रकल्प केले.

### ० इंग्रजी अध्यापन केंद्राचे उद्घाटन

ग्रामीण भागातल्या मुलांना इंग्रजी विषय नीट शिकवला जात नाही. त्यामुळे त्यांना इंग्रजीची भीती बसते व पुढील आयुष्यात अनेक संधींपासून वंचित रहावे लागते. ग्रामीण भागातील हे चित्र बदलण्यासाठी पर्यायी कृती-आधारित अध्यापन पद्धतीवर (Activity based learning) संशोधन व्हावे व त्याचा प्रचार-प्रसार व्हावा या उद्देशाने दि. १ ऑक्टो. रोजी ज्ञान प्रबोधिनी हराळी, येथे इंग्रजी अध्यापन केंद्राची सुरुवात करण्यात आली. स्व. श्री. वसंत तथा आप्पा साने यांनी मृत्युपश्चात दिलेल्या देणगीतून हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मा. हेमाताई होनवाड या केंद्राच्या मार्गदर्शिका म्हणून काम बघणार आहेत.

### ० विद्याव्रत कार्यक्रम

दिवाळीनंतर इ. ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रत शिबिर व व्याख्यानमाला झाली. विद्याव्रत कार्यक्रम दि. ११ जाने. रोजी झाला. प्रबोधिनीच्या धडाडीच्या कार्यकर्त्या बागेश्रीताई पोंक्षे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी आणि 'स्वरूपवर्धिनी' संस्थेच्या पुष्पाताई नडे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

### ० विद्यार्थिनींचे बर्ची प्रात्यक्षिक

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विद्यालयातील विद्यार्थिनींच्या गटाने हराळी गावात बर्ची नृत्याचे प्रात्यक्षिक केले. तसेच किशोरी विकास प्रकल्पाच्या मार्गदर्शिकांनी माकणी येथील 'भारत माध्यमिक विद्यालय' शाळेतील मुलींचे बर्ची नृत्य बसवून त्याचे सादरीकरण केले. या पथकांना आपल्या विद्यार्थिनी आणि पुण्याच्या तीन युवती कार्यकर्त्या यांच्या वाद्यपथकाने साथ केली.

## ■ प्रदेश विकसन

### ० कृषी विद्यालय

- **निरीक्षण प्रकल्प –** शेती शास्त्र चांगल्या प्रकारे आत्मसात करायचे असेल तर अनेक कौशल्ये शिकावी लागतात. त्यातले महत्त्वाचे निरीक्षण कौशल्य विद्यार्थ्यांनी शिकावे, या हेतूने १ ते १५ ऑक्टो. या काळात निरीक्षण कौशल्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मधमाशीपालन, दूध उत्पादन व वेधशाळा या तीन प्रकल्पांमध्ये १५ दिवस नियमित निरीक्षणे/नोंदी घेतल्या. दि. १८ ऑक्टोबरला त्यावर आधारित सादरीकरणे विद्यार्थ्यांनी केली.
- **विदर्भ अभ्याससहल व शिबिर –** कृषी विद्यालयाची शैक्षणिक सहल विदर्भात गेली होती. त्यात अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला भेट, वर्धा येथील स्वयंपूर्ण शेतीचे प्रयोग बघणे याबरोबरच शेगाव, मोझरी येथील संत तुकडोजी महाराजांचा आश्रम, चिखलदरा, पवनार आश्रम इत्यादी स्थळांच्या भेटी असा कार्यक्रम होता. शेवटचे तीन दिवस नयी तालीम येथे विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसाचे निवासी शिबिर घेतले गेले. त्यासाठी नेतृत्व विकसन केंद्राचे कार्यकर्ते पुण्याहून आले होते.
- **कृषी आधारित उद्योगांचे अनुभव शिक्षण –** द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी कृषी आधारित उद्योगांची माहिती करून घेण्यासाठी सहा यशस्वी उद्योजकांच्या भेटी घेऊन त्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यापूर्वी त्यांच्या यशोगाथांचे वाचन व चर्चा अशी पूर्वतयारी करून घेण्यात आली होती. या भेटींमध्ये इंदापूर येथील ज्वारी प्रक्रिया उद्योग, मोहोळ येथील भाजीपाला रोपवाटिका, पाकणी येथील 'अभिषेक मळा' कृषी पर्यटन केंद्र, पाडोळी येथील हरितगृहातील फुलशेती, बारूळ येथील कृषी औजारे व यंत्र उद्योग व हराळी येथील शेळीपालन व्यवसाय अशा सहा ठिकाणांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी

गटागटाने मुलाखतीद्वारे या उद्योगांची माहिती घेतली व नंतर विद्यालयात त्याचे सादरीकरण केले.

➤ **ट्रॅक्टर प्रशिक्षण –** या वर्षी कृषी विद्यालयाच्या सात विद्यार्थी – विद्यार्थिनींची पहिली बॅच ट्रॅक्टर चालवणे व देखभाल याचे प्रशिक्षण घेऊन बाहेर पडली.

➤ **केंद्रावरील शेती प्रयोग –** यावर्षी खरीप हंगामात सूर्यफुलाचा एकात्मिक पीक संरक्षणावरचा एक प्रयोग हैद्राबाद आणि लातूर येथील गळीत धान्य संशोधन केंद्राच्या मदतीने करण्यात आला; तसेच तूर पिकाच्या BSMR ७३६ आणि BDN ७१६ या वाणांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी प्रयोग घेण्यात आला.

➤ **शेती विस्तार प्रकल्प –** शेती विस्तार प्रकल्पाची सुरुवात दि. ३० एप्रिल रोजी हराळी केंद्रावरील सेंद्रिय शेती मेळाव्याने झाली. या मेळाव्यात परिसरातील दहा गावांमधून सुमारे ११० शेतकरी उपस्थित होते. परभणी कृषी विद्यापीठातील निवृत्त प्राध्यापक डॉ. अ. ना. जाधव यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व सांगितले आणि सतरा वेगवेगळ्या सेंद्रिय निविष्ठा बनवण्याचे प्रशिक्षण दिले. यानंतर वर्षभरात उदतपूर, हिप्परगा, होळी, काटे चिंचोली, तोरंबा या गावांत सेंद्रिय शेती प्रशिक्षणे घेण्यात आली. तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

दि. १९ जूनला कळंब तालुक्यातील 'निपाणी' येथील श्री. राजशेखर पाटील यांच्या बांबूशेतीला भेट दिली होती. उस्मानाबादच्या दुष्काळग्रस्त भागात बांबू पिकाचा पर्याय असू शकतो या विचाराने दि. २७ जुलै रोजी केंद्रावर बांबू लागवड प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पुण्याहून ज्येष्ठ बांबूतज्ज्ञ डॉ. हेमंत बेडेकर आले होते. हा कार्यक्रम प्रकल्प संचालक आत्मा, कृषी तंत्र निकेतन, हराळी व जैव तंत्रज्ञान विभाग, निगडी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

➤ **कृषी निविष्ठा विक्रेत्यांसाठी अभ्यासक्रम –** MANAGE, हैदराबाद या संस्थेने कृषी निविष्ठा विक्रेत्यांचे शेती विषयक ज्ञान वाढावे यासाठी तयार केलेला DAESI हा अभ्यासक्रम दि. २० फेब्रुवारीपासून हराळी केंद्रावर सुरू करण्यात आला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील ४० विक्रेत्यांनी त्यासाठी आपले नाव नोंदवले आहे.

### o जलसंधारण

या वर्षात पाण्याच्या कामांमध्ये बरीच विविधता होती. पेयजल प्रकल्पाद्वारे जन–जागृती आणि स्थानिक लोकांचा सहभाग, जलसंधारणांच्या कामांद्वारे भूजल पातळी वाढवण्यासाठी प्रयत्न, पेयजलाच्या साठवणीसाठी फेरो–सिमेंट टाक्यांचे बांधकाम, गावांमध्ये पावसाचे मोजमाप व्हावे यासाठी रेनगेजचे वाटप, अशी वेगवेगळ्या प्रकारची कामे या वर्षी करण्यात आली.

| क्र. | प्रकल्प | कामाचे स्वरूप | कामाचे अंदाजे मोजमाप | गावे ( तालुका) संख्या | लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पेयजल प्रकल्प (ACWADEM-UNICEF) | गावांमध्ये लोकसहभागाद्वारे शाश्वत व सुरक्षित पेयजल आराखडा तयार करणे. | ३ गावांचे आराखडे | कावळेवाडी, बुकणवाडी, गोरेवाडी ता. उस्मानाबाद) | ३ गावं |
| २. | जलसंधारण | वॉटर कप स्पर्धेत भाग घेतलेल्या आणि अन्य काही गावांमध्ये ओढा खोलीकरण–रुंदीकरण, सलग समतल चर (CCT), शोषखड्डे, बांधबंदिस्ती, इनलेट–आउटलेट शेततळी इ. साठी आर्थिक मदत | १७४४५० घनमीटर | होळी( ता. लोहारा) पडोळी (ता. कळंब), वळगुड, वरवंटी, दूधगाव, तुगाव, चिलवडी, डकवाडी (ता. उस्मानाबाद) | ८ गावं |
| ३. | पेयजल साठवण | अंशत: लोकसहभागातून फेरोसिमेंट टाक्या | ६ टाक्या (एकूण ६५००० लि.) | इर्ला, कावळेवाडी, गोरेवाडी, बुकणवाडी, (ता.उस्मानाबाद) सारणी (२ टाक्या) (ता. औसा जि. लातूर) | ६०० – ८०० कुटुंब |
| ४. | रेनगेज वाटप | पावसाचे मोजमाप करण्यासाठी गाव पातळीवर रेनगेज वाटप | १० | वलगुड, वरवंटी, चिलवडी, इर्ला, तुगाव, दूधगाव, कावळेवाडी, बुकणवाडी, गोरेवाडी (ता. उस्मानाबाद) पडोळी ( ता. कळंब) | १० गावं |
| ५. | रोटरी ग्लोबल ग्रँट प्रकल्प | जनावरांसाठी पाण्याच्या हौदांचे वाटप | २५ हौद | हराळी, तोरंबा, सालेगाव हिप्परगा, उदतपूर | १०० शेतकरी |

| उपक्रमाचे नाव | उपक्रमाचे स्वरूप | गाव / शाळा संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| अभ्यासिका | शालाबाह्य उपक्रम, इ. ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांच्या मूलभूत अभ्यास कौशल्य विकासासाठी आठवड्यातील तीन दिवस संध्याकाळी तासिका | २ | ४५ |
| विकासिका | शालाबाह्य उपक्रम, हराळी गावातील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी खेळाच्या माध्यमातून भाषा, इंग्रजी आणि गणितातील मूलभूत कौशल्ये विकसित करणे | १ | ३९ |
| किशोरी विकास | चार शाळांमध्ये आणि दोन गावांमध्ये किशोरवयीन मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकसन, प्रेरणा जागरण, आरोग्य आणि कौशल्य विकसन उपक्रम | ५ गावे, ६ शाळा | २०० |
| आश्रम शाळा आणि तांड्यावरील अभ्यासिका | या भागातील वंचित गटातील विद्यार्थ्यांपर्यन्त वाचन, लेखन, गटचर्चा, हस्तकौशल्य अशा नियमित कृतिसत्रांद्वारे पोहचण्याचा प्रयत्न | ६ | १७५ |
| HCL पुरस्कृत मैत्री पुस्तकांशी | ग्रामीण भागातील मुलांना वाचनाची गोडी लावण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इ. ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठीचा उपक्रम | १४ | १४२७ |

## ■ पूरक शिक्षण

या वर्षी पूरक शिक्षण विभागातर्फे HCL – मैत्री पुस्तकांशी प्रकल्प, गावपातळीवरील अभ्यासिका, किशोरी विकास उपक्रम, आश्रम शाळा व तांड्यावरील अभ्यासिका आणि हराळी गावातील प्राथमिक वयोगटासाठी विकासिका हे प्रकल्प राबवण्यात आले.

### ○ अन्य भेटी व कार्यक्रम

➤ **स्वातंत्र्य दिन –** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ नेते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. सुशीलकुमारजी शिंदे यांनी ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्राला भेट दिली.

➤ **दीक्षा app कार्यशाळा –** दि. १२ व १३ ऑगस्टला महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक मंडळ, उस्मानाबाद, शिक्षण विभाग (माध्यमिक) आणि ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दीक्षा app विषयीची कार्यशाळा घेण्यात आली. उमरगा, तुळजापूर व लोहारा या तीन तालुक्यातील ७९ शिक्षक या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. यासाठी शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या पल्लवीताई पराडकर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

➤ **आरोग्य शिबिरे –** फेब्रु. २०२० मध्ये तीन आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली होती. हराळीतील विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण तपासणी शिबिर डॉ. नीरज देशपांडे यांच्या मदतीने घेण्यात आले. दि. २६ फेब्रु. रोजी दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय, सोलापूर येथील डॉक्टरांनी मुलांसाठी दंतचिकित्सा शिबिर घेतले. उमरगा येथील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सातपुते यांनी दि. २३ फेब्रु. रोजी हराळी परिसरातील महिलांसाठी, अनीमिया व गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग या विषयी मार्गदर्शन व तपासणी शिबिर घेतले.

✦✦✦

(पान नं. ५२ वरून पुढे चालू)

### छात्र प्रबोधन प्रकाशने

**✲ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**
- २५. व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत
- २६. कल्पक बनू या
- २७. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास
- २८. Be Creative
- २९. तरंग मनाचे
- ३०. उजळती वाट
- ३१. निर्णय कौशल्य
- ३२. नियोजन कौशल्य
- ३३. भावनांच्या प्रांगणात
- ३४. गीता–गीताई
- ३५. प्रबोधन गीते भाग १ व २
- ३६. प्रबोधन गीते ऑडिओ सीडी

**✲ प्रेरणादायी, अनुभवपर पुस्तके**
- ३७. जिद्दीची लोभस रूपं
- ३८. आयुष्यातील वादळलाटा
- ३९. कथा इस्रोची
- ४०. आम्ही असे घडलो
- ४१. हरिसिंह नलुआ
- ४२. आमची जडणघडण
- ४३. गोष्टीरूप आप्पा
- ४४. आपले आप्पा
- ४५. समाजशिल्पी आप्पा

**✲ अभ्यासविषयक पुस्तके**
- ४६. असे घटते सुंदर अक्षर
- ४७, ४८. प्रज्ञाबोध भाग–४ व ५
- ४९,५०. अभ्यासातील स्वावलंबन
  - अभ्यासाची पूर्वतयारी भाग १
  - अभ्यासाची पूर्वतयारी भाग ३
- ५१. चला प्रकल्प करूया
- ५२. Learning to Explore: Project by Project

**✲ कलाकृतिपर पुस्तके**
- ५३. त्रिमितीची किमया
- ५४. 3D Magic
- ५५. कागदी हस्तकलेच्या दुनियेत
- ५६. हस्तकलांचा उत्सव
- ५७. कलेच्या विश्वात
- ५८. अभिवाचन एक कला

# ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र

**○ पवनामाई उत्सव**

पवना नदीचे जलशुद्धीकरण, पर्यावरण संवर्धन व जन-जागृती या उद्देशाने दि. २० व २१ डिसेंबर २०१९ रोजी दोन टप्प्यात पवनामाई उत्सव साजरा झाला. पवनानगर येथे नदी पूजन, प्रतिज्ञा, पथनाट्य, नदीचे ओटीभरण करून उद्घाटन कार्यक्रम झाला. त्यानंतर क्रमाक्रमाने थुगाव, शिवणे, बेबडोहळ व शेवटी गोडुंब्रे घाट असा पहिल्या दिवसाचा कार्यक्रम घेण्यात आला.

दि. २१ डिसेंबर रोजी ग्राम प्रबोधिनी मधून सकाळी ८.०० वाजता आय.पी.एस्. अधिकारी श्री. आनंद ताकवले यांच्या नेतृत्वाखाली २०० युवक सायकल प्रवास करून विद्यालयात उत्सवासाठी आले होते. त्यांचे व दोन बोटींचे विद्यालयातून मोरया गोसावी घाटाकडे प्रस्थान झाले. सायं. ४.०० वाजता मोरया मंदिर बाग, चिंचवडमध्ये मोठ्या संख्येने व उत्साहात पवनामाईची आरती, सभा व बक्षीस वितरण असा कार्यक्रम संपन्न झाला.

दोन दिवसांच्या या उत्सवातील उपस्थिती - डॉ. विश्वासजी येवले (जलदिंडी प्रमुख), श्री. प्रविणजी लडकत (पिं. चिं. जलशुद्धीकरण मुख्य अभियंता), श्री. भावसार (भावसार व्हिजन प्रमुख), श्री. आनंद ताकवले (आय.पी.एस्.अधिकारी), श्री. व्यंकटराव भताने (कार्यवाह, ग्राम प्रबोधिनी), पवनानगर विद्यालय, संकल्प इंग्लिश मिडियम स्कूल दुधीवरे, पवनानगर जि. प. शाळा, जे.एस.पी.एम्. इंजीनीअरिंग कॉलेज, भावसार व्हिजनचे कार्यकर्ते, ग्राम प्रबोधिनी विद्यालय, थुगाव जि.प. शाळा, संत तुकाराम माध्य. विद्यालय, शिवणे, ज्योतिबा विद्यालय, बेबडोहळ, जि.प. शाळा गोडुंब्रे, ज्ञान प्रबोधिनी, निगडी, २०० सायकल प्रवासी युवक, परीसरातील विद्यार्थी, अधिकारी, पदाधिकारी व इतर (एकूण सुमारे ५०००).

**○ विविध बक्षिसे व पुरस्कार**

- निबंध व चित्रकला स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी या स्वरूपात बक्षीसे वाटप करण्यात आले.
- सन २०१९-२० चा पयार्वरण मित्र पुरस्कार विद्यालयातील सहशिक्षिका सौ. मनीषाताई वहिले यांना देण्यात आला.
- नेहरू युवा केंद्र व मिनिस्ट्री ऑफ युथ वेल्फेअर अँड स्पोर्टस यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कराटे स्पर्धा त्रिदल सैनिक युवा संघ (Army) यांनी दौंड येथे भरविल्या होत्या. विद्यालयाचे चौदा विद्यार्थी स्पर्धेत सहभागी होते. (संपूर्ण महाराष्ट्रातून ८४२ विद्यार्थी). विद्यार्थ्यांना पुढील प्रमाणे पदके मिळाली - कार्तिकी सावंत (सुवर्ण), मैथिली सावंत, समृद्धी राक्षे, हिमगौरी भंडलकर, प्रांजली कदम, प्रगती कल्ले (रजत), महेश गडदे, आदित्य शेंडगे, राज बाबर, यश गायकवाड, सानिका कदूसकर, सानिका सावंत, काजल चव्हाण यांना (कांस्य ).

**○ छोटे सायंटिस्ट्स्**

ज्ञान प्रबोधिनी, पुणे व के. पी. आय. टी. टेक्नॉलॉजी लि. हिंजवडी, दुर्गादेवी चॅरीटेबल ट्रस्ट व ग्राम प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने मागील १० वर्षे चालू असलेल्या छोटे सायंटिस्ट्स् उपक्रमांतर्गत मावळ व मुळशी तालुक्यातील २० शाळांमधील निवडक विद्यार्थ्यांसाठी समस्या परिहार स्पर्धेचे आयोजन ग्राम प्रबोधिनी येथे दि. २० फेब्रु. २०२० रोजी करण्यात आले होते. स्पर्धेत इ. ८वी व ९वीचे ४८ विद्यार्थी सहभागी झाले होते. समस्या परिहारासाठी इ. ८वी साठी पूरपरिस्थिती व ९वी साठी कारखान्यातील धोक्याच्या सूचना, हे विषय दिले होते. दिलेल्या समस्या सोडविण्यासाठी दिवसभर विविध साहित्य वापरून गटाने उपकरणे, साधने तयार केली. या स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण व्यवस्थापकीय सदस्य श्री. गिरीश पटवर्धन, सी.एस्.आर प्रमुख तुषार जुवेकर, ग्राम प्रबोधिनीचे कार्यवाह व्यंकटराव भताने, ज्ञान प्रबोधिनीचे उपक्रम मार्गदर्शक महेंद्रभाई सेठिया, प्रकाश रणनवरे यांच्या हस्ते झाले.

इ. ८वी : १. प्रथम क्र. - श्री.पद्मावती विद्यामंदिर, उर्से
२. द्वितीय क्र. - श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय, पौड
३. तृतीय क्र. - वारू कोथूर्णे माध्य.विद्यालय, कोथूर्णे

इ. ९वी : १. प्रथम क्र. - न्यू इंग्लिश स्कूल, चांदखेड
२. द्वितीय क्र. - राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा, कासार अंबोली
३. तृतीय क्र. - व्हिजन इंग्लिश मिडियम स्कूल, नऱ्हेगाव

**○ माहेरवाशीण मेळावा**

महिला संघटन व जनजागृती या उद्देशाने हा मेळावा घेण्यात आला. पूरपरिस्थितीमुळे हा कार्यक्रम साळुंब्रे व गोडुंब्रे या गावापुरता मर्यादित झाला. या प्रसगी ५ नवविवाहितांचा सत्कार व ओटी भरण कार्यक्रम मा. सरपंच, उपसरपंच व ग्राम पंचायत सदस्य यांच्या हस्ते झाला. मेळाव्यात १४८ महिला उपस्थित होत्या.

**○ मा. आप्पांची जयंती**

दि. १७ ऑगस्ट या दिवशी झालेल्या कार्यक्रमात मा. आप्पांच्या प्रतिमेचे पूजन झाले. विद्यार्थ्यांनी आप्पांच्या लहानपणीच्या गोष्टी सांगितल्या. मा. संचालकांनी मा. आप्पांचे ग्रामविकसनाचे कार्य व आठवणी सांगितल्या. यावेळी मेधाविनीताई वाटवे उपस्थित होत्या.

**○ प्रथम प्रतिज्ञा ग्रहण**

देशसेवेत व राष्ट्रघडणीत आपलाही वाटा असावा, या उद्देशाने ग्राम प्रबोधिनीमध्ये १० सदस्यांनी (शिक्षक व शिक्षकेतर कमर्चारी) मा. संचालकांच्या उपस्थितीत प्रथम प्रतिज्ञा घेतली. मा. संचालकांनी त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

✦✦✦

# डोंबिवली विस्तार केंद्र

- **शहरी विभाग :** प्रबोधक मंडळ (साप्ताहिक), वाचक मेळावे, विद्याव्रत संस्कार, विद्याव्रत जोपासना, युवा गट - रात्रशिबीर, पौरोहित्य विभाग
- **ग्रामीण विभाग :** बाळे वाकळण इ.८ वी (साप्ताहिक), आटगाव (मासिक), शेणवे (मासिक), संवादिनी- ४ गट (मासिक बैठका) ओळख स्पर्शाची

### ○ सेतुबंधन मेळावा

दि. २३/०६/२०१९ रोजी शास्त्री हॉल येथे ११ ते ५ यावेळेत डोंबिवली विस्तार केंद्राचा सेतुबंधन मेळावा पार पडला. वेगवेगळ्या विभागात चालणारं काम सदस्यांना कळावं, सर्व विभागांचे एकत्रीकरण व्हावे, एकमेकांचा परिचय व्हावा यासाठी हा मेळावा घेण्यात आला. मेळाव्याच्या नियोजन गटात केंद्राच्या सर्व विभागांतील सदस्य सहभागी होते. मेळाव्यात सर्व केंद्राचे सदस्य सहभागी होणार होते त्यामुळे 'वर्षारंभ उपासना' घेण्यात आली, त्याची जबाबदारी पौरोहित्य गटाने घेतली होती. तर गटश: खेळांची जबाबदारी युवक-युवती गटाने घेतली होती.

निवेदन सादरीकरणाचा वेगळा प्रयोग यावेळी करण्यात आला. वेगवेगळ्या विभागांतील सदस्यांनी इतर विभागांचे काम समजून घेऊन त्या विभागाच्या निवेदनाच्या सादरीकरणात सहभाग घेतला. प्रत्येक विभागाचे गरजेप्रमाणे २/३ सदस्यांनी मागील तीन वर्षांचे ppt माध्यमातून निवेदन केले. उपस्थितांचे दहा गट करुन दोन गटांना एक याप्रमाणे पाच लेखांचे गटश: वाचन व चर्चा केली. ज्या दोन गटांत एकाच विषयावर चर्चा झाली त्यातील दोन सदस्यांनी मिळून सर्वांसमोर थोडक्यात त्या विषयाची मांडणी केली.

केंद्रप्रमुख श्रुतीताई या हराळी केंद्रावर रुजू झाल्या, पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. आ. संचालकांनी शुभाशीर्वाद दिले व उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. सर्व विभागांतील मिळून ७१ सदस्य उपस्थित होते.

### ○ अमराठी मुलांचे शिबिर

या वर्षी राष्ट्रीय एकात्मता यावर काही उपक्रम करावा असा प्रबोधक मंडळ गटाने संकल्प केला होता, या संदर्भात ९ नोव्हेंबर, २०१९ रोजी अभ्युदय प्रतिष्ठान- पूर्वांचल विकास प्रकल्प, डोंबिवली येथे एक दिवसाचं अमराठी मुलांसाठी शिबिर घेतलं. शिबिरात सहभागी झालेली सोळा मुलं नागालँड, आसाम, मणिपूर या भागातून आली आहेत.

साधारण साडेतील तासांच्या गंमत शिबिरासारख्या घेतलेल्या या शिबिरात मुलांशी हिंदीतून संवाद साधावा लागला. गीत, चित्रकला सत्र, सांकेतिक भाषा, गाणी, गोष्टी आणि खेळ ही सत्रं घेतली. मुलांनी सगळ्या सत्रांमध्ये सक्रिय सहभाग घेतला, सगळ्यात जास्त चित्रकलेचे सत्र मुलांना खूप आवडले.

चित्रकलेच्या सत्रात शाई आणि रंग दिले होते, प्रत्येकाला एक मिनिट दिले होते. मुलांनी खूप छान चित्रे काढली. सांकेतिक भाषेमध्ये एखादा संदेश पाठवायचा, इतर कुणाला न कळू देता फक्त त्या व्यक्तीला कळावा, तर असं वाक्य तयार करा की त्याच्या प्रत्येक अक्षरावरून एक वेगळं अर्थपूर्ण वाक्य तयार होईल. कागदाचा गोल देऊन तो हाताने अशा प्रकारे फाडायचा की मध्ये न तुटता त्याची जास्तीत जास्त लांब फीत करायची.

### ○ समतोल अंक प्रकाशन

मार्गशीर्ष-पौष शके १९४१ या महिन्याच्या समतोल अंकाच्या संपादनाची संधी डोंबिवली संवादिनीला मिळाली. निवडक सदस्या आणि अतिथी संपादिका म्हणून आरती दिवेकर मिळून संपादक मंडळ स्थापन झाले. अंकाचा सूत्रविषय 'मैत्री' असल्याने प्राण्यांशी मैत्री, आंतरराष्ट्रीय मैत्री इत्यादी विविध पैलू मांडायचा प्रयत्न केला. तसेच कथा, कविता, ललित लेख, चरित्रपर लेख असे साहित्य निवडले.

हा अंक पूर्णपणे डोंबिवली केंद्राच्या संवादिनी सख्यांनी संपादित केला असल्यामुळे डोंबिवली केंद्रासाठी खूप कौतुकाची व आनंदाची अशी गोष्ट, म्हणून अंकाचा प्रकाशन समारंभ करायचे ठरविले. अंकाचा प्रकाशन समारंभ दि. २५/१२/२०१९ रोजी झाला.

प्रास्ताविक करताना भाग्यश्री गोडबोले हिने संवादिनीची थोडक्यात

**नियमित उपक्रम**

| उपक्रमाचे नाव | सहभागी | कार्यकर्ते |
|---|---|---|
| प्रबोधक मंडळ (साप्ताहिक) | ४२ | १२ |
| वाचक मेळावे | ३७ | ८ |
| विद्याव्रत संस्कार | ४८ | १२ |
| विद्याव्रत जोपासना | २२ | ८ |
| युवा गट -रात्रशिबिरं (२) | १८० | २३ |
| पौरोहित्य विभाग | १२४३ | १३ |
| **ग्रामीण विभाग** | | |
| बाळे वाकळण इ.८ वी (साप्ताहिक) | ३२ | ८ |
| आटगाव (मासिक) | ४० | ८ |
| शेणवे (मासिक) | ७५ | ८ |
| संवादिनी- ४ गट (मासिक बैठका) | ६८ | ८ |
| ओळख स्पर्शाची | ११०० | १७ |

माहिती सांगितली. या अंकाची मुखपृष्ठकार रुचा प्रभू-कोचरेकरने आपले विचार मांडले. अंक तयार करताना आलेले अनुभव, अंकाचा प्रवास याविषयी अंकाची अतिथी संपादिका आरती दिवेकर हिने आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्या म्हणून श्वास चित्रपटाच्या कथालेखिका सौ. माधवीताई घारपुरे उपस्थित होत्या. माधवीताईंच्या हस्ते अंकाचे प्रकाशन झाले. सौ.अश्विनीताई मयेकर यांनी मासिकाच्या साहित्यिक बाजू व त्या बरोबरच त्याच्या आर्थिक बाजूचेही महत्त्व लक्षात आणून दिले. तसेच संवादिनी म्हणून अजून काय कार्यदिशा असू शकतील याचेही मार्गदर्शन केले. केंद्रप्रमुख ज्योतीताईंनी उपस्थितांचे, पाहुण्यांचे तसेच कार्यक्रमासाठी ज्यांचे हातभार लागले त्या सर्वांचे आभार मानले. पूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन विद्या धुपकर हिने केले. संवादिनी सदस्या, कार्यकर्ते व निमंत्रित असे ६५ जण उपस्थित होते.

✦✦✦

# बोरीवली विस्तार केंद्र

### ० मासिक बैठक

वर्षाच्या सुरुवातीलाच ऑगस्टमध्ये सौ. भैरवी चेंबुरकर यांना शून्य कचरा व्यवस्थापन यावर प्रात्यक्षिक व माहिती देण्यासाठी बोलावले होते. कचरा बास्केटमध्ये घरातील ओला कचरा साठवून त्याचे उत्तम रसायन विरहित सेंद्रिय खत बनते. ह्यातून पैशांची बचत व जबाबदार नागरिकांचे कर्तव्य या दोन्ही गोष्टींचे भान आले. बाहेरून आमंत्रित केलेले दुसऱ्या सहामाही मधले पाहुणे होते आयुर्वेदिक व नाडी परीक्षा तज्ज्ञ डॉक्टर स्वप्नील चितळे. आपल्यापैकी अनेकांना प्रौढ वयात होणारे आजार, त्यावरचे उपचार, ते होऊ नयेत यासाठी घेण्याची काळजी, वार्धक्य कसे दूर ठेवावे, आहार काय घ्यावा इ. विषयांवर माहिती दिली.

संवादिनीतला एक विशेष उल्लेखनीय कार्यक्रम होता तो कीर्तनाचा. शुभदा फणसे या चांगल्या कीर्तनकार आहेत. अंतराळ वीरांगना 'कल्पना चावला' या विषयावर त्यांनी अतिशय रंजकतेने, माहितीपूर्ण असे कीर्तन सादर केले. तबला-पेटी व झांज या साथीने झालेला हा कार्यक्रम यू-टयूब वरही उपलब्ध आहे.

### ० वर्षभरातील इतर उपक्रम

अर्चना कोरे हिने पाळणाघर, कामवाली बाई, प्लंबर, प्रॉब्लेम ऑफ प्लेंटी अशा काही विषयांवर चर्चा घेतल्या ज्यात सर्वांनी आपापले अनुभव सांगितले. पु. ल., गदिमा व बाबूजी या साहित्यिक त्रयींची जन्मशताब्दी गेल्या वर्षी अनेक ठिकाणी साजरी झाली. संवादिनीतही या तिघांना आदरांजली वाहून त्यांचे अनेक किस्से, कविता, गाणी, उतारे व स्वरचित काव्ये सादर केली.

याशिवाय संवादिनीत नियमित होणारे कार्यक्रम खूपच वैविध्यपूर्ण होते. 'ओळख साहित्यिकांची' या अंतर्गत वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे, कुसुमाग्रज, व्यंकटेश माडगूळकर व ना. सी. फडके यांच्या साहित्याबद्दल व इतर वैयक्तिक माहिती अभ्यासपूर्वक तयार करून कथन केली. वातावरण हलके व खेळीमेळीचे ठेवणारा 'गंमत चारोळ्यांची' हा खुसखुशीत व गालातल्या गालात हसवणारा कार्यक्रम वर्षभर सुरू होता. 'विस्मरणात गेलेल्या स्त्री संत कवयित्री' ही मालिका सादर केली. संत सोयराबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा व जनाबाई यांच्या फारशा प्रकाशात नसलेल्या काव्याबद्दल मोलाची माहिती सांगितली. जुन्या क्लासिक हिन्दी गाण्यांच्या विश्लेषणाचा एक आगळा कार्यक्रम वर्षभर नियमितपणे सादर केला. गाण्यातील उर्दू शब्दांचे अर्थ सांगून त्या गाण्यांची इतरही आनुषंगिक माहिती देत सविस्तरपणे केलेले हे रसग्रहण सगळ्यांना आनंद देऊन गेले. खेळकट्टा हा सर्वांचा आवडता कार्यक्रम असतो. ४/५ प्रकारचे वेगवेगळे खेळ घेऊन सर्वांना उत्साहित केले. शारीरिक व्यायामाचे प्रकार, हालचाली योगासने, संगीताच्या तालावर कसरती, शरीरातील सात चक्रांची माहिती व त्यांचे महत्त्व-परिणाम व शेवटी शवासन हे सगळं सगळ्यांकडून करून घेतलं. बोरीवली संवादिनीची एकूण सभासद संख्या ५०च्या वर आहे. दर महिन्यातील पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी बोरीवली पूर्व व पश्चिम अशा दोन ठिकाणी गट असतो.

- **संस्था-भेट व सहली –** यावर्षी पनवेल जवळील 'यूसुफ मेहेरअली सेंटर' या संस्थेला भेट झाली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एका प्रमुख सेनानींच्या नावाने ही संस्था आदरणीय श्री. मधू व प्रमिला दंडवते यांनी सुरू केली. आज तिथे अनेक लघु-उद्योग, स्थानिकांसाठी हॉस्पिटल, आदिवासी मुलांसाठी शाळा व मुलींसाठी वसतिगृह मोफत चालवले जाते. अशा संस्थेचे कार्य पाहून सामाजिक जाणीव अधिक जागरूक झाली व अनेकांना त्यातून प्रेरणाही मिळाली.
- **रूप पालटू शाळेचे –** प्रगती शाळा, गोराई येथे रूप पालटू शाळेचे हा उपक्रम चालतो. तेथे 'मैत्री शिबिर' घेतले तसेच मुलांसाठी छोटी सहलही आयोजित केली. बोरीवली येथील आदिवासी मुलींच्या आश्रमामध्ये काही सदस्य जातात. त्या मुलींना अभ्यासात मदत करणे, खेळ घेणे, खाऊ देणे, रांगोळ्या शिकवणे अशा अनेक गोष्टी करत असतात.
- **Functional English –** जीवन बीमा नगर बोरीवली या शाळेत Functional English हा उपक्रम सुरू आहे. मराठी माध्यमाच्या मुलांचे इंग्रजी बोलण्याचे कौशल्य वाढावे यासाठी तिथे शाळेच्या अभ्यासा व्यतिरिक्त इतर अवांतर वाचन, सामान्य ज्ञान, कोडी, बोधगोष्टी, कृतीसत्र, थोर व्यक्ति-विशेष, वक्तृत्व अशा गोष्टींसाठी शिक्षकांना जास्त वेळ नसतो. ही बाब ओळखून ही कमतरता भरून काढून मुलांच्या विकासाला या उपक्रमाद्वारे हातभार लावला जातो.

# अंबाजोगाई विस्तार केंद्र

■ युवक विभाग ■ युवती विभाग ■ शिशुविहार
■ माँ शारदा गट ■ निवेदिता गट ■ प्रदेश विकसन

**० वर्षारंभ उपासना**

